म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

हुंडीचलन पद्धतीचा इतिहास

REFBK-0005687

सचित्र

यशा ओहोकरे

हिंदी चलनपद्धतीचा इतिहास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६८८

लेखक

य. वा. लोहोकरे, सोलापूर

REFBK-0005687

प्रथमावृत्ति १९३८

किंमत १२ आणे

प्रकाशक—य. वा. लोहोकरे
मोडकवाडा, नवीपेठ सोलापूर.

लेखकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत

मुद्रक--ग. गो. दिवाकर
इंदिरा प्रेस. ६८९/१५ सदाशिव पुणें.

लेखकाचें निवेदन.

॥ पदार्थ मात्र तितुका गेला ॥ नुसता देशाचि उरला ॥
येणे करितां बहुताला । संकट जाले ॥ १ ॥

—श्रीसमर्थ रामदास.

श्रीसमर्थांनीं हिंदुस्थानच्या तीनशें वर्षांपूर्वींच्या परिस्थितीचें केलेलें वरील वर्णन आजहि तंतोतंत कसें लागू पडत आहे, हें आपण, नुसतें हिंदी चलन व हुंडणावळ विषयक सरकारच्या गेल्या ५० वर्षांतील धोरणा-मुळें, हिंदुस्थानचें किती नुकसान झालें आहे, हें पाहिलें तरीहि उत्तम रीतीनें दिसून येईल.

येथील शेतकरी भिकेस कां लागला, कारखानदार कां बुडाले, बेकारी कां वाढली, वगैरे हिंदुस्थानच्या आर्थिक दैन्यावस्थेचें मुख्य कारण पारतंत्र्य व त्यामुळें इंग्लंडच्या व्यापाऱ्यांचे व येथील गोऱ्या नोकरदार वर्गाचें उखळ पांढरें होण्याच्या दृष्टीनें सरकारला ठेवतां आलेलें येथिल चलन व हुंडणावळ विषयक धोरण हें होय; हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

हजारों देशबांधवांनीं आपणावर संकट परंपरा ओढवून घेऊन गेल्या १० वर्षांत स्वराज्य मिळविण्याकरितां जी जोराची चळवळ केली, व ती शमविण्याकरितां सरकारनें जी हिंदुस्थानास १९३५ च्या कायद्यान्वयें घटना देऊं केली आहे; तींतहि चलन व हुंडणावळ विषयक धोरणाचा ताबा परक्याच्याच हातीं ठेवण्याची योजना केलेली असल्यामुळें, त्या घटने-नुसार हिंदुस्थानला मिळालेल्या सत्तेचा उपयोग, आपली आर्थिक परिस्थिति सुधारणेच्या कामीं कसा होऊं शकणार नाहीं, याची कल्पना सामान्य जन-तेस येण्याकरतां, या समयीं "हिंदी चलनपद्धतीचा इतिहास" हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे.

दुसरें एक कारण असें कीं या विषयावर इंग्रजी भाषेंत पुष्कळच लिखाण आहे, परंतु मराठी भाषेंत या विषयावर एकत्रित असें फारसें लिखाण नसल्यामुळें सामान्य वाचकांस हा विषय आकलन होण्यास किती कष्ट पडत असतील याची जाणीव लेखकास स्वानुभवानें झाली आहे. तेव्हां सामान्य जनतेस हा विषय आकलन होण्यास सुलभ व्हावें अशा हेतूनें, तसेंच आजकाल नवीन पिढीस मातृभाषेंतूनच शिक्षण देणें जास्त श्रेयस्कर हें पटत चालल्यानें या विषयावर मातृभाषेंत पुस्तकें असणें जरूरीचें वाटल्यानें ही अल्पकृति महाराष्ट्रीय जनतेस सादर करणें अयोग्य ठरणार नाहीं, असें वाटल्यावरून हें साहस लेखक करीत आहे. तें योग्य आहे अगर अयोग्य आहे हें पाहणें जनतेकडे आहे.

प्रस्तुत लेखकाचे तज्ज्ञ लेखकांनीं कारणपरत्वें लेखनद्वारें जें पूर्वींच लिहून ठेविलें आहे, तें त्याच्या अल्पमतीप्रमाणें त्यानें येथें एकत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकाचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें त्यांत अनेक दोष व चुका असण्याचा संभव आहे. तेव्हां त्यांत असलेले दोष सहृदय वाचक सुधारून गोड करून घेतील व या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास ती निर्दोष करण्यास सहाय्य व्हावें म्हणून, यांतील चुका दिग्दर्शित करून त्यास ऋणी करतील अशी आशा आहे.

चलन व हुंडणावळ विषयक धोरणाचा ताबा परक्यांचे हातांत असल्यामुळें आपलें किती नुकसान झालें आहे, व होत आहे याची जाणीव सर्व जनतेस करून देणें अत्यंत आवश्यक आहे व तसें तें करून देण्याकरितां, मासिकें व वर्तमानपत्रें यांच्या चालकांनीं अधिकाधिक लिखाण या विषयावर प्रसिद्ध करण्यास सुरवात करणें अगत्याचें आहे. तसेंच आमच्या सुशिक्षित वर्गाचें या विषयाकडे अधिक लक्ष लागून त्यांनीं या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून, लेख, व्याख्यानें, चर्चा वगैरे मार्गांनीं जनतेस या विषयाचें ज्ञान करून देणें आवश्यक आहे. सुशिक्षित वर्गाची सध्यांची या विषयाबद्दलची अनास्था अक्षम्य आहे. तरी त्यांनीं या विषयाचें महत्व ओळ-

सून त्याकडे अधिक लक्ष देण्याचें करावें अशी त्यांस कळकळीची व नम्र विनंति आहे.

अलीकडे, पूर्वीच्या काळीं सर्वमान्य झालेले अर्थशास्त्राचे कांहीं सिद्धांत, कांहीं पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांच्या मतें चुकीचे ठरविण्यांत येत आहेत. तरी त्या दृष्टीनें या निबंधांत अनुसरलेल्या सिद्धांतावर सांगोपांग चर्चा व्हावी अशी विनंति आहे.

कार्यबाहुल्यामुळें सवड नसतांहि, त्यांतल्यात्यांत सवड काढून या पुस्तकाचें हस्तलिखित वाचून त्यांत कांहीं सुधारणा सुचवून; प्रस्तुत लेखकाचे विनंतीस मान देऊन या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली, याबद्दल लेखक पुण्याचे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे यांचा अत्यंत ऋणी आहे. हें ऋण येवढ्यावरच संपत नसून, प्रो. काळे यांनीं महाराष्ट्र जनतेला अर्थशास्त्राची सांगोपांग माहिती करून देण्याच्या उदात्त हेतूनें मराठींतून जें " अर्थ " नांवाचें साप्ताहिक घस सोसून गेलीं तीन चार वर्षें चालविलें आहे, त्याच्या सतत वाचनाचा, प्रस्तुत लेखकास अर्थशास्त्राच्या अभ्यासाकडे लक्ष वेधण्याचें कामीं प्रामुख्यानें उपयोग झालेला असल्यामुळें, प्रस्तुत लेखक त्यांचा शतशः ऋणी आहे.

अर्थशास्त्राच्या विषयाला वाहिलेलें असें हें साप्ताहिक मराठी भाषेत ' एकमेव ' असूनही महाराष्ट्र जनतेनें त्याचा योग्य सत्कार अजून केलेला नाहीं यावरून महाराष्ट्र जनतेची या विषयाबद्दलची अनास्था किती आहे, हें दिसून येतें. निदान सराफ व व्यापारी वर्ग यांनीं तरी ही अनास्था सोडून सदर सात्पाहिकाचे ग्राहक होऊन त्यांतील उपयुक्त माहितीचा आपले व्यवसायांत उपयोग करून घ्यावा अशी त्यांस कळकळीची विनंति आहे.

प्रो. गो. प. पटवर्धन, माजी हेडमास्तर हरिभाई देवकरण हायस्कूल, श्रीयुत बेके, श्रीयुत डॉ. वा. का. किर्लोस्कर, व्ही. आर. गोडबोले, श्रीयुत के. व्ही. गाडगीळ वकील; श्रीयुत गोविंदराव शिदोरे माजी सुपरिन्टेन्डेन्ट हरिभाई देवकरण हायस्कूल, श्रीयुत दत्तोपंत सराफ, अध्यापक जैन बोर्डिंग,

श्रीयुत माधवराव कुलकर्णी, हेडमास्तर, म्युनिसिपल शाळा नंबर १ श्रीयुत रा. ह. पटवर्धन इन्कमटॅक्स एस्कपर्ट, श्रीयुत ल. ह. कुलकर्णी वकील, श्री. राजवाडे साठे वगैरे सोलापूरचे व भोरचे, श्रीयुत लक्ष्मणदास माधवदास देवी वकील, व श्रीयुत रामचंद्र भालचंद्र फडणीस वकील, व पुण्याचे श्री. पां. गो. साने माजी संपादक 'गोरक्षण' वगैरे स्नेही मंडळींनीं वेळोवेळीं हस्तलिखितें तपासून ज्या उपयुक्त सूचना करून जें उत्तेजन दिलें तसेंच बालोद्यान प्रेसचे मालक श्री. बाबूराव सहस्रबुद्धे यांनीं पुस्तक छापण्यास मदत केली त्याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत ऋणी आहे. शेवटीं, लेखकाचे वडील श्रीयुत वासुदेव लक्ष्मण लोहोकरे व चुलते श्री. रा. अनंतदास रामदासी यांनीं दिलेल्या प्रोत्साहनाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून हें लिखाण हातावेगळें करीत आहे.

सोलापूर, नवी पेठ मोडकवाडा,
घर नंबर ४६
ता. १४-२-१९३८

यशवंत वासुदेव लोहोकरे,

श्री. वैकुंठलाल श्रीपतराय ठाकोर, माजी मॅनेजर, सोलापूर मिल्स

यांना त्यांच्या अंगच्या सौजन्यादि विशिष्ट गुणांमुळें व त्यांच्या हाताखालीं काम करीत असतांना त्यांच्या आर्थिक परिस्थित्यनुरूप व्यापार विषयक अचूक धोरण बांधून गिरणी चालविण्याच्या हातोटीवरून मला अर्थशास्त्राचे महत्व कळून त्याचा अभ्यास करण्याची आवड उत्पन्न झाली, त्याची आठवण म्हणून

आदरपूर्वक अर्पण. ग्रंथकर्ता.

२०१.५४१ ७०६५०

प्रस्तावना

चलन, हुंडणावळ, व परराष्ट्रीय व्यापाराचे व्यवहार या संबंधाचा विषय अतिशय गुंतागुंतीचा व अवघड आहे. त्याचें नीट आकलन होण्यास पैसा, पत आणि बाजारभाव या संबंधांतले अर्थशास्त्रीय सिद्धातांचें थोडें तरी ज्ञान आवश्यक असतें. हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीशीं वरील विषयाचा जिव्हाळ्याचा संबंध असतो. सामान्य माणसास मात्र त्याचें रहस्य उकलणें अत्यंत कठीण होतें. हिंदी परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर १६ पेन्स असावा कीं १८ पेन्स असावा याबाबत चर्चा चालली असतां तिच्यातले मर्म समजण्याची सामान्य लोकांची तीव्र इच्छा असूनहि ती तृप्त होण्याचें साधन नाहीं, अशी स्थिती होते, त्या दृष्टीनें पाहतां श्रीयुत लोहोकरे यांचा प्रस्तुत प्रयत्न स्वागत करण्यासारखा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हातीं घेतलेल्या महत्त्वाच्या प्रश्नाचे विवेचन त्यांनीं सोप्या व सुबोध पद्धतीनें केलें आहे. विषयाचें स्वरूप लक्षांत घेतां त्यांचें कांहीं ठिकाणचें विवेचनहि सूत्रवत्, दुर्बोध व क्वचित् सदोषहि वाटण्याचा संभव आहे. तथापि हें अपरिहार्य आहे. आणि वस्तुतः त्यातला दोष लेखकापेक्षां पुस्तकाची मर्यादा आणि प्रतिपाद्य विषयाचें अवघड स्वरूप याचाच विशेष आहे. चर्चावयाच्या प्रश्नाच्या मुळाशीं असलेली सामान्य आर्थिक तत्त्वें आणि हिंदी चलनपद्धतीचा इतिहास यांचा श्रीयुत लोहोकरे यांनीं योग्य समाचार घेतला असून आज त्या पद्धतीची स्थिती काय आहे हें स्पष्टपणानें सांगितलें आहे. हिंदुस्थानच्या राजकीय व आर्थिक परावलंबनामुळें आमची चलनव्यवस्था विशिष्ट ठशाची कां झाली, त्याचे विवेचन त्यांनीं सविस्तर आणि मार्मिकपणानें केलें आहे. त्यावरून सरकारच्या चलनविषयक धोरणावर होणाऱ्या हिंदी लोकमताच्या प्रतिकूल टीकेवर स्वच्छ प्रकाश पडतो.

आर्थिक विषयांच्या ज्ञानाचा प्रसार जनतेमध्यें होणें अगत्याचें आहे, हें जाणून त्या दिशेनें प्रयत्न करणारांपैकीं मी असल्यानें प्रस्तुत पुस्तकाचें

विशेष महत्त्व आहे असें मी समजतों. मुळांत, अर्थशास्त्राचें शिक्षण नसतांना परिश्रमानें त्याचें जरूरीपुरतें ज्ञान संपादन करून तें जनतेस देण्याचा त्यांचा प्रयत्न अभिनंदनीय आहे. पुस्तकाचा उद्देश सफल होऊन आर्थिक विषयाची गोडी जनतेस अधिकाधिक लागण्याचें कामीं त्याचें साह्य होईल अशी मला आशा आहे.

दुर्गानिवास पुणें ४
ता. ६–२–३८

वा. गो. काळे

अभिप्राय

रा. रा. यशवंत वासुदेव लोहोकरे यांनीं ' हिंदी चलनपद्धतीचा इतिहास ' ह्या नांवाच्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत मला दाखविली व त्यावर माझा अभिप्राय देण्यास सांगितलें. त्यावरून तें पुस्तक मी लक्षपूर्वक समग्र वाचलें. त्यांत त्यांनीं हिंदी चलन पद्धतीचा इतिहास व त्याचा वर्तमानकालीन धंद्यावर परिणाम याचें थोडक्यांत पण सहज समजेल अशा भाषेंत सुरस वर्णन केलें आहे. परतंत्र अवस्थेंत मनुष्य अडकला म्हणजे समर्थ व्यक्ति त्याला अडवून आपले स्वार्थ कसे साधित असतात याचें प्रत्यंतर व्यवहारांत नेहमीं पाहण्यास मिळतें व अनेक कुशल कादंबरीकार त्यावर कादंबऱ्या रचून त्याचें किती हृदयद्रावक वर्णन करितात हें आपण नेहमीं पाहतों व अशा कादंबरीकारांची समाजांत प्रशंसाही केली जाते. कारण त्यामुळें खरे जुलूम प्रगट होतात, व त्यावर चळवळ सुरू होऊन तो नाहींसा करण्याचे प्रयत्न चालु होतात. आपली आर्थिक परतंत्रता हाही एक तशा प्रकारचा जुलूमच आहे. सध्यां नाटक व सिनेमांत सावकारांचे जुलूम वगैरे प्रयोग दाखवून लोकांना त्यापासून सावध राहण्याचे शिक्षण दिलें जातें. त्याचप्रमाणें राष्ट्रीय आर्थिक जुलमाचे ज्ञान सर्वसाधारण लोकांस झाल्यास राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याची राष्ट्रास का जरूर आहे व त्यास सर्व वर्गांनीं कां पाठिंबा द्यावयास पाहिजे याचा उलगडा होईल.

विशेषतः व्यापारी वर्ग ज्यांना याची अत्यंत आवश्यकता आहे त्यांनीं संपूर्ण अर्थशास्त्राचा अभ्यास न केला तरी त्याचा कार्य कारणभाव समजून घेऊन त्यावर आपला व्यवहार करण्यासाठीं तरी निदान अशा पुस्तकाचा अभ्यास करणें या कालांत अत्यंत जरूरीचें आहे. या दृष्टीनें लोहोकरे यांनीं ते स्वतः अर्थशास्त्रज्ञ नसतांना व नोकरी संभाळून अर्थशास्त्रविषयक एका शाखेची माहिती मिळवून तिचा स्वभाषेंत आपल्या लोकांस फायदा देण्यासाठीं जी मेहनत करून ही कृति निर्माण केली आहे त्याबद्दल त्यांचें कौतुक करावे तितकें थोडें आहे. सध्यां राजकारणांत पडूं पाहणाऱ्या तरुणांना या पुस्तकाचा अभ्यास त्यांच्या कार्यांत अत्यंत उपयुक्त होईल मग व्यापारी लोकांस तो होईल हें निराळें सांगावयाचें प्रयोजन नाहीं.

सोलापूर, संतोषभवन
ता. १८-२-१९३८ } जिवराज गौतमचंद दोशी

हिंदी चलन पद्धतीचा इतिहास हा विषय फार क्लिष्ट व गुंतागुंतीचा परंतु तितकाच महत्त्वाचा असा आहे. सरकारच्या चलनविषयक धोरणाचा देशांतील व्यापारी वर्ग, मध्यम वर्ग, शेतकरी व कामकरी वगैरे सर्वांच्या हिताहितार्शीं संबंध असतो. आतां ही गोष्ट खरी कीं केवळ परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर १८ पेन्सावरून १६ पेन्सावर आला म्हणजे आपल्या देशांतील सर्व आर्थिक आपत्ति दूर होतील असें नाहीं, हें जगांतील इतर देशांनीं चलनाच्या किंमती उतरविल्या तरी तेथील आर्थिक आपत्ति अजून टळल्या नाहींत यावरून दिसून येईल.

विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, मराठी भाषेंत या विषयावर अशा पुस्तकांची दुर्मिळता असल्यामुळें श्रीयुत लोहोकरे यांनीं लिहिलेल्या या पुस्तकानें ती अंशतः भरून काढली आहे. यामुळें श्रीयुत लोहोकरे यांचें मी अभिनंदन करतों. या विषयाची चर्चा विषयाच्या क्लिष्टतेच्या मानानें शक्य तितकी सुबोध झाल्यामुळें मराठी वाचकांना येथील चलन व हुंडणावळ

विषयक धोरण परकीय सत्तेमुळें या देशाच्या नुकसानीस कसें कारणीभूत होत आहे, हें समजूत घेण्यास प्रवेशिका या नात्यानें या पुस्तकाचा चांगलाच उपयोग होण्याजोगा आहे. अलीकडल्या राजकारणांत चलन व हुंडणावळ या विषयांचा अभ्यास अत्यंत आवश्यक असल्यामुळें जिज्ञासू, अभ्यासू व सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याची इच्छा असणाऱ्या सर्व नागरिकांना हें पुस्तक वाचावें व संग्रही ठेवावें अशी शिफारस करण्यास मला कोणतीहि हरकत वाटत नाहीं.

सोलापूर,
ता. १८।२।३८.

डॉ. कृष्णाजी भिमराव अंत्रोळीकर.
M. L. A. Bombay.

संदर्भ ग्रंथांची यादी

हा निबंध तयार करतांना खालील पुस्तकांचा वेळोवेळीं उपयोग करण्यांत आला आहे.

(1) Speeches of the Honourable Late Mr. G. K. Gokhale.

(2) An out-line of Economic Theory, by Professor R. M. Joshi.

(3) Indian Finance year book. 1932–33.

(4) Indian currency and exchange, published by "All India Congress Committee."

(5) Bulletins No. 1 to 5 by the currency league of India.

(6) Public Finance by Mr. K. C. Kumarappa.

(7) Planned Economy for India by Sir. Visvesvaraya.

(8) (A) Following articles from News papers :—

I 18d, Sterling—A damaging ratio. Article in "Maratta" by Mr. K. C. Katara M. Sc, Amritsar.

II Europe's war debts problem, article in 'New Leader' by Mr. H. N. Brailford.

III Analysis of the Reparation Muddle. Article in "Free Press" journal by Mr. D. Ghosh.

IV The flight of gold from India Dr. Sinhas' address of Economic Conference on 4–1–1933 published in the issue of "Free Press" Journal dated 6–1–1933.

V Letter of Mr. D. P. Khaitan, President of the Indian Chamber of Commerce, Calcutta, published in Indian daily mail of 2-12-1930.

VI Debate on crisis (in the legislative Assembly) published in the Bombay Chronicle of 28th September 1931.

VII How India helps the Pound. "Daily Telegraph" of 10-1-1932.

(8) (B) India Analysed, Volume III, Edited by F. M. Bedi and B. P. L. Bedi.

(९) हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास, आर्वाचीन भाग इ. स. १८४०-१९३० लेखक-प्रि.धनंजय रामचंद्र गाडगीळ, एम्. ए. एम्. टी. (केंब्रिज)

(१०) पैसा. लेखक—श्री. एस्. जी. चाफेकर

(११) बँका व त्यांचे व्यवहार. लेखक प्रो. वा. गो. काळे एम्. ए.

(१२) हिंदुस्थानची रिझर्व बँक. लेखक. ,, ,,

(१३) व्यापारी उलाढाली. लेखक ,, ,,

(१४) करन्सी कमिशनच्या शिफारसी. ,, ,,

(१५) हुंडणावळीचे दरासंबंधी वाद. ,, ,,

(१६) अर्थ, साप्ताहिक ता. २४-११-१९३७ व केसरी ७-१-१९३८

(१७) लोकमान्य टिळकांचे केसरीतील सुवर्ण चलन विषयक ७ निबंध.

(१८) अर्थशास्त्राचीं मूल तत्त्वें. फडकेकृत.

विषयानुक्रमणिका

अनु. नं.	विषय	पृष्ठ
	प्रस्तावना	
	अभिप्राय	
(१)	चलन व हुंडणावळ विषयक सर्व साधारण माहिती.	१
(२)	हिंदी चलनपद्धतीचा त्रोटक इतिहास.	२४
(३)	हिंदुस्थानच्या चलनपद्धतीतील वैशिष्ठ्य म्हणून गणला गेलेला प्रकार म्हणजे "कौन्सिल बिलें" व "रिव्हर्स कौन्सिल बिलें," त्या विषयक थोडें विवेचन.	४८
(४)	कागदी चलननिधी व सुवर्ण परिमाणनिधी यांचीं पत्रकें व त्यावरून निघणारीं कांहीं अनुमानें.	६२
(५)	हिंदुस्थानांतील खेळत्या चलनाचें प्रसरण व आकुंचन.	६९
(६)	हुंडणावळीचे दराबाबतच्या वादाचें रहस्य.	७२
(७)	उपसंहार.	८४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ५६८८
ग्रं. ११३
१०८००
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

हिंदी चलनपद्धतीचा इतिहास

प्रकरण पहिलें.

विषय प्रवेश.

हिंदी चलन पद्धतीच्या इतिहासाचें पूर्णत्वानें आकलन होण्याकरितां आपणांस प्रथम चलनाचें सामाजिक जीवनांत स्थान काय आहे, चलन म्हणजे काय, चलनाची आवश्यकता केव्हां व कां प्राप्त झाली, मानव-जातीच्या सुधारणेबरोबर चलनपद्धतींत कशी कशी सुधारणा होत गेली व हल्लीं उत्तम कार्यकारी मानली गेलेली चलनपद्धति कोणती वगैरे बाबींचा विचार केला पाहिजे.

अर्थात्‌च या लहानशा निबंधांत वरील बाबींचा अगदींच त्रोटक विचार होणार हें उघड आहे. तरीपण या बाबींचा त्रोटकच कां होईना, पण विचार केल्याविना आपणांस आपल्या मुख्य विषयाकडे वळतां येणार नाहीं; म्हणून तिकडे आतां आपण वळूं.

" चलनाचें सामाजिक जीवनांतलि स्थान "

जमीन, पाणी, खाणी, वगैरे सृष्टिनिर्मित वस्तू, मनुष्याचें श्रम आणि भांडवल, यामुळें जगांत संपत्तीचें उत्पादन होतें. अर्थ शास्त्रांत संपत्ति याचा अर्थ "मनुष्याच्या नानाविध गरजा भागविण्याचें सामर्थ्य असलेल्या जिनसा"

असा आहे. मनुष्याच्या नानाविध गरजा भागविण्याकरितां त्या संपत्तीस मागणी निर्माण होते व संपत्ति आणि मनुष्याच्या नानाविध गरजा यांचा मेळ चलनद्वारें बसतो. तेव्हां चलन म्हणजे मनुष्याच्या गरजा भागविण्याचें सामर्थ्य असलेल्या जिनसा व मनुष्याच्या नानाविध गरजा यांचा मेळ घालणारा एक दुवा होय.

मनुष्याच्या गरजा भागविण्याचें सामर्थ्य असलेल्या जिनसा, मनुष्याच्या नानाविध गरजा व चलन यांना एकत्रित आणणारें ठिकाण म्हणजे जगांतील बाजारपेठा होत. या बाजारपेठांतून बाजारभाव खालील तीन गोष्टींच्या आधारें निश्चित होत असतात.

(१) समाजांतील खेळत्या चलनाचें परिमाण,
(२) जिनसांच्या उत्पादनाचें परिमाण, व
(३) सदर जिनसांना असलेली मागणी.

वरीलपैकीं कोणत्याही दोन बाबी स्थिर असतां तिसऱ्या बाबींतील कमी अधिकपणानुसार बाजारभावांत चढउतार होतात, हें अधिक स्पष्ट करणें-करितां आपण एक उदाहरण घेऊं.

उदाहरणार्थ—एकाद्या शहराची लोकवस्ती एक लक्ष आहे. येथील ज्वारीचा वार्षिक खर्च दोन लक्ष मण आहे व ज्वारीचे एक मणास ८ रुपये या भावानें सोळा लक्ष रुपये, दोन लक्ष मण ज्वारीची किंमत होते, असें आपण धरलें, म्हणजे याचा अर्थः—

(१) चलन सोळा लक्ष रुपयांचें
(२) मालाचा पुरवठा दोन लक्ष मण व
(३) मागणी दोन लक्ष मणाची.

परंतु व्यापारधंदा भरभराटींत आल्यामुळें लोकांचे जवळ अधिक पैसा खेळता राहिल्यास सहाजिकपणेंच ज्वारी विकत घेणेंकरितां येथील लोकांजवळ सोळा लक्ष रुपयाचें ऐवजीं अठरा लक्ष रुपये आहेत असे समजूं; मात्र ज्वारीचा पुरवठा दोन लक्ष मणाचाच कायम असून मागणीही पूर्वींइतकीच म्हणजे दोन लक्ष मणाचीच आहे, तर ज्वारीचा दरमणीं भाव आठ रुपयाचे

ऐवजीं नऊ रुपये होईल, उलटपक्षीं उद्योगधंदा खालावल्यामुळें लोकांजवळील पैसा पूर्वींपेक्षां कमी झाल्यास ज्वारी खरेदी करण्यास पूर्वीं सोळा लक्ष रुपये होते त्याचे ऐवजीं आतां १४ च लक्ष रुपये आहेत असें आपण समजूं व ज्वारीचा पुरवठा व तिस मागणी पूर्वींइतकीच म्हणजे दोन लक्ष मणांचीच आहे असें धरल्यास ज्वारीचा दर मणीं भाव ८ रुपयाचें ऐवजीं सात रुपयांवर येईल.

तसेंच चलन सोळा लक्ष रुपयांचेंच कायम आहे, व मागणीही पूर्वींइतकीच आहे, पण ज्वारीचा पुरवठा मात्र दोन लक्ष मणाचें ऐवजीं अडीच लक्ष मण झाला, तर ज्वारीचा भाव दरमणीं आठ रुपयांपेक्षां कमी होईल. उलटपक्षीं ज्वारीचा पुरवठा दीड लक्ष मणच राहील, तर ज्वारीचा भाव दरमणीं आठ रुपयांपेक्षां जास्त राहील. त्याचप्रमाणें चलन सोळा लक्ष रुपयांचेच आहे, पुरवठाही दोन लक्ष मणच आहे; परंतु कांहीं कारणानें मागणी मात्र दोन लक्ष मणाचें ऐवजीं अडीच लक्ष मणाची झाली तर ज्वारीचा दरमणीं भाव आठ रुपयापेक्षां जास्त राहील. उलटपक्षीं "मागणी" दोन लक्ष मणाचे ऐवजीं दीड लक्ष मणच झाली, तर ज्वारीचा भाव आठ रुपयांचे खालीं घसरेल. या उदाहरणावरून असें दिसून येईल कीं, "चलन" मालाचा पुरवठा" व "त्यास असणारी मागणी" यांच्या कमीअधिकपणानुसार बाजारभावांत चढउतार होतात.

"चलन प्रचारांत केव्हां आलें ?"

मानव जातीची जसजशी प्रथमावस्थेतून प्रगति होत चालली तसतशा त्यांच्या गरजा नानाविध झाल्या. त्यामुळें कोणाहि एका व्यक्तीस आपल्या नानाविध गरजा भागविण्यास अवश्य असलेल्या जिनसांचें उत्पादन एकट्यासच करणें अशक्य होऊं लागलें, व त्यामुळें त्यास निरनिराळ्या व्यक्तींनीं उत्पन्न केलेल्या जिनसांच्या देवघेवीवरच अवलंबून राहणें भाग पडूं लागलें, त्याकाळीं आपणांस एखादी वस्तू हवी असल्यास तिच्याबद्दल, आपल्याजवळील आपणास नको, परंतु दुसऱ्यास हवी अशी वस्तू दुसऱ्यास द्यावी लागे व ती वस्तू द्यावी लागे, अशा पद्धतीस 'ऐनजिन्सी विनिमय (barter) असें

म्हणतात. एकाजवळ मुबलक प्रमाणांत असलेली वस्तू दुसऱ्याजवळ असतां कामा नये व दुसऱ्याजवळ मुबलक प्रमाणांत असलेली वस्तू पहिल्याजवळ असतां कामा नये, एकमेकांना एकमेकांच्या वस्तू इच्छाशा वाटल्या पाहिजेत आणि या दोघा माणसांची गांठ पडली पाहिजे; या सर्व अडचणी पार पडल्या तरच, त्या दोघांचा एकमेकांशीं व्यवहार होणें शक्य होई. ही अडचण ओळखून विनिमय सोपा करण्याकरितां देवघेवीचें सर्वमान्य साधन, म्हणून " चलन " प्रचारांत येऊं लागलें.

" चलन म्हणजे काय याची अधिक स्पष्ट कल्पना व चलनांची प्रगति "

चलन म्हणजे तें धातुमयच असलें पाहिजे असा सांप्रत सर्वसाधारण समज झाला आहे. ह्याचें कारण उघडच आहे कीं, आपल्याला लहानपणापासून धातूंचेंच चलन वापरणेंची संवय झालेली आहे. कोणत्याना कोणत्यातरी धातूहून भिन्न पदार्थ चलनासारखा वापरलेला आपणास शहरांत तरी सांप्रत दिसत नाहीं. देवघेवीचें विनिमयसामान्य म्हणजे चलन, जगाच्या निरनिराळ्या भागांत व निरनिराळ्या काळीं वेगवेगळें होतें. चामडें, गुरेंढोरें, धान्य, फळें, कापड, तेल, अंडीं, कवड्या, बदाम, तंबाखू वगैरे निरनिराळ्या सजीव निर्जीव वस्तूंचा चलन म्हणून पूर्वीचे काळीं उपयोग करणेंत आलेला इतिहासावरून दिसून येतो.

मानव जातीनें प्रथम आपल्या स्थितीला अनुरूप अशा पदार्थांचा उपयोग चलनाचें कामीं केला; व जसजशी मानव जात सुधारून तिचें रूपांतर समाजांत व राष्ट्रांत होऊं लागलें, दळणवळणाचीं नवीन नवीन साधनें उपलब्ध होऊं लागलीं, तसतशी चलनांत सुधारणा झाली, असें दिसुन येतें.

शिकारी युगांत, दुसरा पदार्थ विकत घेण्यास मनुष्याजवळ मारून आणलेली शिकारच काय ती असणार; तेव्हां मारलेल्या प्राण्यांचें चामडें हेंच काय तें, आपणास पाहिजे ती वस्तू विकत घेण्याचें साधन त्यांच्याजवळ होतें. ह्यामुळें त्या काळीं चामड्याचें चलन सुरू होतें.

ज्यावेळीं शिकारी अवस्था सोडून मनुष्य गुरेंढोरें बाळगून राहूं लागला, त्यावेळीं गाई, बैल, शेळ्या, मेंढ्या वगैरे जनावरांचा उपयोग चलनासारखा होऊं लागला. या अवस्थेनंतर मनुष्य शेतकी करूं लागला, त्यावेळीं शेतींत उत्पन्न केलेल्या धान्याचा देवघेवीचें साधन म्हणून चलनासारखा उपयोग होऊं लागला. परंतु मानव जातीच्या सुधारणेबरोबर, व नवीन नवीन दळणवळणाचीं साधनें उपलब्ध होऊं लागल्यामुळें ही पद्धति निरुपयोगी भासूं लागली. कारण कवड्या, बदाम वगैरे वस्तंचा उपयोग चलन म्हणून केल्यास घोडे, हत्ती, सोनें, चांदी वगैरे मौल्यवान् पदार्थ घेणें असल्यास गाड्याच्या गाडया कवडया व बदाम लागतील.

फळें, अंडीं, कोंबडीं, यांचा चलनासारखा उपयोग केल्यास वरील अडचण तर पडेलच; त्याशिवाय, वाहतुकींत तीं सुकून, फुटून किंवा मरून त्यांचे मोलांत कमीपणा येणार. बरें गाई, बैल, घोडे यांचा चलनासारखा उपयोग करावा तर वरील अडचणींत आणखी एक भर, ती म्हणजे जनावरें कांहीं कापतां येत नाहींत. एक बैलास ५ मण ज्वारी असा सौदा ठरल्यास १ मणच ज्वारी पाहिजे असल्यास एक पंचमांश बैल कांहीं कापून देतां येत नाहीं. शिवाय जनावरें हीं जिवंत प्राणी असल्यामुळें, चाळीस पन्नास कोसावरून आपणास पाहिजे असणारे, कापूस, तांदुळासारखें जिन्नस आणणें असल्यास त्या ठिकाणीं जाण्यास पूर्वींच्या काळीं पांचसहा दिवस सहज लागत; व हें जनावरांचें चलन इष्टस्थळीं पोहोंचेपर्यंत त्यास खावयास घालावें लागे, तसें करणें मोठें खर्चाचें होई. कांहीं वेळीं त्यांतील कांहीं जनावरें प्रवासांतच मरत. अशा रीतीनें चलन इष्टस्थळीं पोहोंचणेचे अगोदरच कमी झालें तर हा व्यवहार सोईचा व फायद्याचा कसा होणार!

"धातूमय चलन"

अशा अनेक अडचणींतून पार पडण्याकरितां, मोल, अविनाशित्व, विभाज्यता, वाहतुकींतील सुटसुटीतपणा वगैरे गुणामुळें धातूंचा उपयोग चलन म्हणून होऊं लागला, व चलनाचे लहान लहान भाग करतां आले व आपणास जरूर ती वस्तु, जरूर तेवढीच धातूंचीं नाणीं देऊन विकत

घेतां येऊं लागलीं. धातूंचा चलनासारखा उपयोग फार प्राचीन कालापासून झालेला आढळतो. वेदांतही नाण्यांचा "निष्क" ह्या शब्दानें उल्लेख आहे. परंतु लायकरगसाचे वेळीं लोकांस धातूंचीं नाणीं माहीत होतीं, याबद्दल दुमत नसल्यामुळें धातूंचें नाणें निदान तीन हजार वर्षांपासून तरी कांहीं देशांत चालू होतें असें दिसतें.

प्रारंभीं सोनें, चांदी, तांबें यांचे तुकडेच उपयोगांत आणीत; आणि प्रत्येक वेळीं त्यांचें वजन करून घेत. दरवेळीं वजनाचा खटाटोप आणि तुकड्यांतील सोनें अगर चांदी शुद्ध आहे कां नाहीं हें समजण्याची अडचण या दोन कारणामुळें या पुढील सुधारणा म्हणजे ठराविक वजनाची नाणीं प्रचारांत आलीं, ही होय. यापुढें अगदीं लहान सहान व्यवहारही सुलभतेनें करतां येऊं लागले. त्यावरील सरकारी शिक्क्यामुळें नाण्यांस लौकिक मान्यता तात्काळ प्राप्त होऊन, त्याच्या उपयोगापासून जी सोय झाली, ती सर्वांच्या इतकी अंगवळणीं पडली, कीं, नाण्यावांचून व्यवहार शक्यच नाहीं, अशी सार्वत्रिक समजूत झाली आहे.

"धातूमय चलनापासून झालेली सोय"

आपण गिरणींतून एक वार कापड चार आण्यास विकत घेतलें, तर आपणास आढळून येईल, कीं, तें तयार करण्यासाठीं कापूस देशाच्या दूर-दूरचे भागांतून आला, व रंग जर्मनीहून आला. व कारखान्यांचीं यंत्रें इंग्लंडहून आलीं, म्हणजे एक वार कापड करण्यासाठीं हजारों, लाखों लोकांची मदत लागली, व या सर्वांना वेतन आपण दिलेल्या चार आण्यांतून मिळालें.

ह्या रीतीनें धातूंच्या चलनानें देवघेवीस इतकें सहाय्य झालें, कीं, आपल्या चार आण्याचे लहान लहान असंख्य भाग करून ते वेगवेगळ्या ठिकाणच्या असंख्य लोकांना वाटतां आले. ही सोय धातूंच्या चलनाचा उपयोग जादूसारखा होऊनच झाली. प्राचीन काळच्या ऐनजिनसी विनिमयानें अगर धातूशिवाय इतर पदार्थांचा

चलन म्हणून उपयोग करण्यांत येत होता, त्या चलनपद्धतीनें आपल्या अगदीं साध्या गरजाही भागविणें कठिण झालें असतें.

भारी किंमतीचीं व मुख्य नाणीं सोनें व चांदी ह्या धातूंचीं, व किरकोळ व्यवहारासाठीं तांब्यासारख्या हलक्या धातूंचीं, अशी व्यवस्था साहजिकच प्रचारांत आली; व त्यामुळें सर्व प्रकारच्या देवघेवींत सुलभता प्राप्त झाली.

"धातूमय चलनांतील अडचण"

परंतु चलन, हें एकप्रकारचें माप असल्यामुळें तें सोन्य चांदीचें केल्यानें थोडीफार अडचण उत्पन्न होणेचा संभव असतो. शेर, फूट किंवा तोळा असलीं वजनें व मापें कोणत्याही पदार्थांचीं बनविलीं तरी बिघडत नाहीं. फूट लोखंडी असला काय किंवा लांकडी असला काय सारखेंच. त्याच्या कार्यक्षमतेंत फेर होत नाहीं. धातूच्या नाण्यांचें मात्र असें नाहीं. तीं इतर पदार्थांचें मूल्य दर्शविण्याचें काम करीत असत, म्हणजे दुसऱ्या जिनसांची नाण्याच्या मूल्याशीं तुलना होत असतां, खुद्द नाण्याचें मूल्य कमी जास्त होण्याचा संभव असतो. याचें कारण असें कीं, सोनें, चांदी, तांबें ह्या धातू खाणींत सांपडतात. एखादे वेळीं एखादी सोन्याची, चांदीची, किंवा तांब्याची एक अगर अनेक खाणी सांपडल्या, तर आपणास पाहिजे त्यापेक्षां सदर धातूंचा पुरवठा अधिक होणेचा संभव आहे. उलटपक्षीं व्यापारधंदा भरभराटीस आला असतां, सदर धातूच्या अस्तित्वांत असणाऱ्या खाणींतून आपणास जरूर तितक्या प्रमाणांत धातू न निघाल्यास व नवीन खाणी न सांपडल्यास, पुरवठा कमी पडणेचा संभव असतो. शिवाय सोनें आणि चांदी या धातूंचा दागिने, भांडीं, वगैरे जिन्नस करणेकडे उपयोग होत असतो. म्हणून सदर धातूंचा पुरवठा व त्यास असणारी मागणी याच्याप्रमाणें सदर धातूंचें मूल्यांत चढउतार होणें स्वाभाविक आहे. आणि त्या चढउतारांचा परिणाम त्यापासून बनविलेल्या नाण्यांच्या मूल्यांत होणें अपरिहार्य आहे.

या अडचणींतून सहजरीतीनें पार पडणेंकरितां, नाण्यांचा पुरवठा लोकांच्या गरजेप्रमाणें बिनहरकत कमीजास्त होऊं देणें हा मार्ग आहे.

ठराविक वजनाचें सोनें किंवा चांदी दिली असतां, सरकारनें आपल्या टांकसाळींतून ठराविक नाणीं बिनतक्रार पाडून देणें आणि बाजारांत सदर धातूस जास्त भाव आल्यास नाणीं वितळण्याचा हक्क पूर्णत्वानें लोकांस असणें, ह्या दोन प्रकारच्या योजनेनें नाण्यांतील धातूच्या मोलाचें प्रमाण बाजारांतील धातूच्या मोलाशीं कायम राखता येतें. (या चलन पद्धतीस Automatic and self-adjusting system of currency असें म्हणतात) हें खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

(अर्थशास्त्राचें एक तत्व असें आहे कीं, सोनें धातू किंवा रुपें धातू यांचा सांठा कमीजास्त होण्यानें बाजारभावांत फरक होत नाहींत. त्यांचीं नाणीं पाडून तीं देशांत खेळूं लागलीं म्हणजे त्याच्या कमीअधिकपणानुसार बाजारभावांत (पुरवठा व मागणी कायम असतां) चढउतार होतात. इंग्लंडमध्यें सुवर्ण चलन चालू होतें, त्यावेळीं एका पौंडांत सुमारें ¼ औंस सोनें धातु असे (१ औंस सोनें टांकसाळींत अगर बँक ऑफ इंग्लंडमध्यें दिलें असता ३ पौंड १७ शिलिंग १०½ पेन्स मिळत असत, पण येथें उदाहरणाच्या सोईकरितां १ औंस सोनें धातू म्हणजे ४ पौंड असें प्रमाण धरलें आहे.)

उदाहरणाच्या सोईसाठीं आपण असें समजूं, कीं, सोन्याशिवाय इंग्लंडांत दुसरा पदार्थच नाहीं, व तेथें १००० औंस सोनें धातू असून ४००० पौंडाचें नाणें आहे. तेव्हां १ औंस सोन्यास ४ पौंडाचें नाणें हें प्रमाण बसतें, म्हणजे १ पौंडांत ¼ औंस सोनें धातू हें प्रमाण बसलें.

परंतु इंग्लंडमध्यें कांहीं कारणांनीं सोन्याचा सांठा वाढून तो २००० औंस झाला, व पौंडाचें नाणें मात्र ४ हजारच कायम राहिलें; तर २ पौण्डास १ औंस सोनें बाजारांत मिळूं लागेल, म्हणजे पौंडांतील ¼ औंस सोन्यास बाजारांत ½ औंस सोनें मिळूं लागेल. परंतु अशी स्थिति कायम राहणें शक्य नाहीं. फायद्याच्या आशेनें लोक आपल्याजवळचें सोनें सरकारी टांकसाळींत देऊन पौंडाचें नाणें पाडून घेतील, तें इतकें कीं, शेवटीं

बाजारांत पूर्वीप्रमाणें एका पौंडास फक्त १/४ औंसच सोनें मिळूं लागेल; म्हणजे शेवटीं इंग्लंडमध्यें ८००० पौंडाचीं नाणीं खेळतीं राहतील, व अशा रीतीनें पौंडांतील सोन्याच्या मोलाचें प्रमाण बाजारांतील १/४ औंस सोन्याच्या मोलाच्या बरोबर राहील.

उलटपक्षीं इंग्लंडमध्यें कांहीं कारणानें पूर्वी असलेला १००० औंस सोन्याचा सांठा कमी होऊन तो ५०० औंसावर उतरला, परंतु पौंडाचें नाणें मात्र ४००० च कायम राहील तर, ८ पौंडास एक औंस सोनें असें प्रमाण पडेल, म्हणजे पौंडांत असलेल्या १/४ औंस सोन्याला बाजारांत १/८ औंस सोनें मिळूं लागेल; अर्थात पौंड जवळ बाळगणेंपेक्षां सोनें धातूच जवळ असणें फायद्याचें दिसतांच लोक तावडतोब पौंड टांकसाळींत नेऊन वितळवून त्याचें सोनें करतील व बाजारांत विकतील. पौंड इतके अटविले जातील कीं शेवटीं १ पौंडांतील १/४ औंस सोन्यास बाजारांत १/४ औंस सोनें मिळूं लागेल, म्हणजे त्यावेळीं देशांत फक्त २००० पौंडच नाणें शिल्लक राहील, व अशा रीतीनें पौंडाच्या नाण्यांतील सोनें धातूचें मोल बाजारांतील सोनें धातूच्या मोलाचें प्रमाणांत राहील.

" मागणी व पुरवठा या न्यायानें (Demand and Supply) नाण्याच्या किंमतींतील चढउताराचे बाजारभावावर होणारे परिणाम "

गहूं, तांदूळ वगैरे जिन्नस ज्याप्रमाणें स्वस्त अगर महाग होतात, तोच न्याय ज्या धातूचें नाणें केलें असतें त्यास लागू आहे. परंतु ही धातु-अर्थात् त्या धातूचें नाणें—स्वस्त झालें म्हणजे नाणेंच स्वस्त झालें असें न म्हणतां एकंदर पदार्थमात्राची किंमत वाढली असें म्हणणें लोकांस सोईचें व समजुतीचें पडतें. सर्व पदार्थांची किंमत नाण्यांत करतात आणि नाणेंच स्वस्त झालें ऊर्फ पुष्कळ झालें म्हणजे सर्व पदार्थांबद्दल किंमतीच्या रूपानें त्या त्या पदार्थांचे मालकास पुष्कळ नाणें मिळूं लागतें. कोणत्याही पदार्थास पुष्कळ नाणें द्यावें लागलें म्हणजे तो पदार्थ महाग झाला, असें म्हणण्याचा प्रघात आहे. नाणें स्वस्त झालें म्हणजे सर्वच पदार्थांस पुष्कळ नाणें द्यावें

लागतें; नाणें स्वस्त झालें, कां पदार्थ महाग झाला, हें पहाणें असेल तर त्यास एकच उपाय आहे. सर्वच पदार्थ उत्पादनाच्या कमताईमुळें कधीं एकदम महाग होऊं शकत नाहींत; यंदाच्या वर्षी गहूं महाग झाले तर पुढच्या वर्षी तांदूळ महाग होतात, परंतु इतर पदार्थांची किंमत आहे तशीच राहते. पण गहूं, तांदूळ, कापड, लोखंड, कापूस वगैरे सर्वच जिन्नस एकदम महाग झाले म्हणजे नाण्याच्या किंमतींत कांहीं फेरफार झाला आहे असें अनुमान काढण्यास कांहींच हरकत नाहीं.

त्याचप्रमाणें धातू, अर्थात् त्या धातूचें नाणें महाग झाल्यामुळें, कां पदार्थांचें उत्पादन जास्त झाल्यामुळें स्वस्ताई झाली, हें पाहणें असल्यास, एखाद्या दुसऱ्या पदार्थाची स्वस्ताई झाल्यास तो परिणाम त्या पदार्थाच्या अधिक प्रमाणांत झालेल्या उत्पादनाचा, व सर्वच पदार्थ एकदम स्वस्त झाल्यास तो परिणाम नाणें महाग झाल्याचा होय असें समजावें.

या ठिकाणीं दुसरी अशीहि एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, नुसतें नाणें स्वस्त झालें म्हणजे तेवढ्यानें कोणताहि देश श्रीमंत अगर सुखी होत नाहीं. "पैसा अगर सोनें कोणी खात नाहीं अगर चावीत नाहीं," अशी जी आपल्या लोकांत म्हण आहे, तिची सत्यता या ठिकाणीं पूर्णपणें दिसून येते. खरी श्रीमंती अगर सुख, उपभोगास लागणाऱ्या वस्तूंच्या समृद्धीवर अवलंबून आहे.

एखाद्या खेडेगांवांत पाटलाची हजामत करून पावशेर ज्वारी घेऊन जाणारा न्हावी, लंकेतील राक्षसेंद्राची हजामत करून मिळालेल्या सोन्याच्या चार विटांनीं बाजारांत पावशेर धान्य खरेदी करणाऱ्या न्हाव्यापेक्षां कमी सुखी आहे असें कधींहि म्हणतां येणार नाहीं. नाणें म्हणजे देवघेवीचें एक साधन आहे, तें देऊन उपभोगास लागणाऱ्या वस्तू किती प्रमाणांत मिळूं शकतात, यावर माणसाची श्रीमंती अथवा गरिबी अवलंबून असते, हें वरील उदाहरणावरून दिसून येईल

टीपः — मुख्य चलन (नाणें) (Standard money).

ज्या धातूचें तें नाणें बनविलेलें असतें, ती धातू आणून दिल्यास तिचीं ठराविक वजनाचीं नाणीं, सरकारी टांकसाळींतून पाडून मिळण्याची सवलत

१०६४०

जनतेस असते, व देशांत प्रचलित असलेल्या इतर धातूंच्या नाण्यांचा, ज्या नाण्याचा अमूक इतका हिस्सा असें प्रमाण बांधलेलें असतें, आणि जें कर्जफेडीचे कायदेशीर व अमर्याद (Unlimited) चलन मानलें जातें, तें नाणें त्या देशाचें मुख्य नाणें समजलें जातें.

उपनाणें (Token Coin):—ज्या नाण्याची कायदेशीर किंमत त्यांतील असलेल्या धातूच्या किंमतीपेक्षां अधिक असून, ती धातू सरकारी टांकसाळींत नेऊन देऊन ठराविक वजनाचीं नाणीं पाडून घेण्याची सवलत जनतेस नसते, व जें नाणें दुसऱ्या एखाद्या नाण्याचा अमूक इतका हिस्सा असें समजलें जातें, आणि कर्जफेडींत व इतर देवघेवींत जें ठराविक मर्यादेबाहेर नाकारतां येतें, त्यास त्या देशातील उपनाणें असें म्हणतात.

" द्विचलन पद्धति "

साधारणतः १४ व्या शतकापासून १९ सावे, शतकाचे सुरवातीपर्यंत सोनें व चांदी या दोनही धातूंचा मुख्य चलन म्हणून उपयोग युरोपमध्यें करण्यांत येत होता. सोन्याचीं व चांदीचीं मुख्य नाणीं एकदम चालू होतीं. व त्याचा परस्पर संबंध कायद्यानें ठरविलेला असे. प्रत्येक देशामध्यें द्विचलन पद्धतींतील या दोन चलनामधील परस्पर संबंध वेगवेगळया प्रमाणांत ठरविल्याकारणानें व आज सोन्याचीं नाणीं जास्त पाडून तर उद्या चांदीचीं जास्त काढून हें प्रमाण कायम न ठेवतां आल्यामुळें भयंकरच घोटाळा माजूं लागला.

अठराव्या शतकांत इंग्लंडाचा व्यापार जगभर पसरून त्याची भरभराट झाली व त्यामुळें इतर देशांतून इंग्लंडमध्यें सोन्याची आयात फारच झाली, आणि म्हणून इंग्लंडला सोन्याचेंच चलन सुरू करावें व चांदीचें नाणें उपनाण्यांत काढावें अशी इच्छा झाली. त्याप्रमाणें इंग्लंडनें १८१६ साली सुवर्णचलन सुरू केलें. पुढें १८७१ चे सुमारास जर्मनीला फ्रान्सकडून, (फ्रँको-जर्मन युद्धामध्यें फ्रान्सचा पराभव होऊन जर्मनीचा विजय झाल्यामुळें) बरीच मोठी रक्कम खंडणी म्हणून मिळाली, त्यामुळें जर्मनीसही आपण इंग्लंडप्रमाणें सुवर्णचलन सुरूं करावें असें वाटूं लागलें, म्हणून

जर्मनीनेंहि सुवर्णचलन सुरू केलें,त्यामुळें चांदीस मागणी कमी झाली.त्यामुळें फ्रान्सच्या चलनपद्धतींत बराच घोंटाळा माजूं लागला म्हणून फ्रान्सनेंही १८७४ मध्यें सुवर्णचलन सुरू केलें. याचा परिणाम चांदीचा भाव आणखी उतरण्यांत झाला, व याच सुमारास रुप्याच्या खाणी अधिक सांपडून त्यांतून चांदीची पैदास जास्त होऊं लागली, व वरील देशांनीं सुवर्णचलन सुरू केल्यामुळें सोन्याचा भाव चढूं लागला, यामुळें सोन्याचांदीचे पूर्वींचें १ तोळा सोन्यास १५½ तोळे चांदी हें प्रमाण न टिकतां तें १ तोळा सोन्यास २३ तोळे चांदी येथपर्यंत गेल्यामुळें, हळुहळूं लॅटिन-युनियनपैकीं डेनमार्क, स्वीडन, नॉर्वे, हॉलंड, इटली, स्वित्सर्लंड वगैरे देशांनींही सुवर्णचलनच सुरू केलें, त्यामुळें चांदीस दुय्यमपणा आला; व द्विचलनपद्धतीचा बोज॰ वारा उडाला. सन १९३१ च्या मध्यापर्यंत चीनखेरीज जगांतील बहुतेक राष्ट्रांनीं मुख्य कायदेशीर चलन म्हणून सोन्याचाच उपयोग केला होता.

" निर्दोष चलनपद्धति "

विनिमयाचें सर्वमान्य साधन म्हणजे चलन; आणि तें दुसऱ्यास देऊन त्याचा मोबदला आपणांस हव्या असलेल्या जिनसा घेणें हाच त्याचा मुख्य उपयोग. सरकारी शिक्क्यानें चलनास सार्वत्रिक मान्यता प्राप्त होते; व लोकांचा त्यावर विश्वास बसतो. म्हणून कायद्यानें केवळ अमक्या नाण्यांची किंमत अमूक आहे, असें म्हणून भागणार नाहीं. नाण्याची कायदेशीर किंमत व नाण्यामध्यें वापरलेल्या धातूची किंमत (Intrinsic Value of the metal) हीं जर एकच असतील, तर ती नाण्याची पद्धत निर्दोष व विशेष श्रेयस्कर आहे, असें मानण्यांत येते.

नाण्यावर मारलेल्या किंमतीच्या शिक्क्यापेक्षां त्यांतील धातूची किंमत कमी असेल, तर त्या नाण्यावर असलेल्या किंमतीच्या शिक्क्यानुसार त्याचा देशांतले देशांत त्या किंमतीप्रमाणें व्यवहारही होईल, परंतु केवळ एका धातूचा तुकडा या दृष्टीनें जगाचें बाजारांत त्याची किंमत त्या धातूच्या तितक्याच वजनाच्या तुकड्याएवढीच होईल, व यामुळें परदेशच्या देव-घेवींत अडचण पडून कित्येक वेळां नुकसानही सोसावें लागेल; तें कसें हें

आपणास हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचा विचार करतांना उत्तम रीतीनें दिसून येईल.

"कागदी चलन"

आपण हें पाहिलेंच आहे कीं, विनिमयाचें सर्वमान्य साधन म्हणजे चलन, आणि तें दुसऱ्यास देऊन त्याच्या मोबदला आपणास हव्या असलेल्या जिनसा घेणें हाच त्याचा उपयोग. सरकारी शिक्क्यानें चलनास सार्वत्रिक मान्यता प्राप्त होते; व लोकांचा त्यावर विश्वास बसतो. कायद्याचा अधिकार व लोकांचा विश्वास ह्यांच्या जोरावर समाजांत चलन खेळतें, आणि अगदीं सूक्ष्म दृष्टीनें पाहतां नाण्याच्या स्वरूपांतील पैसाहि तिकिटासारखाच आहे. त्यास अंगची अशी कांहीं किंमत नसली तरी हरकत नाहीं. कारण त्याचें कार्य देवघेवीचें साधन होणें एवढेंच आहे. कापड मोजण्याचा गज चांदीचा असला काय, किंवा लांकडाच्या पट्टीचा असला काय, लांबी मोजण्याचें काम दोघांकडूनही सारखेंच होतें. चलन हें पदार्थांचें मोल मोजण्याचें माप आहे. परंतु पैशाचा पुरवठा वाढला असतां त्याचें मोल म्हणजे पदार्थ विकत घेणेचें सामर्थ्य कमी होतें. म्हणजेच बाजारभाव चढतात. ह्याच्या उलट चलनाचा पुरवठा कमी असतां त्याचें मोल वाढतें आणि बाजारभाव उतरतात. चलन हें केवळ विनिमय साधन आहे; तें कांहीं साध्य नव्हे. तथापि सामान्यतः पदार्थ विकत घेण्याच्या साधनासही अंगची किंमत असावी असें लोकांस वाटणें सहाजिक आहे. नाणीं जवळ बाळगण्याची व पुढच्या उपयोगासाठीं गांठीं ठेवण्याची अवश्यकता आर्थिक प्रगतीबरोबर कमी कमी होत जाऊन लोकांस चलनाच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटूं लागली. चलनाचा वास्तविक उपयोग तें दुसऱ्यास देता यावें, खर्चता यावें हा आहे. म्हणूनच चांदी, सोन्यासारख्या मौल्यवान् वस्तूंच्या ऐवजीं कागदाचा उपयोग करण्यांत समाजाचा फायदा असून सोईस्करही आहे, असें दिसून आल्यामुळें 'कागदी चलन' प्रचारांत आलें. मात्र नोटावर दर्शित केलेली रक्कम मागतांच मिळेल असा लोकांचा विश्वास बसण्याकरितां सदर कागदी चलन

कोणासही वाटेल त्यावेळीं देशांतील धातूंच्या चलनांत रूपांतरित करण्यास अडचण पडणार नाहीं इतकें धातूंचें चलन प्रचारांत ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे, म्हणजे भागतें. राष्ट्रीय बँका हें कार्य करतात.

" मध्यवर्ती बँका "

"कागदी चलन" प्रचारांत कसें आलें याचा विचार करतांना, बँकांची चलनपद्धतींत उपयुक्तता किती आहे याचा विचार करणें अत्यंत अगत्याचें आहे म्हणून आपण आतां तिकडे वळूं.

मध्यवर्ती बँकः—देशांतील कागदी चलनाचें, व्यापार व उद्योगधंद्यांच्या जरूरीप्रमाणें प्रसरण व आकुंचन करणें, व्यापारी कर्जाचा दर (Bank rate) ठरविणें, परराष्ट्रीय हुंडणावळ स्थिर राखणें, आणि देशांतील इतर बँकांना जरूर तेव्हां मदत करणें, हीं कामें पार पाडण्याची जबाबदारी ज्या बँकेवर असते तिला मध्यवर्ती बँक असें म्हणतात. (बहुतेक देशांतील मध्यवर्ती बँका खाजगी भांडवलावर उभारलेल्या असतात. तरी राष्ट्रीय महत्वाची संस्था म्हणुन तिच्यावर तद्देशीय सरकारचें नियंत्रण असतें.)

प्रत्येक सुधारलेल्या देशामध्यें बँकाचा प्रसार पुष्कळच झालेला असतो. प्रत्येक बँकेस तिच्याजवळ ज्या प्रमाणांत ठेवी असतील, त्या मानानें कांहीं रक्कम रोकड ठेवावी लागते; व कांहीं रक्कम केव्हांही उभी करितां येईल, अशा रीतीनें गुंतवावी लागते; तथापि अडीअडचणीचे वेळीं अगदीं सुस्थिती-मध्यें असलेल्या बँकेसही जरूर तेवढी रक्कम उभी करणें कठीण जाईल. प्रत्येक बँकेसाठीं स्वतंत्र रीतीनें आपापली व्यवस्था करण्यासाठीं बरीच रक्कम केवळ केव्हांतरी जरूर पडल्यास उपयोगी पडावी म्हणून कुलुपांत ठेवावी लागते. जर सर्व बँकांनीं आपल्या देणें असलेल्या रकमेच्या कांहीं ठराविक अंशा-इतकी रक्कम एका मध्यवर्ती बँकेकडे ठेविली, तर त्या बँकेजवळ बरीच मोठी रक्कम जमून तिचा विनियोग कोणत्याहि गरजू बँकेस तात्कालिक मदत देण्याकडे करितां येईल; व त्याप्रमाणेंच इतर बँकांचेजवळ अल्प मुदतीच्या हुंड्या असतील तर त्यांचेबद्दलही योग्य व्याज कापून घेऊन रकमा अदा करितां येतील. अशा रीतीनें एक राष्ट्रीय मध्यवर्ती गंगाजळी निर्माण होऊन

चलनाची बचत होऊन जरूर तेव्हां मध्यवर्ती बँकेकडून इतर बँकांना मदत मिळते.

शिवाय नाण्यांच्या ऐवजीं कागदी चलन वापरणें लोकांस जास्त सोईचें वाटतें, तसेंच तें चलन काढणें बँकास फायद्याचें असतें. नाण्याच्या ऐवजीं कागदाचा तुकडा गिऱ्हाइकांस देणें म्हणजे तितक्या रकमेवरील व्याज फुकट मिळविणें, व त्या रकमेनें खेळतें चलन वाढविणें होय. जसजसे व्यापार, व उद्योगधंदे वाढतात, तसतसें या वाढलेल्या व्यवहारास पुरेल इतकें चलन पुरवठ्यास येत नाहींसें होतें. यासाठीं धातूचें चलनाची बचत व्हावी म्हणूनही नोटा काढण्यांत येतात. सुरवातीस सर्वच बँका नोटा काढीत असत, व अशा रीतीनें त्यांचेजवळ ठेवींच्या रूपानें असलेल्या रकमेपेक्षां कितीतरी जास्त रक्कम नोटांचे स्वरूपांत बाजारांत खेळती राहूं लागली. बँकेकडे असलेल्या सर्वच ठेवींना एकदम मागणी येत नाहीं. ह्या अनुभवावरून ठेवींच्या रकमेपेक्षां जास्त रकमांच्या नोटा काढतां येतात. सर्वच बँकांना नोटा काढणेचा हक्क असल्यास बराच घोटाळा माजतो (इंग्लंडमध्यें १८४४ सालचे सुमारास अनेक बँका नोटा अधिक काढून त्यास तारण कमी ठेवल्यामुळें बुडाल्या) असें दिसून आल्यावरून हल्लीं बहुतेक देशांत नोटा काढणेचा हक्क फक्त राष्ट्रांतील मध्यवर्ती बँकेसच असतो.

केवळ नाणें वापरणेस गैरसोयीचें म्हणून तें गंगाजळींत ठेऊन त्याच्या किंमतीच्या नोटा काढण्यानें सोन्याची किंवा चांदीची बचत मुळींच होत नाहीं. उलटपक्षीं जरूर तेवढें राखीव सोनें शिल्लक ठेवून वाढत्या व्यापारास लागणारें चलन पुरवितां येण्याची नोटा काढण्यापासून चांगलीच सोय होऊं शकते. मात्र नोटांच्या रकमेचा ठराविक अंश रोख सोन्याच्या किंवा नाण्यांच्या रूपानें शिल्लक पाहिजे.

अशा रीतीनें मध्यवर्ती बँकेचें कार्य दोन प्रकारचें असतें, तिचा एक उपयोग देशांतील बँकांची बँक ह्या नात्यानें होतो व दुसरें कार्य म्हणजे देशांतील व्यापारी व औद्योगिक घडमोडीत लागणारें चलन व्यवस्थित रीतीनें व जरूरीप्रमाणें योग्य प्रमाणांत समाजांत खेळविणें हें होय. हीं दोन कामें वेगवेगळ्या स्वरूपाचीं असलीं, तरी तीं एकाच

मध्यवर्ती बँकेनें करणें श्रेयस्कर असतें. सामान्य बँकांस योग्य मर्यादेंत रोखीची शिल्लक ठेवावी लागते, तिच्यामध्यें मध्यवर्ती बँकेच्या पाठिंब्यामुळें बचत करतां येते. नोटा काढण्याच्या सवलतीमुळें मध्यवर्ती बँकेचें ह्या विषयींचें सामर्थ्य दांडगे असतें. ठेवींच्या सुरक्षिततेसाठीं ठेवलेले निरनिराळे 'रिझर्व्ह' व नोटाबद्दल रोकड देतां यावी म्हणून आवश्यक असलेला 'रिझर्व्ह' यांचे एकंदर परिमाण कमीतकमी व्हावे, म्हणून दोन्ही एकाच संस्थेच्या हुकमतीखालीं असणें सोईचें असते. शिवाय देशांतील चलनाच्या टंचाईवर व मुबलक प्रमाणावर बँकांच्या व्याजाचे दर अवलंबून असल्याकारणानें जर चलन निर्माण करणें व त्यावर सत्ता चालविणें हें काम एका संस्थेकडे व व्यापारी कर्जाचा दर म्हणजे "बँकरेट" ठरविणें दुसऱ्या संस्थेकडे असेल, तर त्या दोन्हींचा मेळ नीट बसणार नाहीं. हीं दोनहि कार्यें हल्लींच्या गुंतागुंतीच्या आर्थिक रचनेमध्यें एका संस्थेकडेच असणें अगत्याचें आहे. मध्यवर्ती बँका हीं दोन्हीं कार्यें करतात.

"कागदी चलनांत हुंड्यांचें स्थान"

'हुंडी' हें एक धनकोनें रिणकोस लिहिलेलें पत्र असतें; व त्यामध्यें लिहिलेली रक्कम रिणकोनें एका ठराविक इसमास ठराविक वेळीं द्यावी अशी धनकोनें आज्ञा केलेली असते. हुंडी ही लेखीच असली पाहिजे व तींत रक्कम देण्याचा हुकूम अगदीं बिनशर्त असला पाहिजे. एखादी अट क्वचित् नमूद केली असल्यास ती अट केव्हांतरी पार पडेलच अशी शक्यताच नव्हे तर खात्री पाहिजे. ज्याला रक्कम मिळावी असें लिहिलेलें असेल त्यानें हातीं हुंडी येतांच जो पैसे देण्यास बांधलेला असेल, त्याचेकडे जाऊन तिच्यावर सही मिळविली पाहिजे. ती सही हुंडीचा स्वीकार होऊन सही करणारा योग्य वेळीं रक्कम देण्यास तयार असल्याचें द्योतक वचन आहे. उ० "अ" नें काढलेली हुंडी "ब" नें स्वीकारली म्हणजे त्यानें सही करून रक्कम देण्याचें कबूल केलें, म्हणजे ती '**हुंडी स्वीकारली,**' असें म्हणतात. ज्याला रक्कम मिळावयाची त्याचें नांवापुढें 'or order' असे शब्द असले तर त्याला वाटेल त्या इसमास हुंडीची रक्कम मिळावी अशी

योजना करितां येते; ज्याला रकम मिळावी अशी त्याची इच्छा असते त्याचें नांव लिहून खालीं सही केली म्हणजे झालें.

हुंडीची रक्कम ज्या इसमास मिळावयाची असते, त्यानें ती हुंडी एकदा सत्कारून आणली म्हणजे कोणच्याहि नांवाचा शेरा लिहून त्यास ती दुसऱ्यास विकतां येते, व तो विकत घेणारा पुन्हा शेरा लिहून ती हुंडी इतरांना विकूं शकतो. अशा रीतीनें एका मागून एक वाटेल तितके शेरे मारतां येतात. या रीतीनें हुंड्यांच्या योगानें राष्ट्रीय चलनांत भर पडते.

हुंड्यांची पद्धति हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. प्रवास करणें पूर्वीं फार धोक्याचें असे. तेव्हां अशा प्रसंगीं मोठ्या पतवाल्या सावकाराकडे रकमा ठेऊन त्यांचेकडून हुंडया घेऊन, जरूर तेव्हां त्यांचे पैसे वसूल करतां येत. म्हणजे हल्लींच्या प्रवाशांना ज्याप्रमाणें बँका वेगवेगळ्या शहरीं रकमा मिळण्याची सोय ड्राफ्टस वगैरेनीं व्हावी अशी योजना करतात, तीच सोय हुंडयांचे योगानें पूर्वीं होत असे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

पेढीवाल्यांच्या हुंडया, देणीं-घेणीं भागविण्याकरितां व कर्जें काढण्या साठीं, त्याचप्रमाणें दुसऱ्या ठिकाणीं रकमा पाठविण्यासाठीं, मुख्यतः काढलेल्या असतात; त्यांच्या पाठिमागें मालाचें तारण असतेंच असें नाहीं. मालाचें तारणावर काढलेल्या हुंडयास "ट्रेडबिल्स" असें म्हणतात, व केवळ पैशाची देवघेव करण्यासाठीं काढलेल्या हुंडयास "फिनॅन्सबिल्स" असें म्हणतात. बँका 'ट्रेडबिल्स" विशेष पसंत करतात, कारण मालाच्या विक्रीची किंमत उगवण्यासाठीं काढलेल्या हुंडयांच्या मागें कालांतरानें विकला जाणारा माल असल्यामुळें त्यांच्यामध्यें एक प्रकारचा भरीवपणा असतो; तसा दुसऱ्या प्रकारच्या (फिनॅन्सबिल्स) हुंडयामध्यें नसतो; आणि त्यांचा उपयोग संपत्तीच्या उत्पादन व चलन अशा कामाकडे केला जाईल अशी खात्री नसते.

"चेक म्हणजे काय ? व व्यवहारांत त्याचा उपयोग"

राष्ट्रीय मध्यवर्ती बँका कागदी चलन काढून देशांतील देवघेवींत सुलभता

कशी उत्पन्न करितात हें आपण पाहिलें; याशिवाय देशांतील सर्वच लहान मोठ्या बँकांत जमा होणाऱ्या रकमांचे तीन वर्ग असतात, पहिला वर्ग मुदतबंद ठेवींचा, दुसरा वर्ग सेव्हिंग्ज डिपॉझिटस्‌चा व तिसरा वर्ग चालू खात्यावरील खातेदारांनीं ठेवी ठेविलेल्या असतात. सदर ठेवी ठेवणारे खातेदार आपणास एखाद्याचें देणें असल्यास आपल्या ठेवीपैकीं कांहीं रक्कम सदर देणेदारास द्यावी असा आपले बँकेस लेखी हुकूम देतात, व ती बँक सदर रक्कम लेखी हुकुमांत नमूद केलेल्या व्यक्तीस देते. या लेखी हुकमासच व्यवहारांत 'चेक' असें म्हणतात. बँका आपले खातेदारास ही जी सवलत देतात, त्यामुळें सदर चेकचा विनिमय साधन म्हणून व्यवहारांत उपयोग होतो, व अशा रीतीनें राष्ट्रीय चलनांत भर घालणेचें कार्य देशांतील सर्वच लहान मोठ्या बँका करितात. हें कसें होतें याची स्पष्ट कल्पना खालील उदाहरणावरून येईल. उ० 'क्ष' नें एका भुसारमालाचे व्यापाऱ्याकडून ५० रुपयांचे तांदूळ आणलें. 'क्ष' ची येथील एका बँकेंत चालू खात्यावर कांहीं रक्कम आहे म्हणून 'क्ष' नें भुसाराचे व्यापाऱ्यास तांदुळाबद्दलचे देणें असलेल्या ५० रुपयाचे रकमेचा चेक सदर बँकेवर दिला. म्हणजे "माझे खात्यावर जमा असलेल्या रकमेपैकीं रक्कम रुपये पन्नास सदर "अ ब क" यांस देणें," असा बँकेस हुकूम केला. या भुसाराचे व्यापाऱ्यास दुकानाच्या भाड्याबद्दल दुकानाचे मालकास कांहीं रक्कम देणें होती त्यांत हा ५० रुपयाचा चेक, दुकानचें मालकाचें नांव चेकचे मागील बाजूस लिहून आपली सही करून दिला.

वरील दुकानाचें मालकास, घेतलेल्या कापडाबद्दल कापड कानदारास कांहीं पैसे देणें होते, त्याकरितां त्यानें भुसाराचे व्यापाऱ्याकडून दुकान भाड्याबद्दल आलेला ५० रुपयाचा चेक मागें सांगितल्याप्रमाणें, चेकचे मागें कापड दुकानदाराचें नांव लिहून आपली सही करून दिला. या कापडाचे दुकानदारास, त्यानें वापरलेल्या विजेच्या प्रवाहाबद्दल इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीस बिल भरणें होतें, तें बिल हा चेक, इलेक्ट्रिक कंपनीचें नांव लिहून व आपली सही करून इलेक्ट्रिक कंपनीस देऊन बिल चुकतें केलें,

व इलेक्ट्रिक कंपनीनें तो चेक आपले खात्यावर जमा करण्याकरितां बँकेंत पाठविला.

'क्ष'नें भुसाराच व्यापाऱ्यास दिलेला ५० रुपयांचा चेक दुकानाचा मालक, कापड दुकानदार व इलेक्ट्रिक कंपनी इतक्या लोकांचे हातांत खेळून शेवटीं बँकेंत जमा होणेस गेला. या व्यवहारांत बँकेस सदर चेकचे पैसे द्यावे न लागतां, इतक्या लोकांच्या देण्यायेण्याची वजावाट परभारेंच झाली व "क्ष" चे पैसे बँकेस निर्वेध वापरणेस सांपडले. अशा रितीनें चेकचे उपयोगानें चलनाची बचत होते. या व्यवहारांत चेकचा संबंध नसतां तर ५० रुपयांच्या चलनी नोटा अगर रोकड रुपये यांचा उपयोग करावा लागला असता; तो करावा न लागतां तें काम चेकनें केलें म्हणजे या चेकनें चलनांत ५० रुपयांची भर घातली असें दिसून येईल. चेक प्रमाणेच व्यापारी हुंड्यांचाही उपयोग राष्ट्रीय चलनांत भर घालणेकडे होतो हे आपण मागें पाहिलेंच आहे. हल्लींच्या सुधारलेल्या जगांत राष्ट्रहिताचे दृष्टीनें 'बँकिंग' या संस्थेस विलक्षण महत्व प्राप्त झालें आहे.

बँकिंगचें महत्वः—समाजांतील सर्व वर्गांचा चरितार्थ नीट चालावा, एवढ्यासाठीं राष्ट्रामध्यें संपत्तीचें उत्पादन, चलन, विनिमय आणि विभागणी ही समाधानकारक रीतीनें होणें आवश्यक आहे. सध्याच्या यांत्रिक युगांत तर भांडवलावांचून, आणि तें मोठ्या प्रमाणांत असल्यावांचून एकही पाऊल पुढें पडेनासें झालें आहे. आधुनिक कालांत भांडवल, क्रेडिटच्या किंवा चलनाच्या स्वरूपांत वापरावें लागते. लोकांनी आपल्या कमाईतून संपत्तीची, बचत शक्य तितक्या कार्यक्षम पद्धतीनें जास्तींत ज्यास्त उपयोग करून घेण्यावरच समाजाची आर्थिक स्थिती बरीवाईट असणें पुष्कळ अंशांनीं अवलंबून रहाणार हें क्रमप्राप्तच आहे. हें सर्व बँकिंग संस्था कशी करूं शकते हें पाहणें हा एक स्वतंत्र निबंधाचाच विषय असलेंमुळें हा विषय येथेंच सोडून आपण आतां हुंडणावळ म्हणजे काय याचा विचार करूं.

हुंडणावळ (Exchange)

आपल्या सर्वच गरजा भागविणेंकरितां लागणाऱ्या जिनसांचें उत्पादन आपापल्या देशांतच करण्याइतपत सर्वच देशांत त्यांच्या

भौगोलिक रचनेनुसार अनुकूलता असतेंच असें नाहीं; तेव्हां दळणवळणाच्या साधनांच्या सुधारणेबरोबर राष्ट्राराष्ट्रांतील कच्च्या मालाच्या व धान्याच्या अगर पक्क्या मालाच्या देवघेवीस सुरुवात झाली, तेव्हां राष्ट्राराष्ट्रांतील देणीं–येणीं पटविणेच्या बाबत हुंडणावळ प्रचारांत आली. अर्थात् परराष्ट्रीय हुंडणावळ म्हणजे एका देशाच्या मुख्य नाण्याचें दुसऱ्या देशाच्या मुख्य नाण्याशीं असलेल्या किंमतीचें प्रमाण होय.

हुंडणावळीचे स्थैर्याची आवश्यकता.

कोणीहि व्यापारी एका देशांतील माल दुसऱ्या देशांत पाठविण्यास किंवा दुसऱ्या देशांतील माल आपल्या देशांत आणण्यास, सिद्ध होण्यापूर्वी आपणांस तसें करण्यांत कांहीं नफा उरेल किंवा नाहीं याचा अगोदर विचार करील. त्यांत कांहीं नफा आहे असें दिसून आल्यासच वरील व्यवहार करण्यास प्रवृत्त होईल; हें उघड आहे.

आपणास या व्यवहारांत नफा होईल किंवा नाहीं, हें समजण्यास त्यांस परदेशांतील व आपलें देशांतील कायदेशीर चलनांचे एकमेकांशीं असलेलें प्रमाण माहीत पाहिजे; व तें प्रमाण स्थिर राहील अशी खात्री असली पाहिजे. नाहींतर १९२१ सालीं हिंदी १० रुपयांस इंग्लिश १ पौंड असा या दोन देशांमधील चलनांचा संबंध होता, म्हणून इंग्लंडहून दहा हजार पौंडांची यंत्रसामुग्री मागविली असतां आपणास एक लाख रुपयांस येथें येऊन पडेल, (वाहतुकीचा खर्च निराळा) असा हिशोब घालून एक लाख रुपयांची व्यवस्था करून ठेऊन इंग्लंडहून दहा हजार पौंडाची यंत्रसामुग्री मागविणारे गिरणीवाल्यास ती यंत्रसामुग्री पुढें वर्षदीड वर्षांनीं येथें येऊन पडल्यावर इंग्लंडला दहा हजार पौंड पाठविण्याकरितां शेवटीं एक लाख रुपयांचे ऐवजीं एक लक्ष वीस हजार, एक लक्ष चाळीस हजार, एक लक्ष साठ हजारापर्यंत रुपये पाठविण्याची पाळी आली कारण त्या वेळीं रुपयाचा भाव चांदीचे भावावर हेलकावे खात ठेविला होता; म्हणून पूर्वीचे दहा रुपयास एक पौंड हें प्रमाण चढत चढत एक पौंडास १२, १४, १५, १६ रुपयांपर्यंत गेलें होतें. इतर सर्व धातूंपेक्षां सुवर्ण हें भावांत अधिक

स्थिर असतें, असा अनुभव आल्यामुळें सुवर्णचलनास सर्वत्र मान्यता मिळाली. सुवर्णचलनामुळें आंतरराष्ट्रीय व्यापारास स्थैर्य कसें येतें, हें पुढील उदाहरणावरून दिसून येईल.

निरनिराळ्या राष्ट्रांतील कायदेशीर चलनांत (Standard Coin) सुवर्ण किती असतें, हें समजलें आणि राष्ट्राराष्ट्रांतील देणें–घेणें शेवटीं सोन्याच्याच देण्याघेण्यांत घडवून आणलें जातें, हें लक्षांत ठेविलें म्हणजे वरील गोष्ट आपल्या ध्यानीं येतें.

जसें इंग्लंडचें प्रमुख नाणें सॉव्हरीन, फ्रान्सचे फ्रँक, अमेरिकन संयुक्त-संस्थानांचे डॉलर व जर्मनीचे मार्क, ह्यांचीं वजनें व किंमती (महायुद्धापूर्वीं) भिन्न होत्या, तरी त्यामधील सुवर्णाचा ऐवज निश्चित असल्याकारणानें त्यांचें मोलाचें परस्पर प्रमाण हीं निश्चित व सर्वश्रुत होतें. जसें एक सॉव्हरीन म्हणजे ४·८६ डॉलर, २५·२ फ्रँक, किंवा २० जर्मन मार्क ह्यामुळें एका राष्ट्रास दुसऱ्याचें देणें द्यावयाचे असल्यास, किंवा पेढीवाले आणि व्यापारी यांस कर्जफेड करावयाची असल्यास (वाहतुकीचा व व्याजाचा तेवढा खर्च सोसून) सोनें पाठवून त्या सहज करतां येत होत्या. यावरून दिसून येईल कीं, हुंडणावळीचा दर राष्ट्राराष्ट्रांत स्थिर राहून व्यापार व उद्योगधंदे सुरळीत चालण्यास सुवर्ण चलनपद्धतीनें अप्रत्यक्ष रीतीनें सहाय्य होत असे.

हुंडी—कमी खर्चाचा मार्ग.

देशांतल्या देशांत हुंडीचा व्यवहार होतो, तो सदरहू पैसे पाठविण्याचा मार्ग सोईचा आणि बेताच्या खर्चाचा असतो म्हणून होतो. एका गृहस्थास सोलापुराहून मुंबईस, तेथील एखाद्या व्यापाऱ्यास त्याचेकडून घेतलेल्या मालाबद्दल पांच हजार रुपये पाठवावयाचे झाल्यास तो ती रक्कम एखाद्या माणसाच्या हातीं आगगाडीनें धाडील, किंवा मनीऑर्डरीनें पाठवील, किंवा चेकच्या अथवा हुंडीच्या रूपानें पाठवील. ह्यापैकीं कोणता मार्ग स्वीकारावयाचा किंवा सदरहू रकमेच्या चलनी नोटा रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावयाच्या हें वरील गृहस्थ, सोय, सुरक्षितता, आणि पाठवावयास

लागणारा खर्च ह्या गोष्टींचा विचार करून ठरवील. हाच नियम परराष्ट्रीय देण्याघेण्यास लागू आहे. मुंबईच्या एका कारखानदारानें विलायतेहून कांहीं यंत्रसामुग्री मागविली असल्यास, तो बँकेंत जाऊन पैसे भरील आणि जरूर त्या पौंडांची हुंडी घेऊन तो लंडनला व्यापाऱ्याकडे पाठवून देईल. विलायतेंत प्रचलित असलेलीं सोन्याचीं नाणीं किंवा खुद्द सोन्याच्या चिपा त्याला स्थानिक बाजारांत बँकेच्या हुंडीपेक्षां स्वस्त मिळाल्यास तो हुंडीचे भानगडींत न पडतां सोनेंच पाठवील.

व्यापाराचा ओघ कमी जास्त जोराचा असेल त्या मानानें हुंडया स्वस्त किंवा महाग असूं शकतील; आणि हुंडणावळ वर खालीं जाईल हें उघड आहे. परंतु राष्ट्राराष्ट्रांमधील देणें–घेणें करण्याच्या कामीं परराष्ट्रीय हुंडयास एक जबरदस्त प्रतिस्पर्धी असतो, हें विसरतां कामा नये आणि तो प्रतिस्पर्धी म्हणजे सोनें होय.

एका राष्ट्रांतील नाणीं दुसऱ्या राष्ट्रांत चाललीं नाहींत तरी सोन्यास चोहोंकडे मागणी असते, आणि राष्ट्रीय टांकसाळींत नाणीं पाडून घेणें सुलभ असल्यामुळें हुंडयांच्या ऐवजीं सोन्याची आयात आणि निर्यात करून आंतरराष्ट्रीय देणीं–घेणीं भागवितां येतात.

शांततेच्या व सुव्यवस्थेच्या काळांत, महायुद्धापूर्वीं, चीन व हिंदुस्थान-खेरीज जगांतील बहुतेक सर्व देशांत सोन्याचीं नाणीं पाडून देण्याच्या सरकारी टांकसाळी चालू असून सुवर्णाची आयात निर्यात अप्रतिबद्ध असे; आणि कागदी चलनांचे परिणाम मर्यादित असल्यामुळें त्याचे सोन्याचे नाण्यात सहज रूपांतर होत असे. सर्व प्रमुख देशांत हीच व्यवस्था प्रचारांत असल्याकारणानें आणि कायदेशीर नाण्यांचे परस्पर संबंध सर्वश्रुत आणि स्थिर असल्यानें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचे दर ठराविक मर्यादेबाहेर जात नसत. परंतु महायुद्धानंतरचे कालांत जेव्हां (१) कागदी चलन बेसुमार खेळूं लागून त्याचे सोन्यांत रूपांतर होऊं शकलें नाहीं; (२) टांकसाळींत सोन्याचीं नाणीं लोकांस पाडून देणें बंद झालें, आणि (३) सोन्याचांदीच्या आयात-निर्यातीवर सरकारचें नियंत्रण येऊन पडलें, तेव्हां वरील व्यवस्थित चाललेले व्यवहार थांबले आणि निरनिराळ्या देशांत कमी अधिक प्रतीची

विषम महर्गता झाली, आणि हुंडणावळीचे दर कायद्याचीं बंधनें तोडून उच्छृंखल बनलीं. ही परिस्थिति सुधारणेंकरितां १९३१च्या मध्यापासून बहुतेक सर्व देशांनीं आपापल्या चलनांचा सुवर्णाशीं असलेला संबंध तात्पुरता सोडून आपापल्या चलनांच्या किंमती बऱ्याच उतरविल्या आहेत; व सुवर्णाचे निर्गतीवर बंधनें घातलीं आहेत.

येथपर्यंत चलन व हुंडणावळ विषयक सर्वसामान्य विवेचन झालें, आतां आपण हिंदी चलनपद्धतीचे इतिहासाकडे वळूं.

प्रकरण दुसरें

हिंदी चलनपद्धती त्रोटक इतिहास.

ब्रिटिश अमलापूर्वी हिंदुस्थानांत सोनें, रुपें व तांबें ह्या धातूंचीं नाणीं प्रायः चालत असत. होन, मोहरा, पुतळ्या हीं सोन्याचीं नाणीं होत. रुपये सर्व रुप्याचे, अल्प किंमतीचीं नाणीं तांब्याचीं असत. ह्या निरनिराळ्या धातूंच्या नाण्यांचीं परस्पर किंमत कायद्यानें ठरविलेली नव्हती. सदर किंमती बाजारभावाप्रमाणें वारंवार बदलत.

सोन्याचीं नाणीं व रुप्याचीं नाणीं ह्यांची परस्पर किंमत कायद्यानें ठरविलेली नसल्यामुळें बाजारभावाप्रमाणें जी किंमत असेल त्याप्रमाणें परस्पर मोबदला होई. शिवाजीच्या वेळेस, शिवराई, देवराई, रामनाथपुरी वगैरे नांवांचे होन चालत असत. मोहरामध्येंहि दिल्लीची मोहोर, औरंगबादी मोहोर, अशा नानाविध मोहरा प्रचारांत असत. येथें रुप्याचें नाणें फार पुरातन कालापासून चालू होतें.

(या देशांत नाणें फार प्राचीन काळापासून म्हणजे, वेदकालीं, पाणिनी सूत्राच्या समयीं व महाभारताचें कालीं येथें नाणें चालू होतें असें इतिहासावरून दिसतें. १८व्या शतकांतल्या उत्तरार्धांत येथें सोन्याचीं, चांदीचीं अशीं निरनिराळ्या वजनाचीं व आकाराचीं ९९४ प्रकारचीं नाणीं चालू होतीं असा उल्लेख सांपडतो.)

एकोणिसावें शतकाच्या सुरुवातीस येथें सोन्याचीं व त्याबरोबरच रुप्यासारखीं चांदीचीं अनेक नाणीं प्रचारांत होतीं. ह्या चांदीच्या व सोन्याच्या नाण्यांचे परस्पर प्रमाण देशांतील वेगवेगळ्या भागांत वेगवेगळें

असल्याचें आढळून येतें. वेगवेगळ्या वजनाचे रुपये वेगवेगळ्या प्रांतांत चालत; व त्यामुळें देवघेवींत त्यांचीं वजनें केल्यावेरीज चालत नसे. कंपनी सरकारनेंहि कलकत्ता, मुंबई, व मद्रास या ठिकाणीं टांकसाळी काढल्या होत्या, परंतु तेथील रुपयेहि निरनिराळ्या वजनाचे असून, त्या त्या भागांतच चालू असत. वरीलप्रमाणें परिस्थिती असल्यामुळें येथून कच्चा माल नेण्याचे व इंग्लंडहून आणलेला पक्का माल खपविण्याचें व्यापारांत बराच घोंटाळा माजूं लागला, म्हणून या देशांतील चलनांत एकसूत्रीपणा आणण्याचे कामास कंपनी सरकार लागले.

कलकत्त्याचे टांकसाळीचे मुख्य अधिकारी मि. प्रिन्सेप यांचे प्रयत्नानें १८३५ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें, मद्रास येथें चालू असलेला १ तोळा म्हणजे १८० ग्रेन वजनाचा रुपया हाच सर्व देशभर प्रमाणभूत नाणें म्हणून चालवावा असें ठरविलें; आणि १८५३ सालीं सोन्याचें नाणें सरकारी तिजोरींत घेतलें जाणार नाहीं, असें जाहीर केलें. अशा रीतीनें रुपया हा हिंदुस्थानांत देशाचें 'कायदेशीर चलन' म्हणून गणला.

हिंदुस्थानचा संबंध सन १८५८ मध्यें इंग्लंडचे राजसत्तेशीं जोडला गेला; त्यानंतर सन १८६४ मध्यें एका जाहिरनाम्यानें १० रुपयास एक सॉव्हरिन असा हुंडणावळीचा दर ठरविण्यांत आला. सन १८६२ पासून कागदी चलन म्हणजे नोटा काढण्यास सुरवात झाली.

सन १८६६ मध्यें मेन्सफील्ड कमिशननें (१) देशांत सोन्याचें नाणें सुरूं करावें व (२) नोटा हें कायदेशीर चलन सर्वत्र चालेल असें करावें, अशा शिफारशी केल्या. (कलकत्ता, मुंबई, मद्रास वगैरे ठिकाणीं निघालेल्या नोटा त्या त्या प्रांतांत चालत, तेव्हां कोणत्याही ठिकाणची नोट कोठेंही चालण्यास अडचण नसावी, असा सदर कमिशनचे शिफारशीचा अर्थ आहे. पुढें सन १९१० सालचे कायद्यानें ही सुधारणा घडून आली.)

सन १८६८ चे दुसऱ्या एका जाहीरनाम्यान्वयें सरकारी तिजोरींत सॉव्हरिन्स् वटविण्यास एका सॉव्हरिनला १० रु. ४ आणे देण्याची हमी देणेंत आली. सन १८७० चे नाण्याविषयक कायद्यानें, चांदीबद्दल

भारंभार रुपये सरकारी टांकसाळींतून पाडून दिले जातील, असें जाहीर झालें. तसेंच परदेशांत सुवर्णचलन पद्धतीमुळें चांदीस दुय्यमपणा आला. त्यामुळें चांदीची मागणी कमी होऊन तिच्या किंमतींत एक सारखा उतार होऊं लागला. तथापि हिंदुस्थानांतील रौप्य चलनपद्धति मात्र ठेंचा खात रखडत होती. पाश्चात्य देशाप्रमाणें येथेंही सुवर्ण चलनपद्धति सुरू करण्यांत यावी, अशी लोकांनीं कित्येक वर्षें केलेली मागणी फेंटाळण्यांत आली होती. परंतु ज्यावेळीं सरकारला स्वतःला व त्यांचे भाईबंधांना चाट बसूं लागली त्यावेळीं, येथेंही सुवर्णचलन चालूं करण्याची उपयुक्तता सरकारास पटूं लागली.

चांदी घसरली व हुंडणावळ उतरली.

चांदी स्वस्त झाल्यामुळें हिंदुस्थानचे निर्गत मालाचे बाबतींतलें देणें व्यापारी लोक चांदी इकडे आणून तिचे सरकारी टांकसाळींत रुपये पाडवून घेऊन देऊं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, चांदीचे रुपये व परराष्ट्रांतील सोन्याचीं नाणीं ह्यांचा परस्पर मूल्य संबंध सारखा बदलत जाऊन २४ पेन्सावरून १३ पेन्सापर्यंत रुपयाचा भाव उतरला. आपण मागें पाहिलेंच आहे कीं, देशादेशांतील येणें-देणें हुंडीच्या रूपानें होतें. याचें मुख्य कारण म्हणजे इतर कोणत्याही मार्गापेक्षां हा मार्ग कमी खर्चाचा पडतो, हें होय. परंतु वर वर्णन केलेल्या वेळीं म्हणजे एकोणिसावें शतकाचे चतुर्थ पादांत अशी परिस्थिती उत्पन्न झाली कीं, हुंडणावळ फारच महाग पडूं लागली व त्यापेक्षां चांदीच या देशांत पाठविणें परदेशी व्यापाऱ्यांस फायद्याचें होऊं लागलें. उदाहरणार्थ, इंग्लंडमधील एका गिरणीचे कारखानदारानें येथून दहा हजार रुपयांच्या किंमतीचा कापूस खरेदी केला, त्यास त्याबद्दल इकडे पैसे पाठविणें आहेत. त्यानें जर हुंडणावळीचा मार्ग स्वीकारला तर त्यास १ पौंडास १० रुपये, या हिशे-बानें एक हजार पौंड द्यावे लागले असते. परंतु बाजारांत चांदीचा भाव इतका स्वस्त होता कीं, दहा हजार रुपये पाडण्यास लागणारी चांदी त्यास लंडनचे बाजारांत ५५० ते ६०० पौंडास मिळूं लागली. तेव्हां

त्यानें सदर चांदी हिंदुस्थानांत पाठवून येथील टांकसाळींत रुपये पाडून घेऊन येथील देणें वारणें साहजीक आहे. याचा परिणाम असा झाला कीं, एका काळीं प्रचलित असलेलें १ रुपयास २४ पेन्स हें प्रमाण घसरत घसरत १३ पेन्सावर आलें. १८७३ ते १८९३ पर्यंत यामुळें सुमारें ८५ कोटि रुपयांची सरकारी जमाखर्चात तूट आली. परंतु कच्चा माल व धान्य यांस भाव चांगलाच आला. यामुळें हिंदुस्थानच्या प्रजेचें एकंदरींत नुकसान झालें नाहीं, पण ही हुंडणावळ अर्थात्‌च जास्त रुपये देऊन परराष्ट्रीय सोन्याची नाणीं खरेदी करणारासच म्हणजे ज्यास परदेशी पैसे पाठविणें जरूर असेल अशासच नुकसानकारक होती. परदेशचे व्यापारी, युरोपियन अधिकारी, खुद्द हिंदुस्थान सरकारास ही उतरती हुंडणावळ, जाचक होण्याचें कारण असें कीं, त्यांना इंग्लंडमध्यें प्रतिवर्षी कोट्यावधी रुपये–सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कचेरीचा खर्च, कर्जावरील व्याज, विलायती सामानाची द्यावी लागणारी किंमत, पेन्शनें, रजेवर गेलेल्या अधिकाऱ्यांचे पगार इत्यादीसाठीं–इंग्लंडास पाठवावयाचे असत, तेथें सुवर्ण चलन चालूं तर येथें रौप्य चलन चालूं. येथील सरकारास सर्व कर रुपयांत मिळत; आणि इंग्लंडमध्यें खर्च करतांना तो सोन्याच्या नाण्यांत म्हणजे पौंडांत करावा लागे. म्हणून हिंदुस्थान सरकारला पहिल्या इतकेंच परदेशीं देणें देण्यास जास्त रुपये खर्चावे लागले. उतरत्या हुंडणावळीमुळें वरील परिस्थिती कशी निर्माण होते, हें खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

(टीपः—चांदीचा भाव १८७५ सालीं एक औंसास ५८ पेन्स होता, १८७९ सालांत ५२½, १८८८ त ४३ पेन्स १८९२ त ३७½ पेन्स १८९९ २७ पेन्स होता. १९३८ त ५१९ पेन्सचे आसपास)

समजा, एखादा इंग्रज मनुष्य येथें नोकरीस आहे. त्याचा मुलगा इंग्लंडमध्येंच शिकत आहे. त्यांस दरमहा ५० पौंड खर्चाला लागतात. हे ५० पौंड त्यास मिळण्याकरितां सदर इंग्रज मनुष्यास १ रुपयाचा २४ पेन्स भाव असतां ५०० रुपये पाठवावे लागत होते; त्याचे ऐवजीं रुपयाचा भाव १३ पेन्स झाला असतां ९२५ रुपये पाठवावे लागत, म्हणजे या

उतरत्या हुंडणावळीमुळें सदर इसमास ४२५ रुपये जास्त खर्च करावे लागले.

" हर्षेल कमिटी : टांकसाळी बंद झाल्या (१८९२) "

गोऱ्या नोकरांचें वरीलप्रमाणें नुकसान होऊं लागलें, म्हणून त्यांनीं जोराची चळवळ सुरू केली, अर्जावर अर्ज धाडले व खुद्द पार्लमेंटापर्यंत दाद लावली. शेवटीं स्टेट सेक्रेटरीस (भारतमंत्र्यास) ह्या प्रश्नाचा विचार करणें भाग पडून इंग्लंडचे त्या त्या वेळचे हाय चॅन्सेलर **लॉर्ड हर्षेल** ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ह्या प्रश्नाचा निकाल करण्याकरितां १८९२ सालीं एक कमिटी नेमण्यांत आली, तींत सर्व सभासद इंग्रज व अभिप्राय देणारेही सर्व इंग्रजच; तेव्हां हिंदुस्थानांतील लोकांच्या नफानुकसानीचा त्यांचेकडून कांहीं विचार झाला नाहीं. मूठभर इंग्रज अधिकाऱ्यांचें हित, तेंच हिंदी जनतेचें हित, असें भासवून त्यांनीं त्याप्रमाणें शिफारस केली. या आपत्तीस तोड म्हणून हिंदुस्थानांत 'सुवर्णचलन' सुरू करावें या उद्देशानें १८९३ सालीं टांकसाळींत रुपये पाडून घेण्याची नागरिकांना असलेली सवलत रद्द करण्यांत आली.

यामुळें रुपया व त्यामधील चांदी यांच्या किंमतीमधील परस्पर संबंध कायम टिकविण्याचा मार्ग नाहींसा झाला; आणि रुपयाची सुवर्णानें मापलेली किंमत म्हणजे हुंडणावळीचा दर व्यवहारांत खेळणाऱ्या रुपयांची संख्या कृत्रिम रीतीनें मर्यादित करून हळूहळू १६ पेन्सापर्यंत वाढविण्यांत आली.

येथपासून हिंदुस्थानांत या वेळपर्यंत चालू असलेली शास्त्रशुद्ध 'चलन-पद्धति' जीस 'Automatic and self—adjusting system of Currency' असें म्हणतात, ती नाहींशी होऊन, कृत्रिम चलनपद्धति (managed Currency) सुरू झाली. या दृष्टीनें हर्षेल कमिटीच्या शिफारशीनुसार टांकसाळी बंद करण्यांत आल्या, ह्या गोष्टीस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे; कारण हल्लीं येथें चालू असलेल्या कृत्रिम चलनपद्धतीचा उगम यांत आहे; म्हणून टांकसाळी बंद झाल्यामुळें काय

परिस्थिति निर्माण झाली, याचें थोडें जास्त विस्तारानें विवरण करणें जरूर आहे.

रुपयांत १६५ ग्रेन चांदी असते; व १६५ ग्रेन चांदीची बाजारांत १६ पेन्स किंमत होत नव्हती, ती १३ पेन्स होत होती. परंतु सरकारच्या हुकुमानें कागदाच्या ज्याप्रमाणें एका तुकड्यास आम्ही दहा रुपये समजतों व दुसऱ्या कागदाच्या तुकड्यास शंभर देतों; त्याप्रमाणेंच १६५ ग्रेन शुद्ध चांदीच्या पत्र्यावर राणीचा मुखवटा व नांव असल्यावर त्याची किंमत १६ पेन्स धरावयाची. १६५ ग्रेन चांदीच्या रुपयास १६५ ग्रेन चांदीपेक्षां सामान्यत: बाजारांत कधींहि जास्त किंमत येणार नाहीं, हें सरकारास माहीत होतें; व म्हणूनच त्यांनीं अशी योजना केली कीं, त्या वेळेपर्यंत (१८९३) टांकसाळींतून ज्याप्रमाणें हवें त्यास रुपयाची चांदी अगर चांदीचे रुपये करून मिळत असत, त्याप्रमाणें यापुढें मिळणार नाहींत. चांदीच्या पत्र्यावर राजाचा अगर राणीचा मुखवटा आणि अक्षरें वठविण्याचा अधिकार सरकारचा असतो. हा छाप वठवल्याखेरीज चांदीचा रुपया होऊं शकत नाहीं. तेव्हां सरकारनें असें मनांत आणलें कीं, टांकसाळींत चांदीचे रुपये करून देण्याचें जर ओढून धरलें, तर बाजारांत चांदी कितीहि असली तरी रुपये कमी पडतील; आणि रुपयाची कमतरता झाली म्हणजे चांदीचा भाव कोणताहि असला तरी रुपयाचा भाव वाढेल, कोणताहि जिन्नस कमी पिकला म्हणजे त्याचा भाव चढतो, त्याप्रमाणें लोकांचे व्यवहार आहेत तसेंच राहून रुपयांची संख्या कमी पडली तर रुपयांचा भाव चढलाच पाहिजे, अशा रीतीनें रुपया महाग करून त्याची किंमत १६५ ग्रेन चांदीच्या बरोबर न ठेवतां १६ पेन्सावर ठेविली, व टांकसाळींतून हवे त्यास चांदी घेऊन रुपये पाडून देण्याचें सरकारनें बंद केलें.

(१८९९ सालीं कायद्यानें कायम केलेला रुपयाचा १६ पेन्स हा हुंडणावळीचा भाव रुपयांतील चांदीची किंमत १६ पेन्साचे आंत होती, तोंपर्यंत सरकारास टिकवितां आला, परंतु १९१७ पासून चांदीचा भाव वाढत वाढत १९१९ मध्यें तो ५९ पेन्सास १ औंसइतका वाढला; तेव्हां रुपयांतील १६५ ग्रेन चांदीचा भाव सुमारें २१$\frac{3}{4}$ पेन्सापर्यंत गेला. त्या वेळीं

हा १६ पेन्साचा भाव सरकारास टिकवतां आला नाहीं, म्हणून सरकारची कशी तारांबळ उडाली हें आपणास पुढें पहावयास सांपडेल. हल्लीं १९३८ फेब्रुवारीमध्यें रुपयांतील चांदीचा भाव सुमारें ५१ पेन्सांचे आसपास आहे.)

"टांकसाळी बंद झाल्या याचा शेतकऱ्यांवर अनिष्ट परिणाम"

या कायद्यानें आपलें मुख्य नाणें जो 'रुपया' तो दुर्मिळ करण्याचा सरकारचा हेतु होता. व्यापार जसजसा वाढतो, तसतसें नाणेंहि जास्त लागत जातें. हिंदुस्थानचा व्यापार या वेळीं जास्त जास्त वाढत होता, त्यामुळें प्रतिवर्षीं सुमारें सात कोट चांदीचे नवे रुपये पाडावे लागत; परंतु या कायद्याप्रमाणें नवे रुपये पाडण्याचें मात्र बंद झालें, व व्यापार पूर्वींसारखाच वाढत राहिला. वाढता व्यापार आणि नाण्याची तूट म्हणजे अर्थात् सर्व जिनसांच्या किंमती उतरल्या व शेतांतील धान्याचे जेथें पूर्वीं दहा रुपये येत होते, तेथें नंतर आठच येऊं लागले. शेतकऱ्यास सारा पूर्वींइतकाच नंतरहि द्यावा लागे, परंतु त्याच्या धान्याची किंमत मात्र कमी रुपये येई. धान्य विकून उत्पन्न कमी व सरकार देणें पूर्वींइतकेंच द्यावें लागे. म्हणजे या कायद्यानें शेतकऱ्यावर हा एक नवीन अप्रत्यक्ष करच बसविला असें झालें. सावकाराकडून काढलेलें कर्ज व व्याज भागविण्याकरितां पूर्वींपेक्षां जास्त जास्त धान्य विकणें भाग पडूं लागलें व अशा रीतीनें शेतकऱ्यांचे नुकसान झालें.

"या कायद्याचा व्यापारावर झालेला परिणाम"

१६ पेन्साचा रुपयाचा भाव ठरविल्यामुळें इंग्लंडच्या व्यापाराची सोय झाली, त्यांचा पक्का माल येथें स्वस्त येऊन पडूं लागल्यामुळें त्या मालाचा खप वाढला. कारण पूर्वीं १ पौंडाचें कापड इंग्लंडहून येथें आणलें असतां येथील लोकांस तें $\frac{२४०}{१३} = १८\frac{६}{१३}$ रुपयांस पडत असे, तें १६ पेन्साचे दरानें $\frac{२४०}{१६} = १५$ रुपयास पडूं लागलें, व त्यामुळें मँचेस्टरच्या कापडाचा येथें खप जास्त होऊं लागला. परंतु चीनचे व्यापाराची वाट काय ?

आपले कापड अगर सूत चीन देशांत नेऊन विकलें, तर त्यास पूर्वी चीन देशचे लोक जी किंमत देत होते, त्यापेक्षां यानंतर ज्यास्त किंमत कां देतील ! पण चीन देशांतून जे चांदीचे चिनी नाणें इकडे आलें त्याचें पूर्वी इतके रुपये व्यापाऱ्याचे हातीं लागत नाहींसे झाले. कारण हें चिनी नाणें चांदीच्या भावानें जाणार आणि चांदी तर अगदीं स्वस्त झालेली, तेव्हां आपल्या चीनचे व्यापारांत घट येऊं लागली.

" फौलर कमिटी १८९९ "

पाश्चात्य देशांत सोन्या चांदीची 'दुहेरी मूल्यमापन पद्धति' पूर्वींच अव्यवहार्य ठरली होती, आणि रौप्य चलनपद्धति तर आतां अशक्य झाली, तेव्हां पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थानांतहि सुवर्ण–चलन–पद्धति पूर्णत्वानें प्रचारांत येणें क्रमप्राप्तच होतें. म्हणून फौलर कमिटीनें शिफारस केल्यावरून १८९९ सालीं ब्रिटिश सुवर्ण–चलन म्हणजे सॉव्हरिन हिंदुस्थानचें मुख्य नाणें ठरविण्यांत येऊन त्याचा व रुपयाचा परस्पर संबंध म्हणजे हुंडणावळीचा दर १६ पेन्स कायम झाला. त्याचप्रमाणें सोन्याची टांकसाळ येथें सुरूं करण्याच्या पूर्व तयारीला सरकार लागून हिंदी चलनाचा प्रश्न एकदांचा कायमचा सुटला, असें सर्वांस वाटूं लागलें.

"माशी शिंकली"

पण थोडयाच अनुभवानें सरकारी अधिकाऱ्यांच्या असें लक्षांत आलें कीं, हिंदुस्थानांत सोन्याची टांकसाळ चालूं न करतांहि भागण्यासारखें आहे. व्यापाराच्या ओघांत जरूरी पुरतें सॉव्हरिन प्रतिवर्षीं देशांत येतच होते, आणि अंतर्गत व्यवहाराचें काम रुपये आणि कागदी नोटा ह्यांवर सुरळीत रीतीनें चाललें होतें. एका दृष्टीनें रुपया हें खुल्या टांकसाळीचे अभावीं दुय्यम दर्जाचें नाणें असलें तरी त्याचा उपयोग व्यवहारांत मर्यादित केलेला नव्हता; आणि म्हणून रुपया लंगडा असला, तरी सॉव्हरिनच्या बरोबरीनें समाजांत वावरत होता. सॉव्हरिनच्या मोबदला ठराविक दरानें रुपये आणि नोटा देण्यास सरकार बांधलें गेलें होतें. पण त्याच्या उलट रुपये आणि नोटा

घेऊन सोनें देण्याची जबाबदारी त्यानें अंगिकारली नव्हती. ह्याचा अर्थ असा झाला कीं, 'रुपया' हेंच हिंदुस्थानचें प्रमुख चलन बनून त्याचे सॉव्ह-रिनशीं प्रमाण कायम ठेवणें, हेंच एक सरकारचें कर्तव्य ठरलें.

"कौन्सिल व रिव्हर्स कौन्सिल बिलें"

हुंडणावळीचा दर अशा रीतीनें कायम ठेवणेस सरकारला दोन गोष्टी करतां आल्या म्हणजे काम भागण्यासारखें होतें. एक विलायतेंत पेढीवाले व व्यापारी यांनीं हिंदुस्थानांतील देणें देण्याकरितां सोनें दिलें असतां त्यांस भारतमंत्र्यानें हिंदुस्थानसरकारवर रुपयाच्या हुंड्या देणें, (त्यांसच 'कौन्सिल बिलें' अशी संज्ञा प्रचारांत आहे.) आणि दुसरें, जरूर पडेल तेव्हां येथील सरकारनें इंग्लंड मधील देणें देण्याकरितां येथील व्यापाऱ्यांकडून रुपये घेऊन त्याच्याबद्दल भारतमंत्र्यावर सॉव्हरिनच्या हुंड्या विकणें हें होय (यासच 'रिव्हर्स कौन्सिल बिलें' अशी संज्ञा आहे) परराष्ट्रीय व्यापाराच्या ओघांत शेवटीं कोट्यावधी रुपयांचे येणें प्रतिवर्षीं हिंदुस्थानांस घ्यावयाचें असल्यामुळें आणि हिंदुस्थान सरकारला लंडनला दरवर्षीं तीस चाळीस कोटि रुपये " होम चार्जेस " करितां पाठवावयाचे असल्यामुळें हा व्यवहार सुरळीत चालणें कठीण नव्हते. रुपये घेऊन सोनें किंवा परराष्ट्रीय हुंड्या (रिव्हर्स कौन्सिल बिलें) देण्याचा प्रसंग क्वचितच येत असे; आणि महायुद्धापूर्वींच्या चौदा वर्षांत अशी जरूर १९०७-८ सालींच काय ती एकदा भासली. त्या दिव्यांतून बाहेर पडतांच आपली नवीन " सुवर्ण विनिमय मापक पध्दति " (Gold exchange standard) यशस्वी आणि टिकाऊ ठरली, या विषयीं सरकारास विश्वास व अभिमान वाटूं लागला.

" चेंबरलेन कमिशन "

चेंबरलेन कमिशन--फौलर कमिटीच्या शिफारसी सरकारनें जाहिर रीतीनें मान्य केल्या असतांहि सात आठ वर्षांच्या अवधींत त्यांचे धोरण भलत्याच दिशेनें वहात जाऊन, हिंदुस्थानांत इंग्लंडप्रमाणें निर्भेळ 'सुवर्ण-चलन' पद्धति सुरूं करवयाची असा आरंभीं हेतु होता. तरी हळूं हळूं फक्त

परदेशी देवघेवीस लागणारे तेवढेंच सोनें लंडन येथील निधीमध्यें ठेऊन, त्याच्या बळावर पौंड व रुपया यांमधील नातें कृत्रिम रीतीनें कायम ठेवण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें. टांकसाळींत सोन्याचें नाणें पाडून देण्याची व्यवस्था करून राष्ट्राचें मुख्य नाणें व त्यांत असलेलें सोनें ह्यांची एकच किंमत कायम राखण्याची इंग्लंडमधील शुद्ध पद्धति टाकून देऊन, सोन्याच्या मोबदला रुपये व रुपयांच्या मोबदला लंडनवर हुंड्या देण्याची धेडगुजरी पद्धत येथील सरकारनें चालू केली. शेवटीं १९१३ सालीं चेंबरलेन कमिशननें असें मत दिलें कीं, हिंदी लोकांना सोन्याच्या नाण्याचीं जरूर नाहीं; व तें आपणांस मिळावें अशी त्यांची इच्छाही नाहीं. नोटा आणि रुपये हेंच 'चलन' त्यांना सोईचें असल्यानें सोन्याचें नाणें प्रचारांत येणें हिंदुस्थानचे हिताचें नाहीं. अंतर्गत व्यवहारांत रुपये खेळत राहतील आणि हिंदुस्थानचे परराष्ट्रीय देणें भागविण्यापुरतें रुपयांचे परिवर्तन पौंडांत करण्याची हमी सरकारनें घेतली, म्हणजे पुरे. या पद्धतीस " सुवर्णालंकृतानारी हेमालंकार वर्जिता" हे वर्णन बरोबर लागूं पडतें. कारण हिच्यामध्यें ही सुवर्ण परिमाण पद्धति असूनही लोकांस सोन्याचें दर्शन होत नाहीं, व चलनाधिकाऱ्यांकडून तें लागेल तेव्हां (परदेशांतील मालाची किंमत देणें-करितां) सोन्याचें ऐवजीं 'परत हुंड्या' (Reverse council bills) मिळतात.

वरील पद्धति ढांसळली— परंतु महायुद्धाचे काळांत हिंदुस्थानांतील मालाला विलायतेंत पुष्कळ मागणी येऊन पूर्वींचे आयात-निर्यातीच्या आंकड्यांचा परस्परांशीं मेळ बसला होता, तो बिघडला; आणि अंतर्गत व्यवहारासाठीं लागणाऱ्या नाण्यांची तूट पडूं लागली. हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडसाठीं १९१४ ते १९१९ या मुदतींत २५ कोटि पौंड खर्च केला. यामुळें नाण्याची तूट जास्तच भासूं लागली. याच सुमारास हिंदुस्थानांत चांदीची आयात कमी होऊन, सरकारला भारी दरानें चांदी विकत घ्यावी लागली. चांदीची किंमत १९१५ सालीं एक औंसाला २७¼ पेन्स होती, ती १९१७ सालीं ४३ पेन्स झाली, व रुपयांतील चांदीची किंमत जवळ जवळ रुपयाच्या कायदेशीर किंमती इतकी म्हणजे १ शिलिंग ४ पेन्स झाली.

नाण्यांची वाढती मागणी, इतक्या भारी किंमतीनें चांदी विकत घेऊन पुरविणें सरकारला तोट्याचें होऊन पौंडाचा व रुपयाचा परस्पर संबंध चांदीच्या किंमतींत होणाऱ्या चढउतारावर त्यांनीं अवलंबून ठेविला, व यामुळें रुपयाची किंमत वाढून ती डिसेंबर १९१९ मध्यें २ शिलिंग ४ पेन्स इतकी वर गेली.

"हुंडणावळीचे कायदेशीर दरांत बदल"

तेव्हां १९१९ च्या अखेर बॅबिंगटन स्मिथ कमिटीनें केलेल्या शिफारशी हिंदुस्थान सरकारनें मान्य करून रुपयाची किंमत २४ पेन्स ठरविली. परंतु दैवयोगानें याच सुमारास हिंदी आयात-निर्यातीचें प्रमाण पुनः बदललें. हिंदी व्यापाऱ्यांनीं पुष्कळ परदेशी माल मागविला, परदेशी कापडास मागणी वाढली व निर्गत मात्र कमी झाली. जपाननें कमी कापूस खरेदी केला; आणि ताग, चहा व कातडीं यांसही परदेशांत पहिल्यासारखी मागणी येईना. म्हणजे बाहेरच्या देशावर निघावयाच्या हुंड्याच्या पुरवठ्याचे मानानें हिंदुस्थानावर निघावयाचें हुंड्यांचें परिमाण अधिक झालें. ह्याचा अर्थ, हिंदुस्थानांत बाहेर पाठवावयाच्या पौंडास मागणी वाढली व बाहेरची रुपयांविषयींची मागणी कमी झाली; व याचा साहजिक परिणाम असा झाला कीं, रुपयाची किंमत उतरली व पौंडाची किंमत चढली. म्हणजे एक पौंडास दहा रुपये हा जो भाव नुकताच सरकारनें निश्चित केला होता, तो टिकेनासा होऊन पौंड म्हणजे १२, १५, १६ रुपये प्रमाणें तो उतरला. सरकारनें मध्यें पडून या देशांतून लंडनवर कोट्यावधी रुपयांचें नुकसान सोसून हुंड्या विकून हुंडणावळ पडूं न देण्याची शिकस्त केली, पण ती सर्व व्यर्थ जाऊन १९२१ च्या सुरवातीस ती एक रुपयास १ शिलिंग ३ पेन्स या दरावर आली म्हणजे एक पौंडास १६ रुपये हें प्रमाण झालें. तेव्हां सरकारनें हताश होऊन हुंडणावळ उचलून धरण्याचें धोरण सोडलें.

कांहीं कालानंतर हिंदुस्थानचे व्यापाराची परिस्थिति हळूं हळूं अनुकूल होऊन रुपयाचा भाव पुनः चढूं लागला, व १९२४ मध्यें तो १ शि. ४ पे. इतका झाला; आणि सरकारास आपल्या चलन पद्धतीची पूर्वक्त् घडी

बसविण्याची संधि मिळाली. परंतु रुपयाचे भावांत आणखी चलबिचल होऊन युरोपांत शेवटीं स्थिरस्थावर झालें, म्हणजे १८ ते २० पेन्सावर जाऊन तेथें तो स्थिर होईल असें भारतमंत्र्यांस वाटत होतें, व म्हणून हुंडणावळीचा दर कायद्यानें कायम करण्यांत घाई उपयोगी नाहीं, असें त्यांच्या मनानें घेतलें. दुसरें असें कीं, त्यांच्या मतें १६ पेन्सापेक्षां १८ पेन्साचा दर स्वतःच्या तिजोरीस आणि एकंदर परिस्थितीस सोईस्कर आहे. म्हणून १९२४ व १९२५या सालांत रुपया हळूंहळूं वर चढत असतां सरकारनें चांदीचें आणि कागदाचें चलन मर्यादित प्रमाणांत व्यापाऱ्यांस पुरविण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें ह्या रुपयाचे प्रगतीस सहाय्य झालें. सरकारनें चलन पुरविण्याच्या बाबतींत हात आंखडतां घेतल्यामुळें बाजारांत पैशाची टंचाई झाली, आणि वाढत्या हुंडणावळीचे दरांस अनुसरून हिंदुस्थानांतील अंतर्गत पदार्थांच्या किंमती, बाहेरील देशांतील किंमतीच्या अनुरोधानें उतरूं लागल्या. देशांतील धारण आणि परदेशांतील धारण यांची सांखळी जोडणारा हुंडणावळीचा दर हा दुवा असतो. हिंदुस्थानांत अन्य राष्ट्रांच्या मानानें स्वस्ताई व्हावी आणि शक्यतर धारण स्थिर रहावी; या हेतूनें सरकारनें सुमारें एक वर्षपर्यंत हुंडणावळीचा दर कृत्रिम रीतीनें १८ पेन्साच्या सान्निध्यांत राखला.

"हिल्टन यंग कमिशन १९२५"

याप्रमाणें पूर्व तयारी करून, आतां सर्वत्र पुष्कळच स्थिरस्थावर झालें आहे. हुंडणावळीच्या दरांत व हिंदी धारणेमध्यें यापुढें म्हणण्यासारखा चढउतार होण्याचा संभव नाहीं. शिवाय रुपयाचा कायदेशीर भाव एक, तर बाजारभाव भलताच असा प्रकार यापुढें कायम ठेवणेंचें धोरण या उप्पर चालूं ठेवणें, हिंदुस्थानचे हिताचें नाहीं, वगैरे कारण, परंपरा दाखवून रुपयाचा दर १८ पेन्साचा कायद्यानें करून घेणेंचा विचार करून हिंदुस्थान सरकारनें भारतमंत्र्याकडून नवीन करन्सी कमिशन १९२५सालीं नेमून घेतलें.

या बाबतींत चौकशी करण्याकरितां नेमण्यांत येणाऱ्या कमिशनचें कार्यक्षेत्र मर्यादित करून त्यांचे हातपाय बांधून टाकूं नका, अशी स्पष्ट मागणी

हिंदी लोकमतानें केली होती, तिला अनुसरून हिल्टनयंग कमिशनकडे सोंपविलेल्या प्रश्नांची योजना करण्यांत आली. कमिशनला मुख्यत्वेंकरून दोन महत्वाच्या बाबींसंबंधानें आपलें मत बनवावयाचें होतें. पहिली बाब, हिंदुस्थानांत सुवर्णचलन पद्धति पूर्णत्वानें चालू करणें इष्ट व शक्य आहे किंवा नाहीं, आणि दुसरी, मूल्य मापनाचें परिमाण म्हणजे हुंडणावळीचा दर कोणता असावा ही होय.

पहिल्या प्रश्नाचें कमिशननें असें उत्तर दिलें कीं, सध्यांची अर्धबोबडी सुवर्णपद्धति सोडून देणें तर आवश्यक आहे; तथापि सुवर्ण मूल्यमापन व सुवर्णचलन यांची सांगड असलेली व चोहोंकडे प्रचलित असलेली बाळबोध व्यवस्था सुरू करणें अनिष्ट आणि अहितकारक आहे. दुसऱ्या बाबीचा निकाल कमिशननें १८ पेन्स दराच्या बाजूस आपलें ठाम मत देऊन केला. आतां परंपरागत शुद्ध अशी सुवर्णचलन (Gold-standard) पद्धतीही नाहीं, त्याचप्रमाणें त्यावेळीं चालू असलेली घेडगुजरीही पद्धतहि नाहीं, तर मग त्यांच्या ऐवजीं दुसरी कोणती योजना प्रचारांत आणणें शक्य आहे ? ह्याला उत्तर म्हणून कमिशननें तिसराच एक मार्ग सुचविला आणि तो म्हणजे " **सुवर्णखंड मूल्यमापन पद्धति** " हा होय.

" सुवर्णखंड मूल्यमापन पद्धति " (Gold bullion Standard)

टांकसाळीतून सोन्याचें नाणें पाडून देणें म्हणजे सुवर्णाचा अपव्यय करण्यासारखें आहे, आणि तसें करावयाचें ठरविलें, तरी तें मोठ्या खर्चाचें व दुःसाध्य ध्येय असल्यानें नाण्यांच्या ऐवजीं सोन्याच्या लगडी व चिपा देण्याची व्यवस्था झाली असतां सुवर्णचलन पद्धतीचा मुख्य हेतु सिद्धीस जाऊन लोकांचेंही समाधान होईल असें कमिशननें मत दिलें. या पद्धतींत शुद्ध सुवर्णचलन पद्धतींतले दोष नसून गुण मात्र आहेत, असें कमिशननें या पद्धतीचें वर्णन केलें आहे.

या सुवर्णखंड मूल्यमापन पद्धतींत (Gold bullion standard) १८९९ सालापासून १९२७ सालापर्यंत चालू असलेल्या सुवर्णविनिमय

मापक पद्धतिपेक्षां (Gold exchange standard) कांहीं विशेष असल्यास तो हाच कीं, या पद्धतींत खऱ्याखुऱ्या सुवर्णचलन पद्धतीप्रमाणें पदार्थांचें मोल सोन्याच्या भावानें आकारण्याची तजवीज होती; तशीच लोकांस चांदीचें नाणें व नोटा ह्यांचा सोन्याशीं विनिमय करण्याचीही सोय होती.

परंतु या व्यवस्थेंत एक गोम होती ती ही कीं, लोकांस दर तोळ्यास २१ रु. ३ आ. १० पै या भावानें सोनें विकण्याची जी जबाबदारी सरकारवर टाकली होती ती ४०० औंस वजनाचें सोनें एकदम घेणारा-संबंधानेंच फक्त होती. यामुळें या पद्धतींत फारच क्वचित लोकांचे हातांत सोनें लागत होतें हें उघड आहे.

कमिशननें १९२५ सालीं प्रचारांत असलेल्या सुवर्णविनिमय मापक चलनपद्धतीचा (Gold exchange standard) निषेध करून ज्या व्यवस्थेनें हिंदी लोकांस रुपये किंवा नोटा ह्यांचा सोन्याशीं असलेला संबंध प्रत्यक्ष दिसत नाहीं, किंवा जीमध्यें रुपये किंवा नोटा देऊन लोकांस सोनें मोबदला मिळण्याची तरतूद नाहीं असली पद्धति हिंदुस्थानास गैर-लागू आहे असें स्पष्ट मत त्यानें नमूद केलें आहे.

१८९८ सालीं फौलर कमिटीनें हिंदुस्थानांत सुवर्णचलन चालू करावें व सोन्याचें नाणें येथें पाडण्याकरितां टांकसाळ सुरू करावी, अशी शिफारस केली असतां हिंदुस्थान सरकारनें ती धाब्यावर बसवून ही सुवर्णविनिमय मापक पद्धति (Gold exchange standard) प्रचारांत आणली. १९१३ सालीं चेंबरलेन कमिशननें तिच्यावर आपल्या पसंतीचें शिक्कामोर्तब केलें,व १९१९ सालीं बॅबिंगटन स्मिथ कमिटीनेंहि या पद्धतीस मान्यता दिली असतां हिल्टनयंग कमिशननें ती वरील प्रमाणें निषिद्ध ठरविली, ही एक समाधानाची गोष्ट होय. यावरून हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं या पद्धतीवर वेळोवेळीं केलेली टीका सार्थ होती हें आपोआपच सिद्ध झालें.

आज नाहीं उद्यां, सोन्याची टांकसाळ देशांत सुरू होऊन सोन्याचें नाणें चालू होणार अशी लोकांस आशा वाटत होती, तर हिल्टन

यंग कमिशननें आहे तेंहि नाणें काढून टाकून नवीन सुवर्ण चलन कांहीं वर्षेंपर्यंत तरी मुळींच पाडूं नये अशी शिफारस केली.

"सुवर्ण चलनाच्या मार्गांतील अडचणी"

सदर कमिशननें हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरूं न करण्याचा जो अभिप्राय दिला तो कोणता उद्देश मनांत ठेऊन दिला हें खालील एकाच उदाहरणावरून दिसून येईल.

येथें सुवर्णाचें नाणें सुरू केलें तर चांदीचा भाव घसरेल, व चीनमध्यें चांदीचें नाणें सुरूं असल्यामुळें तेथील चलन पद्धतींत घोटाळा माजेल, आणि असें झालें तर त्याचे परिणाम हिंदुस्थानास भोगावे लागतील. हा अभिप्राय कशाच्या आधारावर उभारला आहे हें स. र. चार्लस एडिस यांच्या सदर कमिशन पुढें झालेल्या साक्षींतील खालील एकाच वाक्यावरून कळून येईल. "It (China) is the greatest country, perhaps the only great undeveloped country left for the expansion of **British Industry**" (ब्रिटिश उद्योगधंद्याची वाढ होण्यास चीन खेरीज जगांतील दुसरा कोणताहि मोठा देश आतां शिल्लक उरलेला नाहीं.)

हिंदुस्थानचा चीनमध्यें फारच थोडा हितसंबंध असतांना कमिशननें आपल्या रिपोर्टांत पानेच्या पानें सुवर्णचलन येथें चालू केल्यास चीन देशावर त्याचा काय परिणाम होईल, याचा विचार करण्यांत खर्ची घातलीं आहेत, व सुवर्णचलन येथें चालू करण्याच्या मार्गांतील अनेक अडचणींपैकीं खालील एक अडचण दिली होती:—

(If India adopted a gold currency, the price of silver would fall. It must injure China. This would be a most serious matter, for China is the greatest and perhaps the only great undeveloped market left for the expansion of **International trade**)

[हिंदुस्थाननें सुवर्ण चलन सुरूं केलें म्हणजे चांदीचा भाव घसरेल, चीनमध्यें चांदीचें नाणें सुरू असल्यामुळें तेथील चलन पद्धतींत घोटाळा

माजेल) तसें झालें म्हणजे कठिणावस्था प्राप्त होईल, कारण जागतिक व्यापाराचे वाढीला वाव, काय तो आतां चीनमध्येंच फक्त आहे.]

सर चार्लस एडिस बिचारे भोळे, ते मुत्सद्दी नव्हत. त्यांनीं आपले सरळ सांगून टाकलें कीं " ब्रिटिशांच्या जागतिक व्यापाराच्या वाढीस आतां चीन शिवाय जगांतील दुसऱ्या कोणत्याहि मोठ्या देशांत वाव राहिलेला नाहीं, तरी जेणें करून तेथील चलन पद्धतींत घोटाळा माजेल अशी कोणतीही गोष्ट हिंदुस्थानांत करूं नका. हिंदुस्थानांत सुवर्ण चलन सुरू केलेत तर आमचा चीन-मधला व्यापार बसेल. " परंतु हिल्टन यंग कमिशन पडलें मुत्सद्दी, त्यांनीं हिंदुस्थानांत सुवर्णचलन सुरू केलें तर चीनमधील जागतिक व्यापाराला धोका पोहोंचेल, व त्याचे अनिष्ट परिणाम पुन्हां हिंदुस्थानास भोगावे लागतील असें भासवून सर चार्लस एडिस यांनीं दाखविलेल्या नागड्या स्वार्थावर जागतिक व्यापारोन्नतीचा मुलामा चढवून व हिंदुस्थानाबद्दलचे हिताची कळकळ दर्शवून सर चार्लस एडिस यांचा उद्देश सिद्धीस जाईल अशाच शिफारशी केल्या.

येथें सुवर्ण चलन सुरूं करण्याच्या मार्गांत सदर कमिशनच्या मतानें आणखी असलेल्या बऱ्याच अडचणी खालीलप्रमाणें होत्याः—

" सुवर्ण चलनाच्या मार्गांतील इतर अडचणी "

" सोन्याचें नाणें चालू करावयाचें म्हणजे मोठ्या खर्चाचें काम आहे, त्यास लागणारें सोनें मिळावयाची मारामार पडेल. अमेरिकेंत पुष्कळ सोनें आहे, परंतु तें राष्ट्र व इंग्लंडची मध्यवर्ती पेढी ह्या बाबतींत प्रतिकूल आहे; म्हणून त्यांची मदत किंवा सहानुभूति हिंदुस्थानास मिळणें अशक्य आहे. युरोपांतील राष्ट्रें महायुद्धामुळें झालेल्या आर्थिक आपत्तींतून बाहेर पडण्याची व आपापल्या चलन व्यवस्थेंत सुधारणा करण्याची खटपट करीत आहेत. त्यांच्या कार्यांत हिंदी सुवर्णचलनानें भयंकर व्यत्यय येऊन जगाच्या आर्थिक प्रगतीच्या गाड्यास खीळ घातल्याचें पातक हिंदुस्थानच्या माथीं पडेल; हिंदुस्थाननें रुपयाचा—मुखनाणें (Standard coin) या नात्यानें—त्याग करून सोन्याच्या नाण्याचा अंगिकार केल्यास अमेरिकेंतील

चांदीच्या खाणींचे मालक आणि सराफ चिडून जातील आणि चीनमध्यें असंतोष उत्पन्न होईल; आणि या सर्व घडामोडीचे दुष्परिणाम खुद्द हिंदुस्थानास भोगावे लागतील. अशा तऱ्हेच्या अपवादांवर जोर देऊन कमिशननें हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू करणें सर्व दृष्टींनीं अनर्थावह आहे, असा आपला अभिप्राय दिला.

सदर कमिशनचे शिफारशीनुसार १९२७ सालीं कायदा करण्यांत आला व रुपयास १८ पेन्स हा हुंडणावळीचा दर कायम करण्यांत आला.

" मध्यवर्ती बँकेची आवश्यकता "

औद्योगिक आणि व्यापारी व्यवहारांत **खेळतें भांडवल** पुरविण्याचा धंदा प्रत्येक देशांत अनेक व्यक्ति आणि संस्था शेंकडों वर्षें करीत आहेत. त्यांची कामगिरी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त व्हावी आणि सामाजिक संसार सुरळीत व सुखानें चालण्यास त्यांचें अधिकांत अधिक सहाय्य व्हावें हा मध्यवर्ती बँकेच्या घटनेचा व कार्याचा मुख्य उद्देश आहे.

" मध्यवर्ती बँकेचें कार्य "

मध्यवर्ती बँकेचें कार्य:—मध्यवर्ती बँकेस मुख्य दोन महत्त्वाचीं कामें करावयाचीं असतात. नोटा कमी-जास्त प्रमाणांत काढून बाजारांतील चलनाचें नियंत्रण करणें व बँकांच्या शिलकी रकमा एकत्रित आणून त्यांचे मदतीनें सर्व देशांतील पैशाच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणणें, हीं तीं कामें होत. हिंदुस्थानांत **खुद्द सरकार** आणि **इंपीरियल बँक** या दोहोंमध्यें हीं दोन कामें वाटलीं गेलीं आहेत. आपल्या चलनी नोटा इम्पीरीयल बँकेनें काढलेल्या नसून त्या सरकारनें काढलेल्या आहेत. पण व्यापारी कर्जें देऊन पत वाढविण्याचें व व्याजाचा दर कमीजास्त करण्याचें काम मात्र सरकार करीत नसून इंपीरियल बँक (१९३५) पर्यंत करीत असे. यामुळें दोघांचे रिझर्व्ह, किंवा रोख रकमा स्वतंत्र राहून राष्ट्रास त्यांचा योग्य फायदा मिळत नसे. वरील दोन कामें हिंदुस्थानांतही एकाच बँकेच्या स्वाधीन असावींत.

तसेंच हल्लीं सोनें देऊन नोटा व रुपये सरकारी तिजोरीतून मिळणेचा

हक्क जनतेस आहे; परंतु नोटा व रुपये देऊन आज सरकारी तिजोरींतून सोनें मिळणेंचा हक्क कायद्यानें जनतेस नाहीं, ही बेजबाबदारपणाची स्थिती हितकारक नाहीं, म्हणून ती नाहींशी करून तिच्या ऐवजीं रुपये व नोटा दिल्या असतां सरकारनें लोकांस सोनें दिलें पाहिजे असें सरकारवर बंधन घालण्यांत यावें व हीं कामें व्यवस्थितपणें पार पडण्याकरितां येथें मध्यवर्ती बँक स्थापन करण्यांत यावी, हिल्टन यंग कमिशननें शिफारास केली होती त्यास अनुसरून १९३५ मध्यें सदर मध्यवर्ती बँकेची येथें स्थापना झाली.

" अखेर सुवर्ण परिमाण त्याग १९३१ "

सप्टेंबर १९३१ मध्यें बँक ऑफ इंग्लंडला नोटांच्या मोबदला सोनें देण्याची आपली जबाबदारी पार पाडणें कठीण झाल्यामुळें ब्रिटिश सरकारनें तिच्यामधून त्या संस्थेस मुक्त केलें; आणि त्या कारणानें पौंडाचें स्थिर व निश्चित सुवर्ण परिमाण बंद झालें. तेव्हांपासून पौंडाची सोन्यांतली किंमत औंसास ८४ शिलिंग होती ती १४० ते १४८ शिलिंगापर्यंत गेली. ब्रिटिश चलनाचा सोन्याचा आधार ज्या दिवशीं सुटला, त्याच दिवशीं हिंदुस्थान सरकारनें एक ऑर्डिनन्स काढून आपले रुपयाचाही सोन्याशीं असलेला संबंध तात्पुरता सोडल्याचें जाहीर केलें, यामुळें रुपयाची सोन्याच्या मानाची किंमत अस्थिर व अनिश्चित राहिली असती (Rupee left to find its own level). परंतु ही गोष्ट ब्रिटिश ट्रेझरीस न आवडल्यामुळें भारतमंत्र्याचें हुकुमाप्रमाणें हिंदुस्थान सरकारास दुसऱ्याच दिवशीं आदल्या दिवसाचा ऑर्डिनन्स रद्द करून रुपयाचा संबंध हेलखावे खाणाऱ्या पौंडाशीं १८ पेन्साचे दरानें असल्याचा दुसऱ्या ऑर्डिनन्सनें जाहीर करावें लागलें. यावरून हिंदुस्थान सरकारनें येथील प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें केलेली एकादी गोष्ट ब्रिटिश सरकारास नापसंत असल्यास करतां येत नाहीं, हें स्पष्ट झालें; व येथील चलनपद्धतींतले सर्व फेरफार ब्रिटनचे हिताचे दृष्टीनें होतात ही हिंदी जनतेची तक्रार रास्त असल्याचें जगाचें निदर्शनास आलें.

" रुपयाचा भाव स्टर्लिंगशी जोडणेंवर आक्षेप "

रुपयाचा भाव स्टर्लिंगशीं जोडण्याविरुद्ध हिंदी लोकमत असणेचें कारण कीं, १९३१ सालीं इंग्लंडनें आपले कायदेशीर चलन जो पौंड, त्याचा सोन्याशीं असलेला संबंध सोडला व कागदी पौंड मोकळा सोडला. तेव्हां इंग्लंडमधील आर्थिक परिस्थिती जेणेंकरून सुधारेल अशी परिस्थिति निर्माण करण्याकडे चलनाचा ओघ रहाणार. इंग्लंडमध्यें वर्षांतील १० आठवडे देशास पुरेल इतकेंच धान्य पिकतें व लँकेशायरच्या गिरण्यास लागणारा कापूस व इतर कच्चा माल, परदेशांतून आयात करावा लागतो. जगांतील बाजार पेठेंत तेथील माल इतर देशांतील मालाचे स्पर्धेत यशस्वी होण्यास सदर मालाचें उत्पादन इतर देशाच्या शक्य तितकें कमी खर्चांत होणें आवश्यक असल्यामुळें कच्चा माल शक्य तितका स्वस्त मिळाला पाहिजे म्हणजे इंग्लंडची आर्थिक परिस्थिति सुधारूं शकणार. तर उलटपक्षीं हिंदुस्थान शेतीप्रधान देश असून धान्य व कच्चा माल यांना परदेशांत शक्य तितकी अधिक किंमत येण्यावर येथील शेंकडा ७० टक्के जनतेची आर्थिक परिस्थिती अवलंबून आहे. असा इंग्लंड व हिंदुस्थान देशांतील परिस्थितींत भिन्न-पणा असल्यामुळें, रुपयाचा संबंध कागदी पौंडाशीं जोडणें हिंदुस्थानचे हिताचें नाहीं. म्हणून तसें न करितां इंग्लंडमधील कागदी पौंडाप्रमाणें रुपया मोकळा सोडावा (Rupee to find its own level) त्यांत हिंदु-स्थानचें हित आहे. अशी हिंदी जनतेनें केलेली मागणी धुडकावण्यांत आली, व रुपया स्टर्लिंगशीं जोडण्यांत आला.

" १९३१ सप्टेंबर नंतरचे बाजारभाव व परराष्ट्रीय व्यापार "

लाहोर येथील सनातन धर्मकॉलेजचे अर्थशास्त्राचे प्रोफेसर श्रीयुत ब्रज-नारायण यांच्या मतें " जुलै १९१४ चे बाजारभाव (Index number) १०० धरल्यास १९३० मध्यें ११६ होते. परंतु ऑगस्ट १९३१ मध्यें ते ९२ पर्यंत घसरले. १९३१ सप्टेंबरमध्यें रुपयाचा सुवर्णाशीं असलेला संबंध सोडून तो स्टर्लिंगशीं जोडण्यांत आल्यावर फेब्रुवारीपर्यंत ते ९७ पर्यंत चढले. परंतु तेव्हांपासून ते घसरूं लागून १९३३ मार्चमध्यें ८२

पर्यंत घसरले म्हणजे ऑगस्ट १९३१ मध्यें होते त्यापेक्षांहि १० नी खालीं घसरले व डिसेंबर १९३३ मध्यें ८९ पर्यंत आले.

" गेल्या ५-६ वर्षांतील आयात--निर्यात व्यापाराचे आंकडे तपासले असतां असें दिसून येते कीं, रुपयाचा संबंध स्टर्लिंगशीं जोडल्यापासून हिंदुस्थानला भरीव असा कांहींच फायदा झालेला दिसत नाहीं. उलट निर्यात व्यापारांत एकसारखी घट व आयात मालांत एकसारखी वाढ यामुळें तर परिस्थिति अधिकाधिक बिकट होत चालली आहे. आपल्याला 'होम चार्जेस' करितां प्रतिवर्षी ४० कोटि रुपयांचे वर रक्कम इंग्लंडला पाठवावी लागते; तर १९३२-३३ सालांत व्यापाराचा हिंदुस्थानास अनुकूल असा आढावा (Favaurable balance of trade) फक्त ३' कोटि रुपयांचे आसपास ! बाकीचे देण्याकरितां आपणास परदेशी सोनें पाठवावें लागत आहे. "

" सुवर्णाची निर्गत "

सन १९२८-२९, १९२९-३० व १९३०-३१ या सालांत सोन्याची आयात हिंदुस्थानांत अनुक्रमें २१ कोटी १२ लक्ष, १४ को. १२ ल. व १२ को. ७५ लक्ष रुपयांची झाली. सुवर्णाचे निर्गतीस सुरुवात रुपयाचा संबंध १९३१ सप्टेंबरमध्यें स्टर्लिंग्गशीं जोडण्यांत आला तेव्हांपासून झाली. ऑक्टोबर १९३१ ते मार्च १९३२ पर्यंतचे सहामाहींत ५७ कोटि ५७ लक्ष रुपयांचे सोनें परदेशीं गेलें, तर १९३२-३३ सालांत ६५ कोटि ५२ लक्ष रुपयांचें गेलें म्हणजे १८ महिन्यांत सोन्याची निर्गत १२३ कोटि ९ लक्ष रुपयांची झाली व ५-२-१९३८ अखेर पर्यंत सोन्याची एकूण निर्गत ३१० कोटि रुपयांचे वर झालेली आहे.

" सोनें परदेशीं कां गेलें ? "

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिंदुस्थानांतून सोनें गेलें, तें धान्य व कच्चा माल यांस मागणी कमी आली व भावहि कमी आले; व परदेशी मालाची आयात वाढली, त्यामुळें इंग्लंडमधील आपलें कर्ज वारण्याकरितां (Home-

charges) बरेंच सोनें इंग्लंडमध्यें गेलें व कांहीं सोन्याचा उपयोग इंग्लंड-मधील स्टर्लिंग रोख्यांत गुंतविण्यांत झाला.

" सुवर्ण निर्गतीविषयीं सरकारी दृष्टिकोन "

१९३२ मार्चमध्यें, नामदार व्हाइसराय साहेबांनीं एका भाषणांत असें सांगितलें कीं, ही जी सोन्याची निर्गत होत आहे, ती खात्रीनें हिंदुस्थानास फायद्याची आहे. १९३३-३४ सालच्या बजेटावर लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें भाषण करितांना त्या वेळच्या फिनान्स मेंबरनीं (फडणीस) सांगितलें कीं, "अहो सोन्याचे निर्गतीबद्दल येवढी ओरड कां करतां, त्यांत देशाचें काय नुकसान आहे ? सोन्याच्या ऐवजीं तुम्हास रुपये मिळतातच कीं नाहीं ? इतके दिवस तुमचेजवळ जेथें सोनें होतें त्या ठिकाणीं आतां तुमच्याजवळ रुपये व नोटा आल्या त्यांत तुमचें काय बिघडलें ? " अशा रीतीनें हिंदुस्थान सरकारचा सुवर्णाचे निर्गतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तर हिंदी जनतेचा दृष्टिकोन खालीलप्रमाणें आहे:—

" हिंदी लोकमताचा दृष्टिकोन "

होम चार्जेसकरितां द्यावी लागणारी रक्कम व आयात मालाची किंमत निर्गत मालाचे किंमतींत न भागल्यामुळें तें देणें, सोनें पाठवून फेडणें भाग पडलें. म्हणजे आपल्या कमाईवर आपली उपजीविका न होता मुद्दलांतून उपजीविका करण्याचा एखाद्या कुटुंबावर प्रसंग आल्यास कांहीं कालानें मुद्दल संपल्यामुळें जगण्याकरितां भीक मागणें अगर मरणें येवढे दोन मार्ग त्या कुटुंबास शिल्लक राहतात, त्याप्रमाणेंच आपल्या देशांतील मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सोन्याच्या निर्गतीमुळें आपल्यावर प्रसंग ओढवेल असे विचारी जनतेस वाटत असल्यामुळें त्यांस ही परिस्थिति फार भीषणावह वाटली. म्हणून सरकारनीं ही परिस्थिति चालू न ठेवितां इतर देशाप्रमाणें येथेंहि सोन्यावें निर्गतीवर निर्बंध ठेवावा व सरकारनें हें सोनें खरेदी करून सुवर्णसंचय वाढवून ठेवावा, असा हिंदी जनतेचा आग्रह

होता; परंतु त्याचा सरकारच्चे धोरणावर कांहींच परिणाम न होतां तें जसेंच्या तसेंच अजून कायम आहे.

रुपयाचा १८ पेन्स (स्टर्लिंग) हा दर १९३४ सालीं पास झालेल्या **रिझर्व्ह बँकेच्या बिलांत** हिंदी जनतेच्या मताविरुद्ध कायम करण्यांत आला म्हणजे हिल्टन यंग कमिशननें निषिद्ध मानलेली व्यवस्था प्रचारांत आली. रुपयाची सोन्यांतील किंमत पौंडाच्या संगतींत हेलखावे खात असलेली रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या कायद्यांत कांहीं काल तरी टिकविण्याकरितां नमूद करण्यांत आली. रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या उपोद्घातांत, रुपयाची किंमत सोन्याच्या स्वरूपांत स्पष्टपणें दाखविली जावी अशी सूचना सरकारास करण्यांत आली असतां ती अग्राह्य ठरविण्यांत आली.

रिझर्व्ह बँकेचा कायदा होत असतां, रुपयाचें परिमाण १६ पेन्स असावें कां १८ पेन्स असावें आणि तें कायद्यांत नमूद करावें कीं नाहीं, हा वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाला. रुपयाचें मूल्य १६ पेन्स असावें आणि तें व्यवहारांत यावें म्हणुन कायद्यांत नमूद करावें असें हिंदुस्थानांत बहुमत होतें, तरी १८ पेन्स व तेंही कागदी हेंच प्रमाण बरींच रणें माजून शेवटीं नमूद करण्यांत आलें हें आपण वर पाहिलेंच आहे.

एक गैरसमजः—रुपयाचा भाव १६ पेन्सांचे ऐवजीं १८ पेन्सांचा असणें हें आपल्या देशाच्या हिताचें नाहीं, असें आपण अर्थशास्त्रज्ञांच्या व्याख्यानांतून ऐकतां व वर्तमान पत्रांतील लेखांवरून वाचतों, तेव्हां तें विधान आपणास विचित्र असें वाटूं लागतें. कारण तें विधान आपणास आपल्या नेहमींच्या व्यवहारांतील अनुभवाविरुद्ध भासतें.

एक रुपयास १६ शेर ज्वारी मिळण्याच्या ऐवजीं आपणांस बाजारांत १८ शेर ज्वारी मिळाली तर त्यांत आपलें नुकसान होतें असें वाटणार नाहीं. त्यावेळीं रुपयास १८ शेर ज्वारीचें ऐवजीं मला १६ शेर ज्वारी दे, असें जर एखादा मनुष्य एखादे दुकानदारास म्हणेल तर आपण त्याची अर्थशास्त्रज्ञांत गणना न करितां त्यास आपण वेड्यांत काढूं. असें जर आहे तर रुपयास १६ पेन्स जेथें मिळत होते तेथें जर आतां १८ पेन्स मिळूं लागले तर आम्हांस

१८ पेन्स नकोत, रुपयास १६ च पेन्स पाहिजेत असा हट्ट कां ! आणि त्याबद्दल देशाचे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत एवढी ओरड कां ?

" गैर समाजाचें निरसन "

हें कोडें अर्थशास्त्रांतील खालील सिद्धांत आपले लक्षांत येतांच उलगडतें. रुपया हें चलन आहे, म्हणजे वस्तू विकत घेणेचें साधन आहे आणि चलनाची म्हणजे साधनाची किंमत वाढली म्हणजे त्याचें वस्तू विकत घेण्याचें सामर्थ्य वाढतें, म्हणजेच पदार्थांचें बाजारभाव उतरतात;याचाच अर्थ स्वस्ताई होते, व चलनाची म्हणजे पदार्थ विकत घेणेच्या साधनाची किंमत उतरली म्हणजे त्याचे पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य कमी होतें; म्हणजे वस्तूचे बाजारभाव चढतात याचाच अर्थ महागाई होते.

तसेंच वरील कारणामुळेंच चढती हुंडणावळ देशाच्या निर्गत मालास अटकविणारी असून आयात मालास उत्तेजक असते; याचे उलट उतरती हुंडणावळ देशाचे निर्गत मालास उत्तेजक व आयात मालास अटकविणारी असते.

हिंदुस्थान देश शेती प्रधान असल्यामुळें प्रतिवर्षीं या देशांतून धान्य व कच्चामाल परदेशी जातो, त्यामुळें १६ पेन्साचा रुपयाचा भाव असता परदेशीं खपलेल्या आपल्या मालाबद्दल १ पौंडास १५ रुपये मिळत तेथें १८ पेन्साचा भाव झाल्यानें आपले पदरांत (१३ रु. ५ आ. ४ पै पडतात परंतु हिशेबाचे सोईकारिता १३ रु. ८ आ. धरले आहेत) १३॥ रुपयेच फक्त मिळतात आणि म्हणून आपले निर्यात मालाबद्दल आपणास कमी रक्कम येते व अशा रितीनें आपलें नुकसान होतें. तसेंच परदेशचे आयात मालाबद्दल १६ पेन्सांचा दर असतां एक पौंडाचे मालास आपणास १५ रुपये पडत होते, तेथें आतां १३॥ रुपयेच पडूं लागल्यामुळें परदेशी माल येथें स्वस्त येऊन पडून येथील कारखान्यांत तयार झालेल्या मालाचे स्थानिक खपांत जरूर तेवढा नफा न सुटल्यामुळें येथील कारखाने डबघाईस येतात, व अशा रीतिनेंही देशाचें नुकसान होतें.

यावरून रुपयाचा दर १६ पेन्साचे ऐवजीं १८ पेन्सांचा असणें आपल्या देशाच्या हिताचें नाहीं, या विधानाची सत्यता पटेल.

याचें अधिक स्पष्टीकरण आपण हुंडणावळीचे दराविषयींचे वादाचे रहस्याचा विचार करतांना करूं.

प्रकरण तिसरें

" कौन्सिल बिलें, व रिव्हर्स कौन्सिल बिलें "

आपली हल्लींची चलनपद्धती, म्हणजे ना धड रौप्य चलनपद्धति ना सुवर्ण चलनपद्धति, तर जीस सुवर्ण विनिमय मापन–पद्धति म्हणतात, ती आहे. रुपये हें उपनाणें (Token coin) असून त्याचा सोन्याशीं ठरीव संबंध कायम राखणें हा या चलन पद्धतीचा आत्मा आहे. हें कार्य कसें घडवून आणलें जाते हें समजणें आवश्यक आहे. याकरितां हिंदी चलन पद्धतीला वैशिष्टय म्हणून गाजलेला प्रकार म्हणजे कौन्सिल बिलें व रिव्हर्स कौन्सिल बिलें, याविषयीं आतां आपण थोडक्यांत विचार करूं.

इंग्लंडमध्यें सेक्रेटरी ऑफ स्टेट (भारतमंत्री) म्हणून जो अधिकारी असतो त्यास सल्लागार मंडळ दिलेलें आहे. या मंडळास इंग्रजींत " कौन्सिल " असें म्हणतात. या कौन्सिलनें काढलेलीं जीं बिलें त्यांस कौन्सिल बिलें म्हणतात. बिल म्हणजे हुंडी. यास आपण सरकारी हुंडी असें म्हणू.

हुंडी म्हणजे तिसऱ्या माणसास अमुक रुपये देण्याबद्दल एका माणसानें दुसऱ्या इसमास लिहिलेलें पत्र; अर्थात् हुंडी म्हटली म्हणजे तेथें तीन माणसांचा संबंध येतो. पत्र देणारा, ज्याच्या नांवानें पत्र दिलें असेल तो, व ज्याला पैसे द्यावयाचे असतील तो. वरील प्रकारांत (कौन्सिल बिलांत) स्टेट सेक्रेटरी हा हिंदुस्थान सरकारवर हुंडया काढतो; म्हणजे स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थान सरकारास असें लिहितो कीं, तुम्ही अमूक इसमास अमूक रुपये द्या. तेव्हां स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थान सरकार या दोन व्यक्ति सरकारी

हुंडयांच्या संबंधानें कायम असतात. तिसरी व्यक्ति म्हणजे व्यापारी वर्ग होय.

स्टेट सेक्रेटरी हुंड्या कां काढतो ?—त्याला पैसे पाहिजे असतात म्हणून. हे पैसे त्याला कां लागतात ? होमचार्जेसकरितां, म्हणजे स्टेट सेक्रेटरीचे कचेरीचा खर्च, हिंदुस्थानकरितां इंग्लंडमध्यें उभारलेल्या कर्जावरील व्याज देणें, सिव्हिल सर्व्हंटस्‌ची (सनदी नोकर) पेन्शनें वगैरे कारणाकरितां त्यास दोन ते तीन कोटि पौंडाचे आसपास वार्षिक खर्च करावा लागतो. याकरितां त्यास पैशाची जरूर असते. आतां हिंदुस्थान सरकारावरच या हुंडया कां काढावयाच्या ? तर हा पगार देण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारावर आहे म्हणून.

आतां या हुंड्या विकत घेणारे व्यापारी कोण ? हिंदुस्थानांतून जो माल इंग्लंडला जातो त्याचे पैसे तो मागविणाऱ्यांना इकडे पाठवावयाचे असतात. हे लोक हीं कौन्सिल बिलें म्हणजेच सरकारी हुंडया विकत घेतात. कारण रोख पैसे पाठविण्यापेक्षां हुंडया घेऊन पाठविणें त्यांस सोयीचें पडतें. वरील हुंडया विकत घेऊन त्या हे विलायतचे व्यापारी ज्यांच्याकडून माल मागविला असेल त्यांच्याकडे हिंदुस्थानांत पाठवितात. मग हिंदुस्थानांतील व्यापारी त्या हुंड्या हिंदुस्थानसरकारवर लागू करतात. हुंडी पाहतांच येथील सरकार हुंडीचे पैसे येथील व्यापाऱ्यांस देतें. हे पैसे विलायतेंत हिंदुस्थान सरकाराकरितां खर्च केले जातात, म्हणून ते हिंदुस्थानचे तिजोरीतून दिले जातात. **हिंदुस्थान सरकारचे तिजोरींत पैसे कोठून येतात ?** अर्थात हे पैसे येथील लोकांकडून करांच्या रूपानें सरकारी तिजोरींत आलेले असतात. यावरून आपल्या ध्यानांत एक गोष्ट आली असेल कीं, कौन्सिल बिल्सचा प्रकार हिंदुस्थानच्या विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळें उत्पन्न झाला आहे, दुसऱ्या कोणत्याही देशांत अशी स्थिती नाहीं. वसाहती व इंग्लंड यांच्यामधील हुजवी व्यवहार पेढ्यांच्या मार्फत होत असतो. म्हणजे एखाद्या वसाहतीला ब्रिटिश सरकारास पैसे पाठवावयाचे असले तर वसाहत सरकार तेथील बँकेचीं बिलें विकत घेऊन तीं इंग्लिश सरकारकडे पाठवितें. हुंड्या विकण्याचें व विकत घेण्याचें काम पेढ्या करितात आणि पेढ्यांकडून व्यापारी व्यक्तिशः त्या विकत घेतात.

हिंदुस्थान सरकारास विलायतेस दरसाल दोन ते तीन कोटी पौंडाचे आसपास होमचार्जेसबद्दलची रक्कम पाठवावी लागते हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां सरकारी हुंड्या तेवढ्याच किंमतीपर्यंतच्या निघत असतील असा तर्क करणें साहजिक आहे; व सन १८९३ पर्यंत अशीच वस्तुस्थिती होती. १८९३ सालीं सरकारी टांकसाळींतून चांदी देऊन रुपये पाडून घेण्याचा लोकांचा हक्क बंद करण्यांत आला, तेव्हांपासून सरकारी हुंड्यामुळें व्यापारांत चलबिचल होऊं लागली आणि भारतमंत्र्याचें ऑफीस म्हणजे एक व्यापारी पेढी बनली. तथापि १९०२–३ सालापर्यंत होमचार्जेसकरितां लागणारा सरकारी खर्च व हुंड्या ह्यांत फारशी तफावत नव्हती. सन १९१४–१५ सालीं लढाई असल्यामुळें हुंड्यांची संख्या कमी होती. कारण हिंदुस्थान सरकारासच विलायत सरकाराकरितां पुष्कळ खर्च करावा लागला; परंतु बाकीच्या सालीं खर्चापेक्षां भारतमंत्र्यानें हुंड्या पुष्कळच जास्त काढल्या, त्या कां व कशा ?

प्रथमतः हुंड्या घेण्यास लोक तयार असत म्हणून सरकारी हुंड्या बाजारांत खपत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हुंडया कां खपत ? तर विलायतच्या लोकांना या देशांत पैसे पाठवावयाचे असत म्हणून; पैसे कां पाठवावयाचे असत ? तर इकडून नेलेल्या मालाची किंमत द्यावयाची असे म्हणून. म्हणजे हिंदुस्थानांतून जो माल जात असे तो आयात मालापेक्षां नेहमीं अधिक असे. आमच्याकरितां विलायतेंत होणारा खर्च वजा जाऊनही आमचें येणें बाकी राहातेंच. यावरून हें उघड आहे कीं सरकारी हुंड्या जर होम चार्जेसच्या खर्चापेक्षां भारतमंत्र्यानें अधिक काढल्या नसत्या तर विलायती व्यापाऱ्यांना हिंदुस्थानांत रोकड पाठवावी लागली असती. सरकारी हुंड्या जास्त निघत तरी सुद्धां कांहीं रोकड या देशांत यावी लागेलच. पण या हुंड्यांच्या योगानें काय परिणाम होत असे तें आपल्या लक्षांत आलेंच असेल. हुंड्या विकल्यामुळें ह्या देशांत जें सोनें यावयाचें त्या ऐवजीं रुपयेच मिळत. कारण हुंड्यांच्या विक्रीनें सोनें भारतमंत्र्याजवळ राही, व येथें व्यापाऱ्यांस हिंदुस्थान सरकारकडून हुंडणावळीचा भाव असेल त्याप्रमाणें रुपये मिळत. खर्चापेक्षां जास्त हुंड्या काढण्यांत व्यापाऱ्यांची

सोय असेच; पण त्यांत सरकारचेही विशिष्ट हेतु साध्य करावयाचे असत. हे हेतु कोणते तें आतां आपण पाहूं.

१८६१ सालापासून १८९३ सालापर्यंत सोन्याची सर्व जगांतील निपज जवळजवळ सारखीच असून चांदीची निपज मात्र चौपट झाली. चांदीचा भाव खालावल्यामुळें हिंदुस्थान सरकारची फारच तारांबळ उडाली हें आपण मागें पाहिलेंच आहे. येथील सरकारास प्रतिवर्षी इंग्लंडमध्यें सुमारे दोन ते तीन कोटि पौंड खर्च करावा लागे. तो तेथें सोन्याचें नाणें सुरू तर येथें रुप्याचें नाणें सुरू. तेव्हां वरील दोन कोटि पौंडाबद्दल किती रुपये द्यावयाचे हा प्रश्न ! म्हणजे १ रुपया दिला तर आपणांस इंग्लंडमध्यें किती पेन्साचे देणें वारतां येईल हें पाहून तितके रुपये द्यावे लागतील; अर्थात् इंग्लंडच्या बाजारांत सोन्याचा जो भाव असेल त्या मानानें रुपये द्यावें लागतील. आतां सोनें महाग झालें, अगर चांदी स्वस्त झाली, तर आपणास अधिक रुपये द्यावे लागतील हें उघड आहे. चांदी पुष्कळ झाल्यामुळें तिचा भाव उतरला हें वर सांगितलेंच आहे. १८७२ सालीं एक रुपयास २४ पेन्स विकत घेण्याकरितां एक रुपयाचें ऐवजीं १८९३ सालीं जवळजवळ पावणेदोन रुपये देण्याचा प्रसंग आला. ठोकळ मानानें, रुपयाचा भाव एक पेन्सानें जरी कमी झाला तरी दहा लाख पौंडाचा बोजा हिंदुस्थानवर चढतो, यामुळें अंदाजापेक्षां फारच जास्त रुपये पाठविण्याचा प्रसंग आला तेव्हां यांस काय उपाय योजावे इकडे सरकारचें लक्ष लागलें. स्वस्त झालेले रुपय महाग करावयाचे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण हे कोणत्या उपायानें करावयाचे हा मुख्य प्रश्न. तसेंच या देशांत रुप्याचें नाणें असल्याकारणानें हा प्रसंग उद्भवतो, करीतां या आपत्तीचे बीज जी ही चलनभिन्नता तेंच समूळ नाहींसें करणें हा दुसरा उपाय. या शिवाय तिसरा उपाय म्हणजे हिंदुस्थानसरकारनें इंग्लंडमधील आपला खर्च कमी करणें. इंग्लंडमध्यें कर्ज न काढतां ह्याच देशांत कर्ज काढलें म्हणजे दोन तीन कोटींची बचत होईल. (३१ मार्च १९३३ रोजीं हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें उभारलेल्या एकूण कर्जाचा आंकडा सुमारें ३८ कोटि पौंड आहे. रुपयास १८ पेन्स या दरानें रुपयांत या कर्जाचा आंकडा सुमारें ५०५ कोटि ३६ लक्ष रुपयाचा होतो,

व हिंदुस्थानांतील एकूण कर्जाचा आंकडा ७०५ कोटि ५० लक्ष आहे. म्हणजे हिंदुस्थानसरकारास एकूण कर्ज १२१० कोटि ८६ लाख रुपयांचे आहे.)

तीच गोष्ट इंडिया ऑफिसच्या (स्टेट सेक्रेटरीचे) खर्चाची. त्यांतील हिंदुस्थान सरकारचे नोकरास रुपयांतच पगार देण्यास हरकत कां असावी? या देशाचें चलन चांदीचें असल्यामुळें सर्व कामगारांचा पगार या चलनांतच कायम करणें अन्यायाचें नाहीं. आतां १९२०–२१ सालापासून तर इंडिया ऑफिसच्या खर्चापैकीं दरसाल १३६५०० पौंड खर्च आपण सोसण्याचें विलायत सरकारनें ठरविलें आहे, त्याचप्रमाणें सरकारी खात्यांना लागणारा माल पुष्कळसा येथेंच खरेदी केला तर तीहि कटकट मिटण्यासारखी होती. तात्पर्य इंग्लंडमध्यें होणारा खर्च बंद करणें, निदान त्या दिशेनें प्रयत्न करणें अशक्य कोटींतील नव्हतें. परंतु हर्षेल कमिटीनें लोकांकरितां टांकसाळ बंद केली व रुपयाचा भाव १६ पेन्स ठरविला. त्यावेळीं रुपयांतील चांदीची किंमत सुमारें १४॥ पेन्साचे आसपास होती. या हर्षेल कमिटीच्या शिफारशीनुसार तिसरा फरक म्हणजे सोनें कायदेशीर फेडीचें चलन झालें, मात्र सोन्याचें नाणें या देशांत पाडण्याचा विचार झाला नव्हता.

१८९९ सालीं फौलर कमिटीनें खालील शिफारशी केल्या. (१) हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करावें (२) हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें पाडून द्यावें (३) रुपया उपनाणें (Token coin) करूनही अमर्यादित (Any amount) रकमेपर्यंत तें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून कायम ठेवावें (४) रुपये पाडून जो फायदा होईल त्याचें सोनें घेऊन पुढें सोन्याचें नाणें पाडण्याकरितां वेगळे ठेवावें. ह्यापैकीं सोन्याचें नाणें चालू करण्याचे कांहीं वर्षें घाटत होतें. पण अखेरीस तो विचार ब्रिटिश ट्रेझरीनें फार विघ्नें आणल्यामुळें कायमचा सोडून देण्यांत आला व बाकीच्या सूचना सरकारनें अमलांत आणल्या.

सोन्याचें मुख्य नाणें सुरूं करणें यावरच बाकीच्या सूचना अवलंबून होत्या. सोन्याचें नाणें पाडण्याची शिफारस कमिटीनें केली नसती तर

सोन्याचा संचय करण्यास सांगण्याचेंही प्रयोजन नव्हतें. तसेंच देशांत मुख्य नाणें सोन्याचें असावें असल्या शिफारशीमुळेंच रुपया हा उपनाणें करण्याचें कमिटीनें सुचविलें. पण मुख्य सूचना सोडून तिला पोषक ज्या दुसऱ्या सूचना तेवढ्याच उचलल्यानें हिंदुस्थानच्या चलन पद्धतींत अधिकच घोटाळा माजला.

ह्यापुढें आपल्या चलनपद्धतीला निराळेंच स्वरूप येऊं लागलें. ह्या देशांत, सोन्याचें नाणें नाहीं व सोनेंही नाहीं. मुख्य नाणें रुपया हें तर उपनाणें (Token coin) होऊन बसलें व रुपयांतील चांदीतील बाजारी किंमत दहा अकरा आणे तर रुपयाचा कायदेशीर दर १६ आणे अशी स्थिती झाली. १९२७ पर्यंत या देशांत "गोल्ड एक्सचेंज स्टॅन्डर्ड" होतें; "गोल्ड स्टॅन्डर्ड" नव्हतें. रुपया हें उपनाणें (Token coin) झाल्यामुळें तो मोलाचें परिमाण (Standard of value) नाहीं. एक रुपया दिला असतां जितकें सोनें मिळेल तेंच १९३१ पर्यंत परिमाण समजण्यांत येत होतें व ह्याचेंच नांव "गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड" ह्या योजनेच्या मुळाशीं कल्पना अशी होती कीं देशांतील व्यवहाराकरितां रुप्याचें व कागदी नाणें बस्स आहे. सोन्याच्या नाण्याचें कांहीं कारण नाहीं. परदेशीय व्यवहाराकरितां फक्त सोनें असलें म्हणजे पुरे. देशांतील लोकांना रुपये देऊन सोनें हक्कानें मागता येऊं नये. पण ठरीव दरानें व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं आयात मालाची किंमत देण्याकरितां सोनें परदेशी पाठवितां येईल अशी सरकारनें तजवीज करावी. यासाठीं हा सुवर्णनिधी इंग्लंडमध्यें असावा, कारण इंग्लंडचे बाजारांतच हिंदुस्थानास पैसे द्यावयाचे असतात. सोन्याचें नाणें ह्या देशांत पाडतां यावें म्हणून रुपये पाडून झाले. नफ्यांतून सुवर्णनिधी करावयाचा हा फौलर कमिटीचा उद्देश एका बाजूस ठेवून त्याचा उपयोग परदेशीय कर्ज सोन्यांतच फेडतां यावें व हुंडणावळीचा सरकारी दर कायम राखणें, या उद्देशाकडे सदर निधीचा उपयोग करण्याचें निश्चित झालें.

सुवर्णनिधीला १९०१ सालीं सुरवात झाली. हिंदुस्थान सरकारनें रुपये पुष्कळ पाडले. त्यामुळें नफाही पुष्कळ झाला. सन १९०० सालापूर्वी इंग्लंडमध्यें हिंदुस्थानचें सोनें मुळींच नव्हतें; व १८९० सालाच्या अगोदर

या देशांतही तीच स्थिती होती. पण रुपया उपनाणें ठरलें. सरकार वाटेल तेव्हां रुपये पाडणार, कौन्सिल बिलें जास्त विकलीं गेलीं व सरकारी खजिन्यांत तितके रुपये नसले म्हणजे अधिक रुपये पाडणें अवश्य होतें. चांदी जितकी स्वस्त तितका हा नफा अधिक. रुपये वितळविण्यांत आतां लोकांचा फायदा नसल्यामुळें नवीन पाडलेला प्रत्येक रुपया चलनांत भर घालतो. नाणें फाजील झालें म्हणजे पदार्थ महाग होतात. आतां सरकारनें रुपये कितीही पाडले तरी लोकांस गरज नसल्यामुळें घेतो कोण व कसे घेणार अशी शंका येईल. त्यासाठीं ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं सरकार रुपये पाडतें त्यास तीन कारणें असतात. सरकारास स्वतः खर्च करावयाचा असेल तेव्हां लोकांनीं सरकारास सोनें किंवा सॉव्हरिन नेऊन दिले व त्या ऐवजीं मागें सांगितलेल्या भावानें रुपये मागितले असतां किंवा सरकारी हुंड्या वटविण्याकरितां भारतमंत्री कौन्सिल बिलें लागतील तेवढीं विकून त्याचे आलेले सॉव्हरीन आपलेजवळ ठेवीत असे. आणि हिंदुस्थान सरकारास त्या हुंडयांचे रुपये देण्यास लावित असे. येथून पुढें इंग्लडमध्यें हिंदुस्थानचें सोनें राहूं लागलें.

कागदी चलन निधी

सन १८६१ च्या कायद्यानें कागदी चलन काढण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें आपलेकडे घेतला. १८९८ चा कायदा होईपर्यंत हा निधी रुपयांतच होता. या कायद्यानें या निधींत सोन्याचें नाणें ठेवण्याचें ठरलें, या नंतर हिंदुस्थानांत सोनें जमा होऊं लागलें, तोंच १९०० च्या कायद्यानें ते सोनें विलायतेंत ठेवण्यास सवड मिळाली. त्याचा परिणाम असा झाला कीं, ९-१० कोटिपर्यंत सोनें विलायतेंत राहूं लागलें. हें सोनें इंग्लंडमध्यें कां ? असा प्रश्न उद्भवतो. याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, सोन्याची जरूरी येथल्यापेक्षां तेथेंच अधिक. तेथें सोनें ठेवल्यानें रुपये पाडण्यासाठीं त्या देशांत चांदी खरेदी करावी लागते तेव्हां आयत्या-वेळीं सोनें उपयोगी पडावें. निर्गतीपेक्षां आयात जास्त झाल्यास इकडून सोनें पाठविण्याची दगदग व खर्च वाचेल. त्याचप्रमाणें इंग्लंडमध्यें सोनें

असल्यानें रुपया—सोन्याचा दर कायम ठेवण्यास सोनें देण्याची पाळी आल्यास अधिक मदत होईल. यावर उलट म्हणणें असें आहे कीं, कागदी चलनाच्या ऐवजी तितकीच रोकड ठेवण्याचा उद्देश इंग्लंडांत सोनें ठेवल्यानें सफल होत नाहीं. कागदाला किंमत नाहीं. त्याचे वाटेल तेव्हां रुपये मिळतील असा भरंवसा असल्यामुळें कागदाच्या चिटोऱ्यांना एक हजार, दहा हजार रुपये असेंच समजून लोक तें वापरतात. पण जेथें कागदी चलन तेथेंच हा निधी नाहीं, तर प्रसंगाला त्या निधीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तसेंच चांदी विकत घेण्याकरितां सोनें ठेवणें तें नियमित प्रमाणांत ठेवतां येण्यासारखें आहे. परंतु चांदी लंडनचेच बाजारांत कां घ्यावी ? येथील बाजारांतच चांदी घेणेचे ठरविल्यास चांदीचे व्यापारी लंडनचे ऐवजीं येथील बाजारांतच चांदी खास आणूं लागतील. त्याचप्रमाणें निर्गतीहून आयात माल फारच अधिक—असा प्रसंग फारच क्वचित येतो. कागदी-चलन, निधीपैकीं विलायतेंतील सोनें बँक ऑफ इंग्लंडमध्यें ठेविलें जातें. यानंतर नियमित रकमेपर्यंत रोकडी ऐवजीं रोखे ठेवण्यास सवलत कायद्यानें दिली असल्यामुळें त्याचाही फायदा इंग्लंडलाच मिळतो.

सन १९१२ पासून चार कोटि रुपये विलायतेंत कर्जांत अडकविले होते. या देशांत मिळतें तितकें व्याज इंग्लंडमध्यें मिळत नाहीं; येथें ५½ टक्के पर्यंत मिळूं शकतें! पण विलायतेंत २½ टक्के व्याजाचे कर्जरोखे घेणें प्राप्त होतें. म्हणजे चार कोटि रुपये विलायती व्यापाऱ्यांना हलक्या व्याजानें वापरण्यास सांपडतात.

सुवर्णविनिमय परिमाणनिधी

(Gold Standard Riserve)

आतां आपण सुवर्णविनिमय परिमाणनिधीचा विचार करूं. हा निधी प्रथम सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत सुरू करण्याच्या उद्देशानें स्थापित झाला व रुपये पाडून जो नफा होईल त्या नफ्यांतून हा सुवर्णनिधि निर्माण करणेचें ठरलें. या निधीस जरी "गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह" म्हणतात, तरी यांत कांहीं रुपयेहि ठेवलेले असत. तेव्हां सुवर्णनिधी हें नांव अगदीं सार्थ होतें

असें म्हणतां येत नाहीं. हा निधी १९०० सालापासून सुरू झाला आहे. हें आपण मागें पाहिलेंच आहे. तो हल्लीं सुमारें ४ कोटि पौंडाचें आसपास असून इंग्लंडमध्यें ठेविलेला आहे. ह्या सुवर्णनिधींत सोन्याचा पत्ता नसे. सर्वच कागद, तेव्हां याला सुवर्णनिधी म्हणण्यापेक्षां कागदनिधी म्हणणें अधिक संयुक्तिक होतें. १९३५ सालापासून परिस्थिती बदलली आहे. जमलेले जवळ जवळ सर्व सोनें कर्जरोख्यांत गुंतविलेलें होतें, म्हणजे या सोन्याचा फायदा विलायतच्या लोकांना मिळाला हें तर उघड दिसतेंच. पण सोनें जमवून ठेवण्याचा उद्देश काय? तर प्रसंगीं, निर्गतीपेक्षां आयात जास्त होऊन व्यापाराचा आढावा (balance of trade) हिंदुस्थानच्या विरुद्ध जाईल तेव्हां इकडून परदेशी सोनें पाठवावें लागेल त्यावेळीं हा निधी उपयोगी पडावा. पण हातचें सोनें गमवून व त्याचे कागद करून ठेविल्यानें वरील हेतु सफल होण्याजोगा नाहीं. रोखे विकल्याशिवाय सोनें जरूर तेव्हां कसें मिळणार? आणि शिवाय अडचणीचे प्रसंगीं रोख्यांचाहि भाव उतरतो आणि घाईघाईनें येईल त्या भावानें ते आयत्या वेळीं विकावे लागतात. आणि त्यामुळें पुष्कळ नुकसान सोसावें लागतें. प्रत्यक्ष सोनें ठेवणेपेक्षां कर्जरोख्यांत तें गुंतविलें म्हणजे त्यावर व्याज सुटतें ही सबब निरुपयोगी आहे. कारण व्याजाकरितां कांहीं सोनें जमविलेलें नाहीं. शिवाय सुवर्णनिधी म्हणजे कागदनिधी नव्हे. प्रत्यक्ष सोनें जवळ असेल तेव्हांच हुंडणावळीचा भाव कायम राखण्यास त्याचा उपयोग होईल. सोनें इंग्लंड-मध्यें ठेवल्यानें व तेंही रोख्यांत अडकविल्यामुळें कशी आपत्ति ओढवते ही गोष्ट १९०७ च्या प्रसंगावरून ध्यानांत येईल. म्हणून त्या प्रसंगाची हकी-कत थोडक्यांत पहाणें इष्ट आहे.

१९०७ चा प्रसंगः—

या सालीं पाऊस न पडल्यामुळें सर्व देशभर दुष्काळ पडला. अर्थात् निर्गत कमी होऊन आयात माल मात्र दरसाल इतकाच भरला; त्यामुळें विलायती व्यापाऱ्यांकडे हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांस पैसे म्हणजे सोनें पाठविणें जरूर पडलें. येथील व्यापाऱ्यांजवळ तर सोनें नाहीं. लोक सोनें पुरून अगर

संचित करून ठेवतात. हा आरोप खरा असता तर व्यापाऱ्यांनीं सोनें विलायतेंत बिनबोभाट रवाना केलें असतें, आणि सरकारही पेचांत पडलें नसतें; पण सोनें व्यापाऱ्यांच्या हातीं लागणार नाहीं अशीच चलन पद्धतीची योजना असल्याकारणानें, प्रसंग ओढवला म्हणजे व्यापाऱ्यांना सरकारकडे धांव मारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. सरकारनें "गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड रिझर्व्ह" बनवितांना परदेशीं पाठविण्याकरितां येथील व्यापाऱ्यांस आम्ही सोनें पुरवूं असें वचन दिलें. किंबहुना हा रिझर्व्ह स्थापण्यांत हाच प्रधान हेतु होता; असें असून १९०८ सालीं व्यापाऱ्यांना सोनें वेळेवर मिळालें नाहीं. १९०७ च्या सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस एकंदर सोनें–रोकड व रोखे मिळून–सरकारजवळ तीन कोटि नऊ लाख पौंड होतें. त्यापैकीं एके-चाळीस लक्ष पौंड या देशांत असून बाकीचे विलायतेंत होतें. पण तेथेंही प्रत्यक्ष रोकड एक कोट तीन लक्ष पौंड काय ती होती. ५२ लक्ष पौंड थोड्या मुदतीनें कर्जाऊ लावले असून एक कोटि ५४ लक्ष पौंडाचे रोखे होते. स्टेट सेक्रेटरीनें आपल्या खर्चास लागणारा पैसा उभा करण्याकरितां हुंड्या काढल्या पण हिंदुस्थानांतील निर्गत या वर्षांत फारच कमी असल्यामुळें, विलायती व्यापाऱ्यांस हिंदुस्थानात पैसे पाठविण्याची आवश्यकता नसल्यामुळें, त्या हुंड्या घेणार कोण ? नोव्हेंबर १९०७ अखेर म्हणजे १९०७–८ सालापैकीं ८ महिन्यांत साऱ्या वीस लाख पौंडाच्या हुंड्या काय त्या विकल्या गेल्या. यापुढें या सालांत कौन्सिल बिल्स काढलींच नाहींत. रुपयास मागणी कमी होऊन पौंडास मागणी वाढल्यामुळें रुपयाचा भाव उतरला. म्हणजे हुंडणावळीचा जो रुपयास १६ पेन्स असा दर ठरला होता तो घसरूं लागला. हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना सोनें विलायतेस पाठविणेंकरतां पाहिजे होतें. ते येथें मिळालें असतें म्हणजे इतकी धांदल उडाली नसती. पण येथें सोनें फक्त ४१ लक्ष पौंड; तें देऊन टाकण्याचें धैर्य सरकारास होईना. नंतर सरकारनें सोनें देऊं केलें. पण एका व्यक्तीस अगर संस्थेस दहा हजार पौंडापेक्षां जास्त सोनें देण्यास सरकार तयार होईना. ह्याप्रमाणे कांहीं दिवस गेले. इंग्लंडमध्यें भारतमंत्री आपला नेहमींचा खर्च कागदी चलन निधींतील सोन्यांतून भागवूं लागला. डिसेंबर पर्यंत असेंच चाललें

होतें. यापुढें हिंदुस्थान सरकारनें भारतमंत्र्यावर हुंड्या काढल्या, यासच 'रिव्हर्स कौन्सिल बिलें' किंवा परत हुंड्या असें म्हणतात. येथील व्यापाऱ्यास इंग्लंडमधील व्यापाऱ्यांना तेथून आयात केलेल्या मालाबद्दल पैसे देणें असल्यामुळें, या परत हुंड्या भराभर खपूं लागल्या. १९०८ चे मार्च महिन्यांत विलायतेंतील सुवर्ण निधींतील हिंदुस्थानसरकारचे सर्व रोकड सोनें खलास झालें. यापुढें हिंदुस्थान सरकारच्या भारतमंत्र्यावरील परतीच्या हुंड्यांचे पैसे रोखे विकून भारतमंत्र्यानें दिले. १९०८ च्या ऑगस्टपर्यंत एकंदर ८० लक्ष पौंडाचे रोखे विकले गेले. १९०७ च्या सप्टेंबरमध्यें ३ कोटि ९ लक्ष पौंडाचें सोनें होतें तें १९०८ सप्टेंबरांत एक कोटि ११ लक्ष पौंडांचें सोनें राहिलें. याशिवाय इंग्लंडांत याच सुमारास जें कर्ज काढिलें त्यापैकीं ४५ लक्ष पौंडांचा भारतमंत्र्यास हिंदुस्थानसरकारच्या परत हुंड्या वटविण्याच्या कामीं उपयोग करितां आला. याप्रमाणें आलेला प्रसंग कसा-तरी निभावला, पण ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, ६–७ वर्षांत जमविलेली शिल्लक एका वर्षाचे आपत्तीनेंच बहुतेक रिती झाली. दोन वर्षें सारखा दुष्काळ पडला असतां तर कर्ज काढूनच परत हुंड्या (रिव्हर्स कौन्सिल बिलें) वटविण्याचा प्रसंग आला असता.

'महायुद्ध कालीन परिस्थिति'

युद्धामुळें ह्या देशांतून बाहेर माल फार गेला, त्या मानानें आयात मात्र झाली नाहीं. सबब हिंदुस्थान धनकोच्या स्थितींत होतें. करितां या देशांत पुष्कळ सोनें यावयास पाहिजे होतें. पण त्यावेळीं सोन्याचे निर्गतीवर इंग्लंडमध्यें सरकारी निर्बंध असल्यामुळें बरेंच सोनें भारतमंत्र्याजवळच राहिलें. १९१४ ते १९१९ पर्यंतचे पांच सहा वर्षांत सुमारें २६ कोटि पौंड किंमतीचा माल परकीयांना आयात मालापेक्षां हिंदुस्थाननें अधिक दिला. तेव्हां हें उघडच आहे कीं, इतके पौंड हिंदुस्थानांत यावयास पाहिजे होते. सन १९१५ पासून सरकारी हुंड्या (कौन्सिल बिलें) ११ कोटि पौंडांच्या काढल्या, हुंड्यांचा ऐवज येथें रुपयांतच मिळतो. (याशिवाय दोन कोटि साठ लक्ष पौंड किंमतीचें सोनें व जवळजवळ एक कोटि पौंड किंमतीच्या

चांदीची खाजगी आयात झाली) यामुळें हिंदुस्थानांत सोनें यावें तितकें आलें नाहीं. चांदी महाग झाली.

१९१५ च्या ऑक्टोबरमध्यें चांदीचा दर औंसास २४ पेन्स भाव होता, तो १० मे १९१९ रोजीं ५८ पेन्सांचा झाला. आतां एक औंस चांदीस २४ पेन्स भाव असला म्हणजे एक रुपयांतील (१६५ ग्रेनांची) चांदीची किंमत जवळ जवळ ९ पेन्स असते; आणि ५८ पेन्साप्रमाणें भाव असतां सुमारें २१½ पेन्स होते. त्यावेळीं रुपयाचा हुंडणावळीचा दर १६ पेन्स होता. अर्थात् रुपयांतील चांदीची किंमत २१½ पेन्स तर रुपयाची किंमत १६ पेन्स अशी स्थिति झाली. रुपये पाडण्यांत सरकारचा आजपर्यंत नफा होत होता, तो न होता उलट तोटा होऊं लागला. एक रुपया पाडण्यास २२ पेन्स खर्च; पण तो पाडून त्याची किंमत १६ पेन्सच येणार, यामुळें सरकारनें हुंडणावळीचा दर म्हणजे रुपयाचा भाव २४ पेन्सपर्यंत वाढविला.

१८९३–९४ सालीं चांदीचा भाव फारच उतरला, म्हणून सरकारास अडचण झाली. पुढें १९१८ सालानंतर चांदीचा भाव कडकल्यामुळें विवंचना उत्पन्न झाली. १९१७ च्या ऑगस्टपर्यंत रुपये पाडण्यांत सरकारचें नुकसान नव्हतें. पण पुढें चांदीचा भाव भडकल्यामुळें सरकारास नुकसान लागूं लागलें. इकडे सोनें महाग झालें, म्हणून १ रुपयांस २ शिलिंग सोनें हा दर **बॅबिंग्टन कमिटीनें** कायम केला. चांदी उतरण्याचा संभव नाहीं, असें कामिटीला वाटलें. सोनें घेऊन लोकांना रुपये देण्यांत आपलें नुकसान होतें असें पाहतांच सरकारी हुंड्याचा हात भारतमंत्र्यानें आंखडून घेतला. पण पुढें कमिटीचें भविष्य लवकरच खोटें ठरलें. चांदी झपाट्यानें उतरूं लागली. रुपयास २ शिलिंग हा दर तर सरकारनें जगजाहीर केला व तो कायम ठेवण्याकारितां वाटेल तें करण्यास सरकार तयार झालें. रुपयाचा १५–१६ पेन्सापर्यंत गेलेला दर खेचून २४ पेन्सावर आणण्याची खटपट करण्याचा सरकारचा निश्चय झाला. रुपया स्वस्त झाला व सोनें महाग झालें. म्हणून रुपयाचा भाव २४ पेन्सावर राहिना. तेव्हां रुपये महाग करावेत आणि सोनें स्वस्त करावें हा मार्ग त्यांनीं काढला. रुपये महाग

करावयाचे म्हणजे लोकांजवळचे रुपये कमी करावयाचे. हे रुपये कमी करण्याचा उपाय म्हणजे " रिव्हर्स कौन्सिल बिलें "—परत हुंडया—काढणें हा होय. अशा हुंड्यामुळें लोक हिंदुस्थान सरकारास रुपये देतात व हुंडी विकत घेतात; आणि ती हुंडी भारतमंत्र्यावर लागू करून त्याच्याकडून १ रुपयास २ शिलिंगप्रमाणें सोनें घेतात, अशा रीतीनें देशांतील खेळते रुपये कमी होतात.

ह्याशिवाय आपल्या शिलकेंतील सोनेंही हिंदुस्थानसरकारनें विक्रीस काढलें. हेतू हा कीं सोनें स्वस्त व्हावें व रुपये दुर्मिळ व्हावेत. करन्सी कमिटीनें " परत हुंडया " काढण्याची सूचना केली होती तिचा सरकारनें ताबडतोब फायदा करून घेतला.

आतां यामध्यें नुकसान काय झालें तें बघूं १५ रुपयास १ पौंड दरानें आजपर्यंत जें सोनें सांचविलें तें सर्व १० रुपयास १ पौंड या दरानें देऊन टाकलें. अशा रीतीनें दर पौंडाच्या मागें ५ रुपये नुकसान झालें. दर आठवड्यास २० लाख पौंड याप्रमाणें कित्येक महिनेपर्यंत परत हुंड्या विकून सरकारनें सर्व सोन्याची विल्हेवाट लावली. बरें यामुळें फायदा तरी कोणाचा झाला ? तर विलायती व्यापाऱ्यांचा. कारण हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना पाहिजे होत्या, त्यापेक्षां कितीतरी अधिक परत हुंडया सरकारनें काढल्या. मग ह्या परत हुंड्या कोण घेणार ? व त्यापासून फायदा कोणाचा होणार ? तर इंग्लिश व्यापाऱ्यांचा व येथें असणाऱ्या इंग्लिश लोकांचा. बाजारांत १ रुपयास १५ पेन्स मिळतात, पण सरकार २४ पेन्स देतें. इंग्लिश लोकांची घरेंदारें विलायतेंत, तेथें त्यांना सोनें पाहिजेच; तेव्हां ही आलेली संधि कोणीही फुकट जाऊं देणार नाहीं. येथें पसरलेले रुपये सर्व गोळा करून त्यांनीं थोडक्या पैशांत सोन्याचा संचय विलायतेंत केला. शिवाय बाजारभाव व सरकारी भाव यांत इतकी तफावत पडल्यावर सट्टेबाजी करण्यासही पुष्कळांस संधि मिळाली. हलक्या दरानें सरकारकडून सोनें विकत घेऊन ते बाजारांत अधिक दरानें विकण्यास मुळींच हरकत नव्हती, व त्याप्रमाणें लोकांनीं केलेंही. विलायतेंतील लोकांस १६ रुपयास १ तोळा सोनें मिळालें आणि हिंदुस्थानांत तोळयास २२ रुपये देण्यास लोक तयार असून त्यांस तें

मिळेना असा प्रकार घडला. वरील प्रकारच्या परत हुंडयामुळें ३५ कोटि रुपये हिंदुस्थानचे गेले. या वरील विवेचनावरून संकटाचा उद्भव सरकारी हुंडयांत, आहे असें दिसून येईल.

असें न होण्यास उपायः—स्टेट सेक्रेटरीनें आपल्या गरजेपेक्षां जास्त रकमेच्या हुंडया सहसा काढूं नयेत. विलायतेंत सोनें न ठेवतां सोन्याचा हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग खुला करावा. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरूं करावें. चांदीचा भाव कमजास्त होतो तसा सोन्याचा होत नाहीं. सोन्यारुप्याचा भाव ठरविण्याचा प्रयत्न करूं नये. विलायतचा खर्च शक्य तितका कमी करावा. १० रुपयास १ सॉव्हरिन हा भाव ३५ कोटि रुपयांचें नुकसान सोसूनही टिकला नाहीं. ह्यावरून कृत्रिम रीतीनें रुपयाचा भाव वाढवून हिंदुस्थानचें हित साधणार नाहीं, म्हणून तसें करूं नये; असा येथील तज्ञांचा सरकारास सल्ला असतो. परंतु तिकडे सरकार लक्ष देत नाहीं; व १९२७ सालीं असाच कृत्रिम रीतीनें रुपयांचा भाव १८ पेन्स टिकविण्याचा प्रयत्न करून हिंदुस्थानचें कसें नुकसान झालें, हें हुंडणावळविषयक बाद्याचे रहस्याचा विचार करतांना आपणांस दिसून येईल.

प्रकरण चवथें

कागदी चलननिधी व सुवर्णपरिमाण निधीचीं पत्रकें व त्यावरून निघणारीं कांहीं अनुमानें

कागदी चलननिधी पत्रक (आंकडे लक्ष रुपयांत दिले आहेत.)

महिना	एकूण खेळतें कागदी चलन	सोनें			चांदी		रोखे		हिंदुस्थानांतील बिल्स ऑफ एक्सचेंज	निधींतील सोन्याचे खेळत्या नोटांशीं प्रमाण
		हिंदुस्थानांत	हिंदुस्थानाबाहेर	एकूण बेरीज	रुपयाचे नाणें	धातु	हिंदु.स.नें का. कर्जरोखे	स्टर्लिंग रोखे		
मार्च १९१४	६६१२	२२४४	९१५	३१५९	२०५९	...	१०००	४००	...	४७·८
जानेवा. १९२०	१८५१५	३५१०	११६२	४६७२	२८३८	११९५	१५६०	८२५०	...	२५·२
डिसेंबर १९२१	१७२५३	२४३२	...	२४३२	६९७६	४२१	६८४०	५८५	...	१४·१
मार्च १९२६	१९३३४	२२३२	...	२२३२	७७२५	७६६	५७११	२९००	...	११·५४
सप्टेंबर १९३१	१४८७४	४२१	...	४२१	१२६८१	५७३	९४९	...	२५०	२·८८

मध्यवर्ती बँकेचें कागदी चलनानिधीविषयक पत्रक

(आंकडे हजारांत दिले आहेत)

महिना	एकूण खेळतें कागदी चलन	सोनें			चांदी		रोखे		हिंदुस्थानांतील बिल्स ऑफ एक्सचेंज	निधींतील सोन्याचे खेळत्या नोटांशीं प्रमाण
		हिंदुस्थानांत	हिंदुस्थानाबाहेर	एकूण बेरीज	रुपयाचें नाणें	धातू	हिंदु. स. नें का. कर्जरोखे	स्टार्लिंग रोखे		
७ जानेवारी १९३८	सदर बँकेचे खा. शि. २६९४९० खेळत्या नोटा १८०९५८४ ब्रह्मदे. ५०३३६ एकूण २१२९४१०	४१५४५३	२६९८	४४४१५१	६२३०९४	...	२७४०९५	७८८०७०	....	२०·८६

एप्रिल १९३५ चे अगोदर हिंदुस्थान सरकारचें चलनखातें व तदनंतर मध्यवर्ती बँक कागदी—चलन निधीविषयक वरीलप्रमाणें दर आठवड्यास पत्रक काढीत असतें.

सुवर्ण परिमाण निधी

(आंकडे पौंडाचे आहेत.)

विगत	१९२८–२९	१९२९–३०	१९३०–३१	१९३१–३२	१९३२–३३
१ बँक ऑफ इंग्लंडकडे रोकड	३०४२	३७४८	१०८५	२९	८९७
२ ब्रिटिश व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहत सरकारांचे रोख	३७८४४६२४	३७८४३९१८	३१५९९३८१	१०६९४६३७	२६२२०७६९
३ सोनें (इंग्लंडमध्यें)	२१५२३३४	२१५२३३४	२१५२३३४	२१५२३३४	२१५२३३४
४ सोनें (हिंदुस्थानांत)	... ...	... ...	६२४७२००	२७१५३०००	११६२६०००
एकूण	४०,०००,०००	४०,०००,०००	४०,०००,०००	४०,०००,०००	४०,०००,०००

कागदी चलननिधी व सुवर्णपरिमाणनिधी पत्रकांवरून निघणारीं अनुमानें.

सुवर्णसंचयांत वाढ

कागदी चलननिधीमध्यें १९१४ मार्च अखेर, इंग्लंडमध्यें रोख सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून १३ कोटि १५ लक्ष रुपयांचे व हिंदुस्थानांत २२ कोटि ४४ लक्ष रुपयांचें सोनें होतें, तें १९२० जानेवारीमध्यें इंग्लंडमध्यें ९४ कोटि १२ लक्ष व हिंदुस्थानांत ३५ कोटि १० लक्ष रुपयांचें इतकें वाढलें, हें आपणांस कागदी चलननिधीचें पत्रक मागें दिलें आहे, त्यावरून दिसून येईल. या सहा वर्षांत इंग्लंडमध्यें सुमारें ७५ कोटि रुपयांनीं व हिंदुस्थानांत सुमारें १२॥ कोटि रुपयांनीं सोन्याची वाढ झाली ती कां झाली हें आतां आपण पाहूं.

महायुद्धामुळें ह्या देशांतून बाहेर माल फार गेला, त्या मानानें आयात मात्र झाली नाहीं. सबब हिंदुस्थान धनकोच्या स्थितींत होतें, म्हणून या देशांत पुष्कळ सोनें यावयास पाहिजे होतें. पण त्यावेळीं सोन्याच्या निर्गती-वर इंग्लंडमध्यें सरकारी निर्बंध असल्यामुळें, बरेंच सोनें स्टेट सेक्रेटरीजवळ इंग्लंडमध्यें राहिलें. तेथील ऋणको व्यापाऱ्यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे सोनें दिलें व हिंदुस्थान सरकारवर रुपयाच्या हुंड्या घेतल्या व त्या हिंदुस्थानांतील धनको व्यापाऱ्यांकडे पाठवून देऊन आपलें देणें वारलें. येथील व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे त्या वटविण्याकरितां पाठविल्या, व सरकारनीं जास्त कागदी चलन व रुपये काढून सदर हुंड्या वटविल्या. स्टेट सेक्रेटरीजवळ सांच-लेल्या सोन्याचे व स्टर्लिंग रोख्याचे आधारावर हिंदुस्थान सरकारनें हें वाढतें चलन प्रसृत केलें.

हिंदुस्थानसरकारास प्रतिवर्षीं देणें असलेली होमचार्जेसबद्दलची रक्कम वजा जातां वरीलप्रमाणें ६ वर्षांत सुमारें ७५ कोटि रुपयाचे सुवर्णाची, सदर निधीच्या इंग्लंडमधील विभागांत भर पडली.

सुवर्णसंचयांत घट

परंतु आपणांस वरील पत्रकांतील डिसेंबर १९२१ मधील दिलेल्या आंकड्यावरून असें दिसून येतें कीं, १९२० जानेवारींत जेथें इंग्लंडमध्यें ९४ कोटि १२ लक्ष रुपयांचे रोख सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून होतें, तेथें आतां फक्त ५ कोटि ८५ लक्ष रुपये किंमतीचे स्टर्लिंग रोखेच शिल्लक आहेत. तेव्हां ८८ कोटि २७ लक्ष रुपयाचें सोनें व स्टर्लिंग रोखे गेले कोठें ? तसेंच हिंदुस्थानांतील सोन्याचा सांठाही सुमारें ११ कोटि रुपयांनीं घटलेला दिसतो याचें कारण काय ?

पहिला प्रयोग–१९२०–२१सालांत रुपयाचा भाव२४ पेन्सावर कायद्यानें कायम करण्यांत आला, परंतु चांदीचा भाव घसरूं लागल्यामुळें रुपयाचा भावही घसरूं लागला व तो १५–१६ पेन्सापर्यंत खालीं गेलेला भाव २४ पेन्सावर टिकविण्याचा सरकारनीं जो अट्टाहास केला त्यांत 'रिव्हर्स कौन्सिल बिल्स' (परत हुंड्या) काढून हा सुवर्णाचा संचय फस्त केला गेला, व यांत हिंदुस्थानचें सुमारें ३५ कोटि रुपयांचें नुकसान झालें; फायदा सरकारचे भाईबंदांचा झाला, व शेवटीं रुपयाचा भाव २४ पेन्सावर टिकविण्याचा प्रयत्न पांचसहा महिन्यांतच हताश होऊन सरकारास सोडून द्यावा लागला हें आपण मागें पाहिलेंच आहे.

दुसरा प्रयोगः—वरीलप्रमाणें रुपयाचा भाव २४ पेन्सावर टिकविण्याचा प्रयत्न करण्यांत आलेल्या अपयशावरून सरकारनें धडा न घेतां पुन्हां १९२६–२७ सालीं रुपयाचा भाव १८ पेन्स कायद्यानें कायम करण्यांत आला, व त्याचा परिणाम कसा अनिष्ट झाला हें वरील पत्रकांतील मार्च १९२६ व सप्टेंबर १९३१ (२१-९-१९३१ रोजीं इंग्लंडनें आपल्या चलनाचा सोन्याशीं असलेला संबंध सोडला व रुपयाचाही सोन्याशीं असलेला संबंध सोडून त्याचें नातें कागदी पौंडाशीं जोडण्यांत आलें, त्यावेळीं) या महिन्यांतील कागदी चलननिधींतील आंकडे व सुवर्णपरिमाण निधितील आंकडे पाहिले असतां दिसून येईल.

मार्च १९२६ मध्यें कागदी चलननिधीमध्यें २९ कोटि रुपयाचे स्टर्लिंग

रोखे होते व हिंदुस्थानांत २२ कोटि ३२ लक्ष रुपये किंमतीचें सोनें होतें. तें १९३१ सप्टेंबरमध्यें, इंग्लंडमधील २९ कोटि रुपयांच्या स्टर्लिंग रोख्यांचा तर अजिबात पत्ताच नाहीं, आणि हिंदुस्थानांतही फक्त ४ कोटि २१ लक्ष रुपयांचेच सोनें शिल्लक दिसतें ! जानेवारी १९२६ मध्यें इंग्लंड व हिंदुस्थानांत स्टर्लिंग रोखे व सोनें मिळून जेथें ५१ कोटि ३२ लक्ष रुपये होते, तेथें सप्टेंबर १९३१ मध्यें फक्त ४ कोटि २१ लक्ष रुपयांचेच काय तें सोनें शिल्लक राहिलें ! बाकीचे ४७ कोटि ११ लक्ष रुपयांचें सोनें खलास झालें.

कागदी चलननिधींतील या ४७ कोटि ११ लक्ष रुपयांच्याच घटीवर हें प्रकरण थांबत नसून त्यांत सुमारें ३६-३७ कोटि रुपयांची सुवर्ण परिमाण-निधींतील इंग्लंडमधील शिलकेंतील घटीची भर घालावी लागते; व असे एकूण ८३ कोटि ४८ लक्ष रुपयांचा या पांचसहा वर्षांत चुराडा झाला आणि त्यांत हिंदुस्थानचें सुमारें ६७ कोटि रुपयांचें (रुपयाचा घसरता भाव १८ पेन्सावर टिकविण्याकरितां केलेल्या अट्टाहासांत) परतीच्या हुंड्या काढाव्या लागल्या त्यांत नुकसान झालें.

सुवर्ण परिमाणनिधी

वर सांगितल्याप्रमाणें परिमाणनिधींतील शिलकेंत ३६-३७ कोटि रुप-यांची घट कशी आली हें आपण मागें दिलेल्या सदर निधीचें पत्रकावरून पाहूं. सन १९२८-२९ सालीं इंग्लंडमध्यें सदर निधींत, इंग्लंड व साम्रा-ज्यांतर्गत वसाहती, यांचे सरकारी स्टर्लिंग रोखे ३ कोटि ७८ लक्ष ४४ हजार सहाशें चोवीस पौंडांचे होते. त्याचें ऐवजीं १९३१-३२ सालांत (२१-९-१९३१) रोजीं इंग्लंडनें आपल्या नाण्याचा सोन्याशीं असलेला संबंध सोडला व रुपया स्टर्लिंगशी जोडण्यांत आला त्यावेळीं) १ कोट ६ लक्ष ९४ हजार सहाशें सदतीस पौंडांचे रोखे शिल्लक होते. म्हणजे २ कोटि ७१ लक्ष ४० हजार दोनशें एक्याऐंशीं पौंडाचे रोखे होमचार्जेसचे खर्चाकरितां व परत हुंड्या वटविण्याकरितां कागदी चलननिधींतील रोख्यांचे जोडीला विकले गेले. (१८ पेन्सास १ रुपया या दरानें, सुवर्ण

परिमाण निधींतील विकलेल्या स्टर्लिंग रोख्यांची किंमत ३६ कोटि १९ लक्ष ८७ हजार ८० रुपये होतात.) या शिवाय १९२९-३० साली बँक ऑफ इंग्लंडकडे या निधींत ३७४८ पौंड रोकड शिल्लक होते ते १९३१-३२ साली फक्त २९ पौंड शिल्लक राहिले म्हणजे यांतही सुमारें ५०००० रुपये कमी झाले.

सदर पत्रकांत १९३१–३२ सालांत २ कोटि ७१ लक्ष ५३ हजार पौंड किंमतीचें सोनें हिंदुस्थानांत शिल्लक असल्याचें दाखविलें आहे. तें सोनें १९३१ सप्टेंबर नंतर ज्यावेळीं येथून सोनें परदेशीं सपाटून जाऊं लागलें त्यावेळीं हिंदुस्थान सरकारनें येथें विकत घेऊन ठेवलें. १९३१ सप्टेंबरचे अगोदर सदर निधींतील स्टर्लिंग रोखे वर सांगितल्याप्रमाणें विकावे लागले होते.

हिंदुस्थानांतील खेळत्या चलनाचें प्रसरण व आकुंचन.

आतां आपण खेळत्या चलनाचें प्रसरण व आकुंचन याविषयीं थोडा विचार पुढील प्रकरणांत करूं:—

प्रकरण पांचवें

हिंदुस्थानांतील खेळत्या चलनाचें प्रसरण व अकुंचनः—

इ. स. १९१४ ते १९२० चे दरम्यान महायुद्धामुळें या देशांतून परदेशी बराच माल गेला, व त्या प्रमाणांत आयात मात्र झाली नाहीं. म्हणून हिंदुस्थान धनकोच्या स्थितींत होतें, हें आपण मागें पाहिलेंच आहे.

त्या मालाची किंमत स्टेट–सेक्रेटरीनें तेथील व्यापाऱ्यांकडून सोन्याचें रूपांत घेऊन हिंदुस्थान सरकारवर रुपयांच्या हुंड्या काढल्या, त्या हुंड्या येथील व्यापाऱ्यांकडून हिंदुस्थान सरकारकडे वटविण्यास आल्या, त्या वटविण्याकरितां सरकारास नवीन नोटा व रुपये काढावे लागले. मार्च १९१४ मध्यें ६६ कोटि १२ लक्ष रुपयांच्या नोटा प्रचलित होत्या, तेथें १९२० जानेवारीस १८५ कोटि १५ लक्ष रुपयांच्या नोटा प्रचलित असल्याचें कागदी चलननिधिचें मागें दिलेल्या पत्रकावरून दिसून येतें. म्हणजे या ६ वर्षांत सुमारें ११९ कोटि रुपयांचे अधिक चलन खेळतें राहिलें.

उलटपक्षीं १९२१–२२ सालांत २४ पेन्सावर रुपयाचा भाव टिकविणें करितां रिव्हर्स कौन्सिल बिलें हिंदुस्थान सरकारास स्टेट–सेक्रेटरीवर काढावीं लागल्यामुळें, सोन्याचा संचय कमी झाला. त्याकरितां खेळतें चलन सुमारें ५४ कोटि रुपयाचें कमी करण्यांत आलें, त्यापैकीं सुमारें १३ कोटि रुपयांचे कागदी चलन कमी केलें व खेळत्या चलनी नोटास तारण म्हणून १९२० जानेवारींत २८ कोटि ३८ लक्ष रुपये होते, तेथें ६९ कोटि ७६ लक्ष रुपये डिसेंबर १९२१ मध्यें असल्याचें आपणांस मागील कागदी चलन निधीचें पत्रकावरून दिसून येतें. म्हणजे सुमारें ४१ कोटि रुपयांचे खेळते रुपयांचें नाणें कमी करून ते या निधींत सांठविण्यांत आलें.

तसेंच १८ पेन्साचा रुपयाचा कायदेशीर भाव, खालीं जात असतांही हाच भाव :राखण्याचा अट्टाहास करण्यांत जानेवारी १९२६ ते सप्टेंबर १९३१ पर्यंत निर्गत व्यापार मंदावल्यामुळें खेळतें चलन सुमारें ९४ कोटि

१६ लक्ष रुपयांनीं कमी करण्यांत आलें. त्यापैकीं ४४ कोटि ६० लक्ष रुपयांच्या चलनी नोटा कमी करण्यांत आल्या व कागदी चलन निधींत तारण म्हणून जानेवारी १९२६ मध्यें ७७ कोटि २५ लक्ष रुपयाचें नाणें होतें त्याचे ऐवजीं सप्टेंबर १९३१ मध्यें १२६ कोटि ८१ लक्ष रुपये झाले, म्हणजे सुमारें ४९ कोटि ५६ लक्ष रुपयाचें खेळतें नाणें कमी करून सदर निधींत साठविण्यांत आलें. या शिवाय तीन महिन्याच्या मुदतीचीं ट्रेझरी बिलें दर आठवड्यास आपले चालू खर्चाकरितां सरकार काढीत असतें; तीं जरूरीपेक्षां अधिक काढूनही तात्पुरतें खेळतें चलन कमी करण्याचा एक मार्ग असतो. त्याही मार्गानें सुमारें ६४ कोटि रुपयाचें चलन प्रचारांतून कमी करण्यांत आलें होतें. या सर्व प्रकारांनीं मिळून सुमारें १५८ कोटि रुपये खेळत्या चलनांतून कमी करण्यांत आले होतें.

७ जानेवारी १९३८ चें पत्रक.

कागदी चलन निधीविषयक ७ जानेवारी १९३८ रोजीं रिझर्व बँकेनें काढलेल्या पत्रकावरून हल्लीं एकूण २१२ कोटि ९४ लक्ष १० हजार रुपयांच्या कागदी नोटा काढलेल्या आहेत असें दिसतें; पैकीं २६ कोटि ९४ लक्ष ९० हजार रुपयांच्या चलनी नोटा बँकेच्या तिजोरींत असून, १८० कोटि ९५ लक्ष ८४ हजार रुपयांच्या चलनी नोटा हिंदुस्थानांत व ५ कोटि ३ लक्ष ३६ हजार रुपयांच्या चलनी नोटा ब्रम्हदेशांत खेळत्या आहेत.

या चलनी नोटांस तारण ४१ कोटि ५४ लक्ष ५३ हजार रुपयांचें सोनें हिंदुस्थानांत व २ कोटि ८६ लक्ष ९८ हजार रुपयांचें सोनें इंग्लंडमध्यें आहे. याशिवाय ६२ कोटि ३० लक्ष ९४ हजार रुपयांचे नाणें बँकेच्या तिजोरींत आहे. तसेंच हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या कर्जरोख्यांपैकीं २७ कोटि ४० लक्ष ९५ हजार रुपयांचे कर्जरोखे हिंदुस्थानांत व ७८ कोटि ८० लक्ष ७० हजार रुपये किंमतीचे स्टर्लिंग रोखे इंग्लंडमध्यें आहेत.

या पत्रकावरून कागदी चलन निधींतील सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून सुमारें ८१ कोटि रुपये इंग्लंडमध्यें आहेत, व सुवर्ण परिमाण निधीचें

अगदी अलीकडील पत्रक हातांशीं नसलें तरी सुमारें ३० ते ४० कोटि रुपयांचे आसपास स्टर्लिंग राखे व सोनें मिळून इंग्लंडमध्यें आहेत असें समजण्यास हरकत नाहीं. म्हणजे एकूण सुमारें ११० ते १२० कोटि रुपये हिंदी प्रजेचें कर रूपानें भरलेले इंग्लंडांत आहेत.

हिंदी अर्थशास्त्रज्ञानीं व व्यापारी संस्थानीं रिझर्व बँकेच्या स्थापनेच्या वेळीं (१९३४–३५) जी चळवळ केली तिचा एवढाच इष्ट परिणाम झाला कीं या दोन निधीमधील सोनें शक्य तोंवर हिंदुस्थानांतच ठेवण्याचें धोरण सरकारास स्वीकारावें लागलें.

प्रकरण सहावें

हुंडणावळीचे दराविषयक वादाचें रहस्य.

हुंडणावळीचा रुपयाचा भाव १६ पेन्स असावा कां १८ पेन्स असावा हा वाद १९२६–२७ सालीं योग्य होता, नंतर १९३१ सालीं इंग्लंडनें आपल्या चलनाचा सुवर्णाशीं असलेला संबंध सोडला व रुपयाचा १८ पेन्साचा भाव स्टर्लिंगशीं निगडीत केला त्यावेळीं फार तर १६ पेन्स कां १८ पेन्स रुपयाचा भाव असावा या वादांत कांहीं तथ्य होतें, आतां त्या गोष्टीला ६ वर्षें होऊन गेलीं, १८ पेन्सच्या भावांतील अनिष्टपणा निघून जाऊन तो भाव हिंदुस्थानच्या अंगवळणी पडला आहे. अशावेळीं या वादाचा विचार करणें म्हणजे केवळ कालाचा दुरुपयोग करण्यासारखें आहे असें कांहीं लोकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु ७–१–३८ च्या केसरीच्या अग्रलेखांतील खालील उतारा अवलोकन केला असतां सध्यांहि या वादांतील रहस्य जनतेच्या दृष्टिसमोर असणें किती अवश्यक आहे, हें समजून येईल.

" निजामशहाचे राजधानींत भागानगरांत (दक्षिण हैद्राबाद) गेल्या आठवड्यांत भरलेल्या हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या एकविसाव्या वार्षिक अधिवेशनांत मद्रास विश्वविद्यालयांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. पी. जे. थॉमस यांनीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत या प्रश्नाची (हिंदुस्थानांतील विचारवंतापुढें जर आज कोणता महत्वाचा प्रश्न असेल तर तो बहुसंख्य लोकांच्या भाकरीचा होय.) विशेष चिकित्सा केली आहे. डॉ. थॉमस यांच्या भाषणांतील कांहीं मुद्दे स्वीकार्य असून कांहीं अपसिद्धांतांवर आधारलेले आहेत.

" १९३० सालापासून पाश्चिमात्य देशांत आर्थिक मंदीला प्रारंभ झाला व देशांतील बाजारभाव उतरूं लागून लोकांची क्रयशक्ति कमी झाली. दळणवळणाच्या सुलभ साधनांनीं सांप्रत सर्व जग निगडीत झाल्या-

मुळें निरनिराळ्या देशांतील व्यापारी देवघेव इतकी वाढली आहे, कीं, कोण-त्याहि देशाला इतरांपासून अलिप्त राहतां येत नाहीं. हिंदुस्थानच्या कच्च्या मालाचीं प्रमुख गिऱ्हाइकें पाश्चिमात्य राष्ट्रांत असल्यामुळें त्या राष्ट्रांत प्रारंभ झालेल्या आर्थिक मंदीची छाया हिंदुस्थानवर पडण्यास मुळींच विलंब लागला नाहीं. उद्योगधंद्यांत पुढारलेलीं पाश्चिमात्य राष्ट्रें हीं मुळांत हिंदु-स्थानपेक्षां अनेकपट अधिक संपन्न असल्यामुळें त्यांतील सर्व साधारण रहि-वाशाला या आर्थिक मंदीचा जेवढा फटका बसला त्यापेक्षां अर्ध पोटीव अर्ध नग्न परिस्थितींत राहणाऱ्या कोट्यावधि हिंदी लोकांना तो आधीं बसला. आतां पाश्चिमात्य राष्ट्रांतील व्यापारमंदी नाहींशी होऊन तेजीला प्रारंभ झाला असूनही हिंदुस्थान अजून मंदीच्या मगरामिठीतून पडावा तसा बाहेर पडला नाहीं; यामुळें सद्यःस्थितींत तरी हिंदुस्थानच्या आर्थिक दैन्याचा दोन दृष्टींनीं विचार करणें क्रमप्राप्त ठरलें आहे.

" आजच्या बहुसंख्य हिंदी लोकांच्या निकृष्ट आर्थिक परिस्थितीचें आंशिक उत्तरदायित्व आर्थिक मंदीला आहे व तेवढ्या पुरता त्याचा स्वतंत्र विचार केला पाहिजे. आर्थिक दृष्टया पुढारलेल्या पाश्चिमात्य व पौर्वात्य राष्ट्रांनीं आपल्या देशांतील बाजारभाव चढवून त्यांना तेजी आणण्याकरितां आपल्या नाण्यांच्या किंमती एका पाठीमागून एक झपाट्यानें उतरविल्या. ब्रिटिश पौंड स्टर्लिंग बरोबर हिंदुस्थानच्या रुपयाचें नशीब निगडित केल्या-मुळें (सप्टेंबर १९३१ मध्यें) स्टर्लिंगची सुवर्ण किंमत जितकी घसरली तितकी ती रुपयाचीहि घसरली; परंतु १९२७ सालीं सरकारनें कायद्यानें ठरविलेला रुपयाचा १८ पेनी भाव हाच हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थि-तीच्या दृष्टीनें भारी असल्यानें त्याचें जें दडपण हिंदुस्थानावर होतें तें कायमच राहिलें. त्या दडपणांतून रुपयाला मोकळा करा व त्याचा भाव उतरवा अशी मागणी हिंदुस्थानांतील हिंदी व्यापारी संस्था व बरेचसे अर्थ-शास्त्रज्ञ यांनीं केली. तिला डॉ. थॉमस यांचा विरोध होता व भागानगरच्या परिषदेंत त्यांनीं तो व्यक्त केला.

" नाण्याची किंमत प्रमाणबद्ध उतरविली तर त्याचा परिणाम बाजार-भाव वाढण्यांत होतो हा अर्थशास्त्राचा अगदीं साधा सिद्धांत आहे. ग्रेट-

ब्रिटन, युनायटेडस्टेटस्, जपान, फ्रान्स यासारख्या राष्ट्रांनीं याच मार्गाचा अवलंब केला. आर्थिक विचार व आचार यांच्या बाबतींत पुढारलेल्या राष्ट्रानें अवलंबिलेल्या या मार्गाचें हिंदुस्थान सरकारनें अनुकरण करावें अशी हिंदी व्यापारी संस्थांची मागणी होती व आजहि तीच आहे. १९३१ सालीं ग्रेटब्रिटननें स्टार्लिंगची किंमत उतरविल्यापासून आजतागायत तेथील बाजारभावांत जी सुधारणा झाली, तशी ती जोंपर्यंत येथील बाजारभावाची झाली नाहीं, तोंपर्यंत हिंदी राष्ट्राची मागणी रुपयाची किंमत १८ पेनी स्टर्लिंग ठेऊं नका, ती बाजारभाव सुधारण्याकरितां जितकी उतरावयास पाहिजे तेवढी उतरवा, अशीच राहणार. आर्थिक परिषदेच्या अनुषंगानें झालेल्या व्याख्यानांत पुण्याचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. काळे यांनीं हीच गोष्ट जाहीर रीतीनें सांगितली."

यावरून हिंदी चलनपद्धतीचा इतिहास, हुंडणावळीचे दराच्या बाबतच्या वादाचें रहस्य काय आहे हें पाहिल्याशिवाय पुरा होऊं शकत नाहीं, म्हणून आपण आतां त्या बाबतीचा थोडा विचार करूं—

आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत चालण्यास राष्ट्राराष्ट्रामध्यें, परस्पर विश्वास असावा लागतो. तो महायुद्धानंतर राहिला नाहीं, व महायुद्धानंतरचे कालांत तत्पूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापाराची सुरळीत बसलेली घडी विस्कटली.

प्रत्येक राष्ट्र, पुन्हां असें एखादें जागतिक युद्ध सुरूं झाल्यास अन्नवस्त्रादि आवश्यक जिनसांच्या पुरवठ्याकरितां दुसऱ्या राष्ट्रावर आपणास अवलंबून राहण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून सदर जिनसांचें आपापल्या राष्ट्रांत शक्य तितक्या जास्त प्रमाणावर उत्पादन करण्याचा प्रयत्न करूं लागलें, व या कामीं निरनिराळ्या राष्ट्रांतील शास्त्रज्ञ निरनिराळे शोध लावण्यांत गुंतले व याचा परिणाम असा झाला कीं, प्रत्येक राष्ट्रांत उत्पादन कल्पनेबाहेर वाढलें.

रशियामध्यें राज्यक्रांती होऊन समाज–सत्तावाद प्रस्थापित झाला व तेथेंही गहूं वगैरे धान्याचें उत्पादन फारच वाढलें. भांडवल राष्ट्रीय मालकीचें झाल्यामुळें, व भांडवलावर व्याज सुटणेचा प्रश्न नसल्यामुळें,तेथील माल जगाचे बाजारांत फारच स्वस्त मिळूं लागला. युरोपियन राष्ट्रें महायुद्धांत गुंतलीं त्यावेळीं अमेरिकेंत युरोपियन राष्ट्रांना पुरविण्याकरितां फारच मोठ्या

प्रमाणावर धान्य कापूस वगैरेचे उत्पादन वाढलें, व कापडाच्या गिरण्या, मोटारी व इतर यंत्रसामुग्री यांच्या कारखान्यांचीही वाढ झपाट्यानें झाली.

जपाननें युरोपांतील महायुद्धांत पश्चिमात्य राष्ट्रें गुंतलीं याचा फायदा घेऊन आपले देशांत उद्योगधंद्याची चांगलीच वाढ करून इंग्लंडचा पूर्वेकडील कापडाचा व्यापार बराच काबीज केला.

जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांना फ्रान्सला युद्धविषयक खंडणी दर वर्षी बरीच द्यावी लागत होती. व युरोपमधील बहुतेक राष्ट्रांनीं इंग्लंड व अमेरिका या दोन राष्ट्रांकडून कर्जें घेतलीं होतीं. तसेंच इंग्लंडनेंही अमेरिकेकडून कर्ज काढलें होतें. त्या कर्जांचे हप्ते व व्याज दरवर्षी त्यांना बरेंच द्यावें लागत होतें. कांहीं राष्ट्रांस अजूनहि द्यावें लागत आहे. अर्थात ऋणको राष्ट्रें हीं देणीं आपले देशांत उत्पन्न झालेला माल धनको राष्ट्रास देऊनच भागविणार हें उघड आहे. परंतु ऋणको देशांचा माल आपले देशांत आल्यास आपले देशांतील मालास भाव यावयास पाहिजे तितका न आल्यामुळें आपले देशांतील शेतकरी व कारखानदार बुडतील म्हणून धनको राष्ट्रें संरक्षक जकातीचे तट उभारून परदेशी मालास मज्जाव व्हावा अशी योजना करूं लागले, व ऋणको राष्ट्रांनीं आपलें देणें सोन्याच्या रूपांतच दिलें पाहिजे असा हेका धरूं लागले; व या रीतीनें देशांत आलेलें सोनें आपापल्या मध्यवर्ती बँकांच्या तिजोऱ्यांत अडकवून ठेऊं लागले.

याचा परिणाम असा झाला कीं,जागतिक व्यापारी उलाढालींना आवश्यक तितकें सोनें व्यवहारांत खेळेनासें झालें व सर्वत्र बाजारभाव घटून जगभर मंदीची लाट फैलावली. यास तोड म्हणून हिंदुस्थानखेरीज जगांतील बाकीच्या राष्ट्रांनीं आपापल्या चलनांच्या किंमती महायुद्धपूर्वकालीन चलनांच्या किंमतीच्या मानानें उतरविल्या. याचा हेतू हा कीं, इतर देशांच्या मालाच्या स्पर्धेचा आपणांस आपले देशांत झळ पोहोंचूं नये. उतरती हुंडणावळ आयात मालास अटकाविणारी असते, व निर्गत मालास सहाय्यक असतें हें आपण मागें पाहिलेंच आहे.

याच्या उलट हिंदुस्थानच्या चलनाची किंमत महायुद्धकालपूर्व किंमती-

पेक्षां अधिक; असा जगावेगळा प्रकार येथें कां असावा याचा विचार करितां असें दिसून येतें, कीं हिंदुस्थान देश हा परतंत्र असल्यामुळें येथील चलनविषयक धोरण या देशाच्या हिताच्या दृष्टीनें ठरविण्यांत येत नसून राज्यकर्त्यांच्या भाईबंदांच्या हिताच्या दृष्टीनें ठरविण्यांत येत असतें. ही गोष्ट आपले ध्यानांत आली म्हणजे, ब्रिटिश अमदानींतील हिंदी चलन पद्धतीचें कोडें सुलभ रीतीनें उलगडलें जातें.

१९१४ सालीं प्रचारांत असलेला रुपयाचा १६ पेन्साचा दर १९२० सालीं २४ पेन्सावर कायद्यानें कायम करून हिंदुस्थानचा ३५ कोटि रुपयांचे नुकसान करूनही २४ पेन्साचा भाव न टिकवतां आल्यामुळें हताश होऊन सरकारनें हा प्रयत्न सोडून दिला. तरी पुन्हां १९२६–२७ सालांत कायद्यानें रुपयाचा भाव १८ पेन्साचा ठरविण्यांत आला हा १८ पेन्साचा कृत्रिम दर टिकविण्याकरितां जागतिक मंदीमुळें हिंदुस्थान सरकारास १९२७ मार्च ते १९३१ सप्टेंबरपर्यंतचे कालांत, १५८ कोटि रुपयांचे खेळतें चलन प्रचारांतून कमी करावें लागलें, या अवधींत इंग्लंडमध्यें १०३ कोटि रुपयांची व हिंदुस्थानांत ५० कोटि रुपयांची अशी एकूण १५३ कोटि रु.ची कर्जें काढावीं लागलीं. इम्पीरियल बँकेचा व्याजाचा दर शेंकडा ८ पर्यंत वाढवावा लागला. तीन महिन्याच्या मुदतीच्या ट्रेझरी बिलांचा दर दरसाल दर शेंकडा ७¾ टक्क्यापर्यंत वाढवावा लागला. व असें करून देशांतील खेळतें चलन कमी करावें लागलें, आणि याचा साहजीक परिणाम असा झाला कीं, येथील पदार्थांचे भाव इतर देशांतील भावाचे मानानें स्वस्त राहिले, व शेतकरी व कारखांनदार यांचें अतोनात नुकसान होऊन बेकारीचें प्रमाण वाढलें. संपाचा सुळसुळाट झाला. शेतकऱ्यास त्याचे शेतांत उत्पन्न झालेल्या धान्यांचे किंमतींत सारा भरणें सुद्धां कठीण जाऊं लागलें अशी परिस्थिति निर्माण झाली.

सप्टेंबर १९३१ मध्यें इंग्लंडनें आपल्या नाण्याचा सोन्याशीं असलेला संबंध तात्पुरता सोडला व हिंदुस्थानच्या रुपयाचा संबंध कागदी पौंडाशीं जोडण्यांत आला, व तेव्हांही एका रुपयास १८ (कागदी) पेन्स हाच दर पुन्हां एकदां कायम करण्यांत आला. व गेल्या सहा वर्षांत येथील सोन्याची

निर्यात ३०० कोटि रुपयावर झाली नसती तर हा (कागदी) १८ पेन्साचाही दर सरकारास केव्हांच सोडावा लागला असता.

अशी वस्तुस्थिती असतां सरकारनीं हुंडणावळ चढीची ठेवण्याचा हेका धरण्यापासून इंग्लंडचा तरी काय फायदा होता, हें आपण पाहूं. मागें वर्णन केलेल्या जागतिक परिस्थितींत जगांतील बाजारांत इंग्लंडचे मालाला इतर देशाच्या मालाच्या स्पर्धेंत टिकाव धरतां येऊन इंग्लंडमधील कारखाने चालू राहण्यास मालाचा उत्पादन खर्च कमी पडणें आवश्यक होते, तेव्हां कच्चा माल शक्य तितका स्वस्त मिळाला पाहिजे. हिंदुस्थान शेतीप्रधान देश असल्यामुळें व तो इंग्रजाचे सत्तेखालीं असल्यामुळें पाहिजे त्यास पाहिजे तें करून येथील कच्चा माल इतर देशांतील भावांचे मानानें शक्य तितका स्वस्त मिळवितां येणें जरूर व शक्य वाटलें. शिवाय इंग्लंडमधील कापड वगैरे पक्का माल खपविण्यास हा ३५ कोट वस्तीचा देश एक हक्काची बाजारपेठ या नात्यानें असणें अवश्य होतें. म्हणून कच्चा माल स्वस्त मिळण्याकरितां, व पक्का माल आपले (इंग्लंडचे) व्यापाऱ्याचें नुकसान न होता इतर देशाचे मानानें व खुद्द हिंदुस्थानांतील कारखान्यांत तयार होणारे मालाचे किंमतीचे मानानें स्वस्त पडण्याकरितां रुपयाचा भाव चढीचा ठेवणें हा एकच उपाय शक्य होता; म्हणून त्या मार्गाचा अवलंब करण्यांत आला.

चढती हुंडणावळ इंग्लंडचे फायद्याची

रुपयाचा भाव चढीचा ठेवल्यानें इंग्लंडचा फायदा कसा होतो. हें खालील उदाहरणावरून स्पष्ट दिसून येईल. "क्ष" नें इंग्लंडहून १०० पौंड किंमतीचें कापड या देशांत आणलें असें आपण समजूं. हुंडणावळीचा दर १६ पेन्स असतांना सदर मालाबद्दल येथून १५०० रुपये पाठवावे लागले असते तें आतां १८ पेन्साचा भाव असल्यामुळें (१०० पौंडाचे रुपये १३३३–५–४ होतात, परंतु हिशोबाचे सोईकरितां १३५० रुपये धरले आहेत) १३५० च रुपये पाठवावे लागतात. म्हणजे इंग्लंडमधील व्यापाऱ्यांस १०० पौंड मिळावयाचे ते वरील दोन्ही परिस्थितींत मिळालेच; त्यांत इंग्लंडमधील व्यापाऱ्याचें कांहींच नुकसान झालें नाहीं. मात्र रुपयाचा भाव

१६ पैन्साचे ऐवजीं १८ पेन्स झाल्यामुळें येथें इंग्लंडमधील कापड १५० रुपयानें म्हणजे शेंकडा १२½ टक्क्यानें स्वस्त पडूं लागलें. (यांत आपला फायदा होतो असें भासतें, परंतु त्यांत आपला खरा फायदा नाहीं, त्यामुळें आपले देशी उद्योगधंदे डबघाईला येतात.) बाजारांत स्वस्त मिळेल त्या मालास मागणी जास्त. या सर्वसामान्य तत्त्वानुसार, परदेशचा माल स्वस्त पडूं लागल्यामुळें त्याचा उठाव अधिक होतो. अर्थात् येथील कारखान्यांत तयार झालेला माल महाग पडूं लागल्यामुळें त्याचा खप कमी होतो, म्हणून येथील कारखानदार आपला उत्पादन खर्च कमी करावा म्हणून मजुरांचे दरांत कांट सुरू करतात. परंतु परदेशी मालाचा खप वाढल्यामुळें परदेशी माल अधिकाधिक स्वस्त देणें परवडतें, फिरून येथील कारखानदार आपले कारखान्यांतील कामगारांचे वेतनांत कांट करूनही न भागल्यामुळें कांहीं कामगारांना कामावरून कमी करतात, परंतु असें करूनही न भागल्यामुळें शेवटीं कारखाने बंद पडतात, अशा रितीनें येथील कारखानदारवर्ग व कामकरीवर्ग नुकसानींत येतो.

इंग्लंडमधील भांडवलदार वर्गानें: येथें बरेंच भांडवल गुंतविलेलें आहे. त्याचें व्याज, नफा वगैरेचे रूपानें, व येथील सरकारी खाजगी नोकरींत असलेल्या परकीय नोकर वर्गाचे दरवर्षी कोट्यावधी रुपये इंग्लंडला जात असतात त्यांस इंग्लंडमध्यें १०० पौंड मिळण्याकरितां १६ पेन्साचा रुपयाचा भाव असतांना जेथें १५०० रुपये देऊन १०० पौंडाच्या हुंडया घ्याव्या लागत होत्या तेथें आतां १८ पेन्साचा भाव असल्यामुळें १३५० रुपयेच देऊन १०० पौंडाची हुंडी मिळते. म्हणजे केवळ रुपयाचा भाव १६ पेन्साचे ऐवजीं १८ पेन्साचा ठेवल्यामुळें या वर्गाचा शेंकडा १२½ टक्के फुकटाफुकटी फायदा होतो हें दिसून येईल. या चढत्या हुंडणावळीमुळें जर हिंदुस्थानचा कांहीं फायदा होत असेल तर एवढाच कीं हिंदुस्थान सरकारास, होम चार्जेस करितां इंग्लंडला प्रतिवर्षी पाठविणेच्या रकमेंत सुमारें अडीच ते तीन कोटि रुपयांची बचत होऊं शकते हा होय.

चढत्या हुंडणावळीचे दरानें हिंदुस्थानचें नुकसान.

हिंदुस्थान शेतीप्रधान देश आहे. येथील सुमारें ७० टक्के लोकवस्ती शेतीचे धंद्यावर अवलंबून आहे व धान्य आणि कच्चा मालच प्रामुख्यानें येथून परदेशी पाठविला जातो. तेव्हां धान्य व कच्चा माल यांना चांगला भाव येण्यावर हिंदुस्थानची सांपत्तिक परिस्थिति अवलंबून राहणार हें उघड आहे.

हिंदुस्थानचे शेतकऱ्यांनीं जो माल पिकविला, त्याची त्यास जगाचे बाजारांत ठरेल तीच किंमत मिळणार हें उघड आहे. आपण अशी कल्पना करूं कीं, शेतकऱ्यांस इंग्लंडमध्यें १०० खंडी विकलेल्या गव्हाची किंमत म्हणून १०० पौंड मिळाले. रुपयाचा भाव १६ पेन्साचा असतांना त्याचे हार्ती येथें १५०० रुपये मिळाले असते तेथें आतां १८ पेन्साचे भावामुळें त्याचे हातांत १३५० रुपयेच येतात. म्हणजे त्यास हे १५० रुपये कमी कां मिळाले ? त्याचा गहूं पूर्वींपेक्षां कमी दर्जाचा होता म्हणून मिळाले काय ? नाहीं. तर केवळ हुंडणावळीचा भाव १६ पेन्सावरून १८ पेन्सावर चढविण्यांत आल्यामुळें शेतकरी १२½ टक्क्यानें बुडाला. बरें त्यानें उत्पन्न केलेल्या धान्याची किंमत त्यास १२½ टक्कयानें आतां कमी मिळाली. म्हणून त्यास सरकारसारा १६ पेन्साचा रुपयाचा भाव असतांना द्यावा लागत होता तेव्हांपेक्षां १८ पेन्साचा भाव झाला असतां १२½ टक्क्यानें कमी देतां येतो कां ? नाहीं. सरकारसारा त्यास पहिल्याइतकाच द्यावा लागतो. शेतकऱ्यास असलेल्या कर्जाचें व्याज व मुद्दलाचा हप्ता यांत सावकाराकडून त्यास १२½ टक्के सूट मिळते कां ? नाहीं. बरें सदर शेतकऱ्यास कांहीं कामानिमित्त तालुक्याचे अगर जिल्ह्याचे ठिकाणीं जाणें आहे, तसेंच त्यास आपला माल विक्रीकरितां आपले खेड्याहून जिल्ह्याचे ठिकाणीं अगर दुसरीकडे कोठें रेल्वेनें पाठवावयाचा आहे, अगर परदेशी बोटीनें पाठवावयाचा आहे, तर त्यास रेल्वे कंपनीकडून अगर आगबोट कंपनीकडून रुपयाचा भाव १६ असतांना जितका आकार घेण्यांत येत होता त्यापेक्षां १८ पेन्साचा भाव झाला असतां १२½ टक्के आकार कमी पडतो कां ? नाहीं. म्हणजे याचा अर्थ असा कीं, शेतकऱ्यास १६ पेन्साऐवजीं १८ पेन्साचा रुपयाचा भाव

झाला असतां १२½ टक्केच नुकसान येतें असें नाहीं; तर त्यास यापेक्षां अधिक नुकसान येतें. त्यास सुमारें २० ते २५ टक्के तरी निदान नुकसान लागतें असें अनुमान करण्यांत आलें आहे. (हिंदुस्थानांत दर माणशीं वार्षिक उत्पन्न सरासरीनें सर विश्वेश्वरय्या यांचे मतें ५५ ते ८२ रुपयाचे आसपास आहे. यावरून तें किती अल्प आहे हें उघडच आहे. त्यांत शेतकऱ्याला शेंकडा २५ इतकी घट लागली म्हणजे हें सांपत्तिक चित्र किती भेसूर दिसतें याचा विचार ज्याचा त्यांनीं करावा) याचा परिणाम असा होतो कीं वर्षभर शेतांत राबून देखील त्यांत उत्पन्न होणारें पीक धान्याचे भाव मंदावल्यामुळें, शेतसारा देणेसही अपुरें पडतें, व अशा रीतीनें सरकारी बाकी थकते, सावकारी देणें फिटत नाहीं, व याचें पर्यवसान शेता-भाताचा व घरादाराचा लिलाव होणेंपर्यंत होतें. शेतावर उपजीविका होत नाहीं म्हणून शेवटीं कांहीं शेतकऱ्यांवर शेती सोडून देऊन आसपासचे शहरांतील कारखान्यांत मजुरी करण्यकरितां आपले गांव सोडून जाण्याचा प्रसंग ओढवतो. परंतु तेथेंहि कारखानदारास परदेशच्या मालाच्या स्पर्धेमुळें आपले कारखाने चालविणें परवडत नाहींसें झाल्यामुळें शेतकऱ्यास कामधंदा मिळणें कठीण पडतें, व त्यांची तेथें पूर्वींच्या असलेल्या कारखानदारांनीं कमी केलेल्या कामकरी वर्गांत भर पडून 'मागणी व पुरवठा' या न्यायानें, मागणीपेक्षां मजुरांची संख्या वाढल्यामुळें सर्वसाधारण मजुरीचे दर उतरतात व याचा परिणाम कामकरी वर्गानें केलेल्या संपांत कामकऱ्यांना अपयश येण्यांत होतो. कारण हे बेकार लोक कमी पगार घेऊन कामावर जाण्यास तयार असतात व अशा रीतीनें सर्वांचेंच नुकसान होतें.

हिंदुस्थानांत शेंकडा ७०–७५ टक्के लोकसंख्या शेतकरी, कामकरी यांच वर्गांतील असल्यामुळें आणि या वर्गाची अशी हलाखीची स्थिति झाली म्हणजे येथील देशांत तयार झालेला माल खपणें कठीण पडून शेवटीं कारखाने बंद पडण्यापर्यंत पाळी येते; व अशा रीतीनें दारिद्र्याची छटा सर्व देशभर पसरलेली दिसते. ज्यांस परदेशी माल खरेदी करावयाचा आहे किंवा जे प्रत्यक्ष धनोत्पादक नाहींत म्हणजे देशांतील सरकारी व बिनसरकारी नोकरवर्ग, व्याज मिळविणारे सावकार, वकील, डॉक्टर्स वगैरे लोकांचा कांहीं

काल देशांतील धारण स्वस्त झाल्यामुळें चढत्या हुंडणावळीचे दरानें थोडा-बहुत फायदा होतो ही गोष्ट खरी असली तरी बहुसंख्य वर्ग जो शेतकरी वर्ग याचीच हलाखीची स्थिति झाल्यावर शेवटीं वरील वर्गासहि झळ पोहों-चल्याशिवाय रहात नाहीं.

या शोचनीय परिस्थितींतून वर डोकें काढणें असल्यास प्रथम शेतकरी वर्गाची परिस्थिति सुधारली पाहिजे. ती सुधारणें शेतकऱ्यानें उत्पन्न केलेले धान्य व कच्चा माल यांस भाव येण्यावर अवलंबून आहे. या मालास परदेशांत भाव येण्यास मार्ग, जगांतील सर्व राष्ट्रांनीं यापूर्वींच प्रचारांत आणलेला महायुद्धपूर्वकालीन उतार हा होय. या उपायानें हिंदुस्थानांत आबादीआबाद होईल असें कोणीच म्हणत नाहीं. मंदीस उत्पादनांत बेसुमार वाढ, व्यापारी उलाढालींत भासणारी सोन्याची टंचाई वगैरे अनेक जागतिक कारणें आहेतच. पण उतरतीं हुंडणावळ थोड्या प्रमाणांत कां होईना पण या देशास हिताची झाल्याशिवाय राहणार नाहीं. हें खालीं दिलेल्या ५ देशांतील बाजारभावावरून दिसून येईल.

देशाचें नांव	१९२९ सालचे बाजारभाव १०० धरून त्याच्याशीं हल्लींचे बाजारभावाशीं प्रमाण.
इंग्लंड	९० टक्के
ऑस्ट्रेलिया	९१ ,,
न्यूझीलंड	१०५ ,,
कानडा	९० ,,
हिंदुस्थान	७५ ,,

यावरून हें स्पष्ट होत आहे कीं ब्रिटिश साम्राज्यांतर्गत ऑस्ट्रेलिया, कानडा व न्यूझीलंड हे शेतीप्रधान देश स्वयंशासित असल्यामुळें, त्यांनीं

आपल्या चलनांच्या किंमती लोकांच्या हिताकरितां उतरविल्या व त्यामुळे तेथील बाजारभाव चढीचे राहिले.

उलटपक्षीं हिंदुस्थान परतंत्र असल्यामुळें येथील लोकांचे हिताच्या दृष्टीनें चलनाची किंमत जरूर तितकी न उतरविल्यामुळें येथील बाजारभाव वरील देशांचे मानानें स्वस्त राहिले. याचें कारण हिन्दुस्थान परतंत्र असल्यामुळें येथील चलनपद्धतींत फेरफार इंग्लंडचे हिताचे दृष्टीनें होत असतात व येथील बाजारभाव शक्य तितके अधिक स्वस्त राहण्यावर या देशांतील कच्चा माल इंग्लंडला इतर देशांतील मालाचे मानानें स्वस्तांत पडून इंग्लंड-मधील कारखानदारांचा उत्पादन खर्च कमी पडणें व जगाचे बाजारांत इतर देशाचें मालाचे स्पर्धेत इंग्लंडच्या मालाचा टिकाव लागून इंग्लंड-मधील कारखाने चालू राहणें हें अवलंबून असल्यामुळें, त्या दृष्टीनें हुंडणा-वळीचा दर कायम करण्याचें सरकारचें धोरण असतें, मग तो दर हिन्दु-स्थानास कितीही नुकसानीचा असो त्याची फिकीर सरकार कां करील?

१८ पेन्सचा रुपयाचा भाव ठेवल्यामुळें इंग्लंडचें उद्दिष्ट साधलें, हें वरील कोष्टकावरून इतर देशांचे मानानें येथील बाजारभाव स्वस्त राहिल्याचें उघड होत आहे.

वरील विवेचनावरून १८ पेन्साचा रुपयाचा भाव हिन्दुस्थानचे हिताचा नाहीं व येथील बहुसंख्य वर्ग जो शेतकरी त्याची परिस्थिती सुधारणें अस-ल्यास त्यानें पिकविलेल्या मालास किम्मत येणेंकरितां रुपयाची किंमत १८ पेन्सावरून निदान १६ पेन्सावर तरी आणिली पाहिजे, म्हणजे बाजारभाव चढतील व पर्यायानें शेतकरी वर्गाची परिस्थिती कांहींशी सुधारण्याच्या मार्गास लागले, असें तज्ज्ञांचें मत आहे.

रूपयाची किंमत उतरविल्यास शेतकऱ्याचे मालास किमत आल्यामुळें त्याची क्रयशक्ती (Purchasing power) वाढेल व त्यामुळें येथील उद्योग-धंदेही हल्लींपेक्षां बरे चालू लागतील व पर्यायानें कामकरी लोकांचीहि परि-स्थिति सुधारण्याच्या मार्गाला लागेल. हिंदुस्थानांतील कापडाच्या गिरण्या व इतरही कांहीं उद्योगधंदे यांजवर अलीकडे कांहीं कालापासून ओढवलेले

सर्वांत मोठें संकट म्हणजे जपाननें आपल्या नाण्यांची किंमत सुमारें ५० टक्क्यांनीं उतरविल्यामुळें तेथील माल येथें फारच स्वस्त येऊन पडूं लागला हे होय. आणि त्यांतून हिंदुस्थानचा निभाव लागणेस आपल्या चलनाची किंमत उतरविणें भाग आहे. त्याशिवाय कारखाने चालण्यास कठीण झाल्यामुळें मजूर-वर्गाची परिस्थिति सुधारण्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटणें शक्य नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे.

प्रकरण सातवें

उपसंहार

होमचार्जेसची पाठवावयाची रक्कम, सरकारी व बिनसरकारी गोऱ्या नोकरवर्गास आपल्या नातेवाईकांस पाठवावी लागणारी रक्कम, ब्रिटिश भांडवलदार वर्गानें हिंदुस्थानांत गुंतविलेल्या भांडवलावर सुटणारें व्याज व नफा या नात्यानें इंग्लंडला प्रतिवर्षी हिंदुस्थानांतून पाठवावी लागणारी रक्कम, व कच्चा माल आणि धान्य इंग्लंडला इतर देशांतील भावाच्या मानानें स्वस्त पडणें व इंग्लंडच्या पक्क्या मालास येथील बाजारपेठ निर्बंध खुली राहणें, या गोष्टी नजरेपुढें ठेऊन, यांस पोषक असें हिंदीचलन व हुंडणावळविषयक धोरण आतांपर्यंत कसें चालत आलेलें आहे, हें वरील विवेचनावरून दिसून येईल.

एकोणिसावें शतकाच्या चतुर्थपादांत (१८७०१९००) पाश्चात्य राष्ट्रांनीं चांदीचा मुख्य चलन म्हणून उपयोग करण्याचें सोडलें व सुवर्णचलन सुरू केलें म्हणून चांदीचा भाव फारच घसरला व सोन्याचा भाव चढला. येथें रौप्य चलन सुरू तर इंग्लंडांत सुवर्णचलन सुरू. त्यामुळें परराष्ट्र हुंडणावळीचा (Exchange) रुपयाचा २४ पेन्साचा दर १३ पेन्सावर आला, त्यामुळें येथून इंग्लंडला ज्यांना पैसे पाठवावयाचे होते त्यांचें नुकसान होऊं लागलें. (या उतरत्या हुंडवणावळीमुळें हिंदी जनतेचें कांहीं नुकसान नव्हतें. फक्त होमचार्जेसकरितां पूर्वीपेक्षां यावेळीं जास्त रक्कम पाठवावी लागल्यामुळें १८७३ ते १८९३ या मुदतींत सुमारें ८५ कोटि रुपये जास्त खर्च झाले येवढेंच! परंतु येथील गोऱ्या लोकांचें त्यांत नुकसान फार होऊं लागलें हें आपण मागें पाहिलेंच आहे.) म्हणून १८९३ सालीं टांकसाळी बंद झाल्या, व रुपयाची किंमत चांदीचे किंमतीवर अवलंबून न राहतां ती ब्रिटिश पौंडाचा अमूक इतका हिस्सा समजावयाची, अशा रीतीनें हिंदु-

स्थानच्या चलनपद्धतींत कृत्रिमपणा या वेळेपासून आला व १८९९ सालीं १६ पेन्स रुपयाचा दर कायद्यानें कायम करण्यांत आला.

भारतमंत्र्यानें आपल्या खर्चास जरूर त्यापेक्षां अधिक सरकारी हुंड्या (कौन्सिल बिल्स्) काढून, ज्यावेळीं आमचा कच्चा माल व धान्य इंग्लंडला फार मोठ्या प्रमाणावर जात होतें, त्यावेळीं, सोनें इंग्लंडमध्यें ठेऊन घेऊन येथील व्यापाऱ्यांचे हातांत नोटा व रुपये दिले. या इंग्लंडमधील सोन्याच्या तारणावर येथें रुपये व नोटा काढून त्या निर्गत मालाच्या व्यापाऱ्यांना देण्यांत आल्या व "सुवर्णमापन निधि" व "कागदी चलन निधि" असे दोन निधि निर्माण करून त्यांतील बराच मोठा भाग इंग्लंडमध्यें ठेवण्यांत आला. असें करण्यांतला मुख्य हेतू असा कीं हिंदुस्थानांत कांहीं घोटाळा झाला तरी निदान एक दोन वर्षांची हिंदुस्थानांतून इंग्लंडला येणें असणारी रक्कम तेथल्यातेथेंच (इंग्लंडमध्येंच) परभारें घेण्यास सांपडावी.

१८९९ सालीं कायद्यानें कायम केलेला रुपयाचा १६ पेन्साचा परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर १९१९ सालीं २४ पेन्साचा केला. परंतु चांदीचा भाव लागलीच उतरूं लागल्यामुळें तो १६ पेन्साचे आसपास आला, तरी २४ पेन्साचाच भाव टिकविण्याकरितां सरकारनें अट्टाहास केला व त्यांत हिंदुस्थानचे ३५ कोटि रुपयाचे आसपास नुकसान झालें. परंतु तसें करण्यांत येथील गोऱ्या नोकरवर्गाचे व ज्या गोऱ्या भांडवलदार वर्गानें येथें भांडवल गुंतविलें होतें त्यांचें उखळ पांढरें झालें! शेवटीं हा २४ पेन्साचा दर पांच चार महिन्यांतच सोडावा लागला ही गोष्ट निराळी परंतु हिंदी जनतेचें नुकसान झालें तरी तिकडे लक्ष दिलें गेलें नाहीं, आणि १८९३ सालीं गोऱ्या नोकरवर्गाचे व भांडवलदारवर्गाचें नुकसान होऊं लागतांच तावडतोब टांकसाळीं बंद करून कृत्रिम चलनपद्धति (managed currency) सुरू करण्यास सरकार एका पायावर तयार ! हें दृश्य एखाद्या स्वतंत्र राष्ट्रांत पहावयास मिळेल काय ?

जगांतील बहुतेक राष्ट्रांनीं महायुद्धोतर कालांत उत्पन्न झालेल्या बिकट परिस्थितींतून मार्ग काढून आपापल्या देशांतील जनतेचें कांहीं प्रमाणांत

हित साधण्याकरितां महायुद्धापूर्वी (१९१४ सालीं) प्रचारांत असलेल्या चलनाच्या किंमती उतरविल्या तर हिंदुस्थानांत महायुद्धापूर्वी १९१४ सालीं प्रचारांत असलेला हुंडणावळीचा दर १६ पेन्स तर १९१९ सालीं २४ पेन्स ! हा २४ पेन्साचा दर न टिकवितां आल्यामुळें पांच चार महिन्यांतच सोडावा लागला तरी त्यापासून कांहीं धडा सरकारनें घेतला असेल म्हणावें तर १९२७ सालीं जो दर कायद्यानें कायम केला तो १८ पेन्स (म्हणजे १९१४ सालापेक्षा अधिकच) असें कां, तर इंग्लंडला कच्चा माल येथून इतर देशापेक्षां स्वस्त मिळाला पाहिजे व इंग्लंडचा पक्का माल येथें अधिक खपला पाहिजे ! त्यांत येथील शेतकरी, मजूर व कारखानदार मेले काय किंवा जगले काय सारखेंच !

१९३१ सप्टेंबरमध्यें इंग्लंडनें आपल्या चलनाचा सुवर्णाशीं असलेला संबंध सोडला तसा रुपयाचाही सुवर्णाशी असलेला संबंध सुटला. परंतु रुपयास इंग्लंडच्या चलनाप्रमाणें मोकळें न सोडता, तो पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या राष्ट्राचें चलन आहे हें जणू काय सिद्ध करण्याकरितांच त्याचें नातें स्टर्लिंगशीं जोडण्यांत आलें. इंग्लंड व हिंदुस्थान यांचे हितसंबंध परस्पर विरुद्ध आहेत. इंग्लंड बऱ्याच राष्ट्रांचे धनको तर हिंदुस्थान इंग्लंडचे ऋणको. कच्चा माल व धान्य शक्य तितकें स्वस्त मिळण्यावर व पक्का माल शक्य तितका परदेशीं अधिक खपण्यावर इंग्लंडचें हित अवलंबून तर कच्चा माल धान्य यांना अधिकाधिक किंमत येण्यावर व कापड वगैरेसारखा देशात तयार होणाऱ्या मालास परदेशी मालाची स्पर्धा न होण्यावर हिंदी जनतेचें हित अवलंबून,अशी परस्पर भिन्न परिस्थिति असतां इंग्लंडच्या चलनाशी (स्टर्लिंगशी) हिंदुस्थानच्या रुपयाचें नातें जोडण्यांत इंग्लंडच्या हिताच्या दृष्टीशिवाय दुसरा हेतु काय असणार ? इंग्लंडचें हित म्हणजे हिंदुस्थानचें नुकसान, व हिंदुस्थानचें हित म्हणजे इंग्लंडचें नुकसान, असें हें समीकरण आहे. तेव्हां ज्याच्या हातांत ससा तो पारधी, या न्यायानें हिंदुस्थानवर इंग्लंडची राजकीय सत्ता असल्यामुळें इंग्लंड आपलेंच हित पहाणार व त्यांत आपलें नुकसान होणार, हें उघड आहे.

हिंदुस्तानांतून सोनें १९३१ मध्यें रुपयाचा संबंध स्टर्लिंगशी जोडण्यांत आल्यावरच परदेशीं (इंग्लंडला) जाऊं लागलें. जगांतील बहुतेक इतर देशांनीं या सुमारास देशांतील सोनें परदेशीं जाऊं नये म्हणून सोन्याचे निर्गतीवर निबंध घातले असतांना येथील सोन्याची निर्गत मात्र अप्रतिबद्ध! इतर देशाप्रमाणें येथलि सुवर्णाचे निर्गतीवर निबंध घाला असें म्हणतांच, " सोन्याच्या निर्गतीमुळें हिंदुस्थानचे हितच होत आहे " असें बेधडक उत्तर देण्यास सरकार तयार! यांतील खरा प्रकार असा, कीं, हिंदुस्थानांतून होणाऱ्या सोन्याच्या निर्गतीमुळें इंग्लंडच्या स्टर्लिंगचा भाव स्थिर राहण्यास मदत होत होती या बद्दलची स्पष्ट कबुली " Daily Telegraph "च्या १०-१-१९३२ च्या अंकांतील खालील उताऱ्यामध्यें दिली आहे.

"Gold is being sent from India at a rate which is double the annual production of the gold mines of the world. Bankers regard this Indian gold as of first class importance in enabling Great Britain to repay its debt abroad without depressing sterling. The gold which comes to London is shipped by the Indian merchant who gets sterling. With the sterling he buys rupees. But the metal does not remain here ; it is transported to France, Switzerland, Holand, or even America. As sale of the Gold is equivalent to export, the proceeds realized by its sale creates a demand for sterling exchange. This new movement keeps sterling steady."

तसेंच धान्य व कच्चा माल यांच्या निर्गत व्यापारांत घट येऊं लागल्यामुळें व परदेशी पक्का माल येथें अधिक खपूं लागल्यामुळें स्टर्लिंगला मागणी जास्त व रुपयाला मागणी कमी अशी परिस्थिति उत्पन्न झाली असता रुपयाचा इतक्या अट्टाहासांनीं टिकविलेला १८ पेन्सांचा दर (कागदी १८ पेन्सांचा) घसरूं लागला पण तो सुवर्णाचे निर्गतीमुळें रुपयास मागणी निर्माण झाल्यामुळें १८ पेन्सावर रुपयाचा दर टिकून राहिला. म्हणजे इंग्लंडमधील स्टर्लिंगचा दर स्थिर राखण्याकरितां व रुपयाचा परराष्ट्रीय

हुंडणावळीचा भाव १८ पेन्सावर टिकवून धरण्याकरितां हिंदुस्थानांतून होणाऱ्या सोन्याच्या निर्गतीवर इतर देशाप्रमाणें निर्बंध घातले नाहींत, असें तज्ज्ञांचें मत आहे.

टेरी साहेब आपल्या ग्रंथांत म्हणतात कीं मोगल बादशहांनी सोनें व चांदी परदेशीं पाठविणें हा गुन्हा ठरविला होता व त्या गुन्ह्यास फाशीची शिक्षा ठेवली होती. (The moghul kings made it a crime not less than capital to export gold and silver) यावरून मोगल राजघराण्याचा अंमल इंग्रजांच्या अमलाप्रमाणें हिंदुस्थानच्या आर्थिक अधोगतीस कारणीभूत झाला नाहीं. याचें कारण मोगल राजघराणें येथें राज्य स्थापन करतांच आपल्या परिवारासह हिंदुस्थानांतच येऊन राहिलें व या देशासच आपली मायभूमि समजूं लागलें. त्याचप्रमाणें त्यांचा नोकरवर्गही येथेंच कायम येऊन राहिला. त्यामुळें येथून परदेशी प्रतिवर्षी ' होम चार्जेस ' या सदराखालीं पैसे पाठविण्याचा प्रश्न नव्हता. तसेंच त्यांचा आपल्या मायभूमीशीं व्यापार विषयक आपलेपणाचा असा संबंध कांहींच नव्हता. (कारण त्यांचा पूर्वीचा देश हिंदुस्थानपेक्षां मागासलेला होता.) त्यामुळें त्यांच्या अमदानींत येथील चलन व हुंडणावळ विषयक विशिष्ट व कृत्रिम असें धोरण त्यांनी ठेविलें नाहीं. व त्यामुळें त्यांचे अमदानींत हा देश भिकेसही लागला नाहीं.

होमचार्जेस

परंतु ब्रिटिश अमदानींत, परिस्थिती याच्या अगदीं उलट ब्रिटिश लोक येथें पहिल्यांदा आले ते व्यापाराकरितां आले, व तत्कालीन येथील परिस्थितीचा फायदा घेऊन राज्यसूत्रें आपल्या हातांत घेऊन आपला व्यापार वाढविणें त्यांना शक्य झालें. त्यामुळें इंग्लंडची व्यापारवृद्धि जेणें करून येथें होईल तशाच तऱ्हेचें येथील चलन व हुंडणावळ विषयक धोरण त्यांचे राहिलें हें उघड आहे. आतां ते मुत्सद्दी तर हिंदी जनता भोळी अशी परिस्थिती असल्याकारणानें त्यांना ते चलन व हुंडणावळ विषयक ठेवीत असलेलें धोरण हिंदी जनतेच्या हिताचेंच आहे.

हें भासाविणें शक्य झालें; व इंग्लंडला प्रतिवर्षी पौंडांत पाठवाव्या लागणाऱ्या होमचार्जेसकरितां द्याव्या लागणाऱ्या रुपयांच्या संख्येंत, कृत्रिम रीतीनें चढीची हुंडणावळ ठेवल्यानें बचत होते अशी सबब पुढें करून इंग्लंडच्या पक्क्या मालाला येथील बाजारपेठ निर्वेध ठेवणें व येथील कच्चा माल व धान्य इतर देशांतील भावाचे मानानें इंग्लंडला स्वस्त मिळणें हे उद्देश सिद्धीस नेतां आले. परंतु असें करण्यात हिंदी जनतेचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असें सुमारें १२५ कोटि रुपयांचें नुकसान झालें, तें कसें याचा थोडाअधिक खुलासा केला पाहिजे.

होमचार्जेसकरितां प्रतिवर्षी पाठवाव्या लागणाऱ्या रकमेकरितां १८७३ सालापासून १८९३ सालापर्यंत चांदीचा भाव घसरूं लागल्यामुळें अधिकाधिक रुपये लागूं लागले. त्यामुळें या २० वर्षांत सुमारें ८५ कोटि रुपयांचे आसपास हिंदुस्थानसरकारच्या बजेटमध्यें तूट आली. हें नुकसान लोकांस उघड उघड दिसण्याजोगें होतें. (पण परराष्ट्रीय उतरत्या हुंडणावळीमुळें हिंदी शेतकऱ्यास त्यांच्या धान्यास व कच्च्या मालास चांगलाच भाव आल्यामुळें एकूण हिंदी जनतेचा या उतरत्या हुंडणावळीमुळें फायदाच झाला. नुकसान झालें ते गोऱ्या नोकरवर्गाचें व गोऱ्या भांडवलदार लोकांचें.) तेव्हां हिंदुस्थानचें असें नुकसान होतें तें कमी करण्याचा बहाणा करून १८९३ सालीं लोकांनीं चांदी नेऊन दिल्यास सरकारनें टांकसाळींतून रुपये पाडून देण्याची जनतेस असलेली सवलत रद्द करून तेव्हांपासून परराष्ट्रीय हुंडणावळ विषयक धोरणांत कृत्रिमपणा आणला गेला. व होमचार्जेसकरितां खर्च कराव्या लागणाऱ्या रुपयांच्या संख्येंत, कृत्रिम रीतीनें चढीची हुंडणावळ ठेऊन बचत करण्यांत आली खरी; परंतु या कृत्रिम पद्धतीमुळें अप्रत्यक्ष नुकसान किती झालें हें जनतेच्या लक्षांत येणें कठीण जातें. तें नुकसान (हिंदुस्थानला इंग्लंडचें देणें असलेल्या कर्जाची छाननी करण्याकरितां राष्ट्रीय सभेनें नेमलेल्या समितीनें आपल्या प्रतिवृत्तास जोडलेल्या परिशिष्टांत दिलेल्या आंकड्यावरून) खालीलप्रमाणें झाल्याचें अंदाजलें आहे.

"परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर चढीचा ठेवल्यामुळें हिंदी जनतेचें १८९३ पासून १९३२ पर्यंतच्या ४० वर्षांच्या अवधींत कच्चा माल व धान्य यांचे निर्गत मालास आलेल्या किंमतींत व कापड वगैरेसारख्या इंग्लंडच्या पक्क्या मालाचे खपामुळें येथील उद्योगधंदे डबघाईस आले. त्यांत हिंदी जनतेचें कमींत कमी ३०० कोटि रुपयाच्यावर नुकसान झालें. व हिंदी जनतेच्या गांठीं असलेल्या चांदीच्या किंमतींत (चढीच्या हुंडणावळी-मुळें झालेल्या चांदीच्या किंमतीच्या उतारामुळें,) झालेल्या नुकसानीचा आंकडा निदान ५०० कोटि रुपयांच्यावर आहे म्हणजे या हुंडणावळीच्या चढीच्या दरामुळें हिंदी जनतेचें हिंदुस्थान सरकारच्या हिशोबांत न दिसणारें असें अप्रत्यक्ष नुकसान ८०० कोटि रुपयांचेवर झालें.

१९२०–२१ सालांत चढीचा २४ पेन्साचा हुंडणावळीचा दर टिक-विण्याकरितां परत हुंडया (रिव्हर्स कौन्सिल बिलें) काढल्यामुळें हिंदुस्थान-सरकारचे तिजोरीवर ३५ कोटि रुपयांचा पडलेला बोजा, व गोऱ्या सरकारी नोकरांना कांहीं काल देण्यांत आलेल्या हुंडणावळविषयक भत्त्या-करितां (exchange allowance) सरकारनें खर्च केलेले ५ कोटि रुपये म्हणजे एकूण ४० कोटि रुपये मात्र सरकारचे हिशोबावरून सहज दिसून येण्याजोगे आहेत.

एकूण १८९३ ते १९३२ पर्यंतच्या ४० वर्षांचे अवधींत चढीच्या हुंडणावळीच्या दरामुळें हिन्दी जनतेचे सरकारच्या जमाखर्चावरून दिसून येणारे ४० कोटी रुपये खर्च झाले; तर सहज समजून न येणारें नुकसान ८०० कोटी रुपयांचें झालें.

यावरून आपल्या हल्लींच्या चलन व हुंडणावळ विषयक धोरणाच्या कृत्रिमपणास मूलतः कारणीभूत झालेली 'होमचार्जे'स ही बाब हिन्दुस्था-नास, (१८७३ ते १८९३ पर्यंत ८५ कोटि, १९२०-२१ सालांत ३५ कोटी व हुंडणावळ विषयक भत्ता ५ कोटी रुपये) सरकारचे जमा-खर्चावरूनच १८७३ सालापासून १९३२ पर्यंतच्या कालांत १२५ कोटि रुपयांनीं व अप्रत्यक्षरीत्या ८०० कोटी रुपयांनीं म्हणजे एकूण ९२५ कोटि रुपयांनीं नुकसानीची झाली.

होमचार्जेसच्या प्रत्यक्ष खर्चाचा बोजा १८५८ सालापासून आतांपर्यंत ८० वर्षांत हिन्दी जनतेवर किती बसला याचा विचार वरील आंकड्यांत आपण केलेला नाहीं. फक्त होमचार्जेसची रक्कम पौंडांत पाठविण्याकरितां रुपये कमी लागावे म्हणून हुंडणावळविषयक कृत्रिम धोरण ठेवल्यामुळें व चांदीचा भाव घसरल्यामुळें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा हिन्दी जनतेवर बोजा किती बसला याचाच विचार यांत झाला.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मोंगल राजे हिंदुस्थानलाच मायदेश समजत तर इंग्रज हिन्दुस्थानकडे "चरण्याचें एक कुरण" या दृष्टीनें पाहतात, म्हणून या दोघांच्या हिन्दुस्थानच्या चलनविषयक धोरणांत दक्षिण-उत्तर ध्रुवाइतकें अंतर दिसतें.

असो, येथपर्यंत केलेल्या विवेचनाचें सार एका वाक्यांतच सांगावयाचें झाल्यास तें असें सांगता येईल कीं "**हिंदी चलनपद्धतीचा इतिहास म्हणजे इंग्लंडनें हिंदुस्थानांतून केलेल्या कायदेशीर लुटीचाच इतिहास होय.**"

रां.नं. ०९३
१०८६०

समाप्त

REFBK-0005687

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५९८८